# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख ६ माहे डिसेंबर सन १८८० इसवी अंक ४८

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ८ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १-८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून.

देण्यांत येते कीं, येत्या डिसेंबर महिन्याची तारीख २४ रोज शुक्रवार पासून या मंडळीचा पुढें लिहिले विषयांत उमेदवारांची परीक्षा घेऊन बक्षिसें देण्याचा वार्षिक समारंभ सुरू होणार आहे. याजकरितां ज्या उमेदवारांची परीक्षेस येण्याची इच्छा असेल त्यांचे लेखी अर्ज खालीं सही करणाराकडे "प्रमोदसिंधु" छापखान्याच्या पत्यावर तारीख १२ माहे डिसेंबरच्या आंत पोंचतील असे यावे.

विषय १ ला—"आपल्या देशांत पूर्वी प्रत्येक गावीं पंच मार्फत पंचायती होत असत त्यांपासून कोणकोणते फायदे होत होते त्याविषयीं माहिती देणें. हल्लीं सरकारची ह्या कामांत कोणत्या प्रकारची मदत आहे व पंचमार्फत आतां कोणचीं कामें होण्यासारखीं आहेत हें सांगावें. पंचाचे आंगीं कोण कोणते गुण असावेत."

विषय २ रा—"सुधारलेल्या देशांत खानेसुमारी करितात, तींत कोणती माहिती साधारणपणें मिळवितात, त्या माहिती पासून जे फायदे होतात ते कांहीं देशांतील खानेसुमारीचे आंकडे घेऊन स्पष्ट करून दाखवावे आपल्या देशांत खानेसुमारी विषयीं लोकांचे वाईट समज असतील तें दूर करावे."

येणेंप्रमाणें दोन विषय नेमिले आहेत. पहिल्या विषयांत पहिलें बक्षीस रुपये ३० चें व दुसरें रुपये २० चें नेमिलें आहे. दुसऱ्या विषयांत पहिलें बक्षिस रुपये २५ चें व दुसरें रुपये १५ चें नेमिलें आहे.

परीक्षेस येणारे उमेदवारांनीं समारंभाचे पूर्व दिवशीं या सभेच्या चिटणिसास भेटावें.

उमेदवारांस लागू असण्याचे नियम खालीं दिले आहेत त्यांकडे अवश्य लक्ष द्यावें

१ उमेदवाराचें वय १६ वर्षांपेक्षां कमी नसावें.

२ उमेदवारानें उभे राहून भाषण करावें व जवळ लेखी टिपण बोलतेवेळीं ठेवूं नये.

३ प्रत्येक उमेदवारानें अर्ध्या तासावर भाषण करूं नये. परंतु जरूर वाटल्यास भाषण करणारास अर्ध्या तासापूर्वींच रजा देण्याचा व वाटल्यास मुदत अधिक एक तासपर्यंत वाढविण्याचा अधिकार परीक्षकांस आहे. कोणी कोणाही व्यक्तीस अनुलक्षून लागून भाषण करील किंवा सरकारच्या किंवा धर्माच्या विरुद्ध भाषण करील किंवा बीभत्स शब्द भाषणांत घालील तर त्याचें भाषण बंद करण्यांत येईल.

४ ज्या उमेदवारांचे निरनिराळ्या विषयांत अधिक गुण लागतील त्या उमेदवारांस बक्षिसें दिलीं जातील परंतु एक तृतीयांशापेक्षां गुण कमी लागल्यास मुळींच इनाम दिलें जाणार नाहीं.

सन्मानार्थ नेमलेल्या अगर दुसऱ्या एकाद्या स्वतंत्र विषयावर कोणाची भाषण करण्याची इच्छा असल्यास त्यांस परवानगी आहे

उमरावती तारीख २८ अक्टोबर १८८०

यशवंत गोविंद
सभेचे चिटणीस.

## जाहिरखबर

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडुन कळविण्यांत येते कीं कजबे जामोद तालुके जळगांव जिल्हे अकोले या गांवीं मयाराम छोटुलाल या नावची सावकारीची आमची दुकान असोन मयाराम हे मैत झाले आहेत. मयाराम यांची वारीस बायको चवथी बाई जवजे मयाराम ही असून तिचा नवरा म्हणजे मयाराम हा मैत झाल्यावर दुकानचे नांव जें पूर्वी मयाराम नथमल या नावचें होतें तें बदलून वर तिनें नांव मयाराम छोटुलाल दाखविलें आहे तें ठेऊन आपले तर्फे दुकानचें काम करण्यास व इस्टेटीची व्यवस्था पहाण्यास नोकर या नात्यानें छोटुलाल नंदराम मारवाडी याजला नेमिलें होतें व त्या नोकराचें वर्तन वगैरे चांगलें दिसल्यावर त्याजला कुलमुखत्यार पत्र देण्याचें ठरविले होतें पण सदर्हु नोकर छोटुलाल यांणें बाईच्या मर्जी प्रमाणें न वागतां कपट करून मला मैताचे बायकोनें दत्तक घेतलें आहे व मी मालक आहे असें सर्वत्रास खोटें भासवून आपला बराच फायदा करून घेतला ही गोष्ट आमची मालकीण चवथी बाईचे जेव्हां समजण्यांत आली तेव्हांच अशा कपटी मनुष्यास तिणें आपले दुकानावरून काढून दिलें आहे व मजला कुलमुखत्यारपत्र दिल्यावरून हल्ली मी या दुकानचें सर्व काम पाहात आहे. बाई तर्फे सर्व दुकानची व्यवस्था पाहाण्याचा अधिकार मला असल्यामुळें मी बाईच्या आज्ञेनें सर्वत्रास असें कळवितो कीं ह्या नोटिसीचे तारखेपासून आमचे दुकानच्या संबंधानें ज्याज्या लोकांकडेस आमचे घेणें असेल त्या त्या इसमांनीं सदर्हु काढून दिलेला छोटुलाल मारवाडी यास कांहीं एक पैसा देऊ नये किंवा त्याची पावती घेऊ नये त्याचा या दुकानासी अर्थाअर्थी कांहीं संबंध राहिला नाहीं व त्याजला बाईनें दत्तकही घेतला नाहीं. ह्या नोटिसी-नंतर जो कोणी असामी आमचे दुकानचे संबंधाचा पैसा छोटुलाल याजला देईल तर तें देणें आमचे घेण्यांत मजुरा धरलें जाणार नाहीं व कायदेसीर होणार नाहीं. त्याची सर्व जबाबदारी सदर्हु इसमास पैसा देणारावर राहील. सारांश ह्या नोटिसी नंतर छोटुलाल यासी आमचे दुकानचें संबंधानें जो म्हणून कांहीं व्यवहार होईल तो सर्व निरर्थक समजण्याचा आहे तसेंच ज्या ज्या व्यापारी अगर शेटसाहु लोकांचे आमचे कडेस घेणें असेल त्यांणींही ह्या नोटिसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत खालीं सही करणाराकडे कजबे जामोद या गांवीं आमचे दुकानीं येऊन आपलें घेणें रुजू करून घ्यावें तसें न केल्यास नोटिसीच्या मुदती नंतर जर कोणी आपले घेण्याचें मागणें करील तर त्याचे घेण्याबद्दल आम्ही बिलकुल जबाबदार होणार नाहीं व त्याची जबाबदारी आम्हावर राहाणार नाहीं. कळावें तारीख २० माहे नोवेंबर सन १८८० इ०

(सही) गणेशदास शाळिग्राम
मारवाडी मुकत्यार निसबत चवथी बाई.

## नोटिस

रा. रामजी पाटील मुक्काम लासुर तालुके बाळापुर जिल्हे अकोले यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचा तग बाळापुर मुक्कामीं जागो नरसी या नावानें सुरू होता त्या दुकानाचे खातें तुमचे सांगितल्यावरून आमचे एथें असून त्या खात्यांत ऐन रुपये १५२॥= एकशें बावन दहा आणे शिक्ता कलदार शिवाय व्याज निघत आहे. आम्ही आपणास दोन चार वेळ सांगुन पाठविले कीं रुपये पाठविणें तरी निरोप पाठविला कीं बाळापुरीं येऊन तुमचा हिशेब पाहून बाकी चकती करून देऊं तर तुम्ही आजपर्यंत आले नाहीं व रुपयेही पाठविले नाहीं वरून आम्हास हल्लीं आपणास नोटिस देणें भाग झालें आहे तर ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत सदर्हू रुपये चुकते करून देणें नाहीं पेक्षां मुदत संपतांच रीतीप्रमाणें तजवीज करून या नोटिसीचे खर्चासुद्धां तुम्हास रुपये देणें लागतील कळावें तारीख २ माहे डिसेंबर १८८० इसवी.

(सही) पोपटलाल परशराम दुकान
बाळापुर दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार.

य सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतोल असे समजू नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

मूर्तिजापुराहून— वि. वि. तीन चार दिंवसांमागें एथें पर्जन्य चांगला पडला पिकास धक्का बसल्याचें कळलें नाहीं

शाळेचा समारंभ— ता. ३० नोवेंबर रोजीं सकाळीं ८ वाजतां एथील शाळेंत वार्षिक बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला. उत्तम रीतीची बिछाइत घालून वर खुर्च्या टेबलाच्या समोर दोन्ही बाजूंने मांडल्या होत्या. व टेबलावर शाल घालून वर बक्षिसीचीं बुकें अनुक्रमानें ठेविलीं होतीं समारंभास रा. रा. रामराव गोविंद एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर, मि० दोराबजी कावसजी तहशीलदार, रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट डिपुटी इन्स्पेक्टर, रा. रा. मातादीन चीफ कॉनस्टेबल, मि० हसमतअली डाक्टर, वकील, कारकून, शेट साहू, व इतर गृहस्थ पुष्कळ आले होते. एकस्ट्रा असिस्टंट साहेब यांस अध्यक्ष स्थान स्वीकारण्याविषयीं विनंती झाली व त्यांनीं तें स्वीकारिलें. नंतर डिपुटी इन्स्पेक्टर साहेब यांनीं शाळेची हकीकत कळविली ती अशीः—

गेल्या वर्षी या शाळेंत १३७ मुलें होतीं आणि या सालीं १६७ आहेत, म्हणजे ३० मुलें वाढलीं. गुदस्तसालीं चवथी यत्ता चालू होती यंदा पाचवे यत्तेंत मुलें आहेत यावरून व एकंदर परिक्षेचे निकालावरून या शाळेची स्थिति चढतीं पायरीवर असून सर्व मास्तरांनीं आपलें काम मेहनत घेऊन उत्तम रीतीनें केलें आहे. तें इतकें कीं त्यांनां जो हल्लीं पगार मिळत आहे तो कामाचे मानानें कमी आहे असें आम्ही समजतों. परिक्षेस १०१ मुलें दिलीं होतीं त्यांतून ६९ पास झालीं, पाचवी व चवथी यत्ता शिकविण्याचें काम एकट्या हेडमास्तराकडेच असल्यानें त्या यत्तांतून कमी मुलें पास झालीं व बाकीच्या प्रत्येक यत्तांतून निम्याहून अधिक पास झालीं. आणि पहिल्या व दुसऱ्या यत्तेंतील तर दोन तीनेच मुलें शिवाय करून सर्वच पास झालीं असें आम्ही दुसरे कोठें पाहिलें नाहीं व त्यावरून आम्हांस फार संतोष झाला. नंतर चवथे यत्तेंत ३० मुलें होतील व पाचवींत १२।१३ होतील तेव्हां एक आणखी असिस्टंट असावा व इंग्रजी शिकविण्याची तजवीज व्हावी असें स्कूल कमेटीनें डि० इन्स्पेक्टर यांस म्हटल्यावरून अर्ज करावा असें त्यांनीं सांगितलें. नंतर ए. अ. साहेबाचे हातून मुलांस बुकें बक्षीस दिलीं त्यावेळीं त्यांनीं मुलांस उत्तेजनपर चार शब्द बोलून दाखविले, व तहशिलदारांनी मास्तर लोकांचे पगार वाढविण्याविषयीं वरिष्ठांस लिहिण्याकरितां इन्स्पेक्टर यांस शिफारस केली. बक्षिसीचीं सरकारी बुकें थोडीं होतीं म्हणून मंडळीनीं आपसांत आणखी ६ रुपये जमवून एकंदर १५॥ रुपयांचीं बुकें वाटलीं.

एथें मुलींच्या शाळा नवीन झाल्या आहेत त्यांस लाकडी सामानाची जरूरी आहे तें कोणी दिल्यास फार चांगलें होईल! असें डेपुटी इन्स्पेक्टर यांनीं म्हटल्यावरून रा. रा. घासीराम गुलाबराय साहू यानीं सामानासाठीं

४० रुपये देण्याचें कबूल केलें याबद्दल सर्वांस संतोष वाटला. नंतर पानसुपारीं अत्तर गुलाब वगैरे होऊन सभा विसर्जन झाली.

या पूर्वीं डिपुटी कमिशनर साहेब व डायरेक्टर साहेब यानीं ही शाळा पाहून चांगले शेरे दिले आहेत व डि. क. साहेबानीं हेडमास्तराची व स्कूलकमेटीची तारीफ केली आहे. त्याचप्रमाणें इजुकेशनल इन्स्पेक्टर साहेबानीं ही शाळा पाहून चांगला शेरा दिला आहे. या प्रांतांत या ग्रेडच्या ज्या शाळा आहेत त्यांत या शाळेचा पहिला नंबर येईल असें ह्मणतात व यावरून सर्वांस संतोष होईल. कळावें ही विनंती तारीख १ डिसेंबर सन १८८०.

एक शोधक.

---

**वऱ्हाडसमाचार.**

मिति मार्गशीर्ष शुध्य ५ शके १८०२

---

## व्हाईसराय साहेबाचें मुंबई पुण्याकडे आगमन.

पूर्वीचे पत्रीं कळविल्याप्रमाणें नामदार लार्ड रिपन साहेब व्हाईसराय आणि गवरनर जनरल कराचीहून तारीखे २७ नोवेंबर शानिवार रोजीं सकाळीं ७ वाजतां आगबोटींतून मुंबईस आले. बंदरावर शोभा व तयारी चांगली केली होती. ते येतांच जहाजावरून ३१ व बंदरकाठीं ३१ तोफांची त्यांनां सलामी झाली. कम्यांडर इन चीफ साहेब, ब्रिगेडियर-जनरल साहेब, कौन्सलदार, हाय कोर्टाचे चीफ जस्टिस व जडज, सर जमशेटजी जीजी भाई, राव साहेब मंडलीक इत्यादि बहुत मंडळी त्यांनां आणावयास गेली होती. रस्त्यानें दोहों बाजूनें पलटणीचे लोक उभे केले होते. व पोलिसचा बंदोबस्त चांगला ठेविला होता. व्हाईसराय साहेब बंदरावर येतांच मंडळीच्या भेटी झाल्या व थोडीं भाषणें झालीं. नंतर गवरनर साहेबांच्या चार घोड्यांच्या रथांत बसून स्वारी परळावरील गेटापर्यंत सरकारी बंगल्याकडे गेली. तेथें गवरनर साहेब सामोरे आले होते.

याच दिवशीं ह्मणजे शनिवारीं रात्रीं भायखळा क्लबच्या मंडळीनें व्हाईसराय साहेबांस मेजवानी दिली. त्या प्रसंगीं गवरनर साहेब, व दुसरी बहुत युरोपियन मंडळी होती. मुख्यस्थान हाय कोर्टाचे चीफ जास्टिस सर मिचल वेस्ट्राप यांस दिलें होतें. त्यांनीं व्हाईसराय साहेबांचे संबंधानें उत्तम संभाषण केलें. व त्यावर व्हाईसराय साहेबांनीं मनोवेधक असा जवाब दिला. नंतर आणखीही कित्येक संभाषणें झालीं. व्हाईसराय साहेबांनीं पुष्कळ गोष्टी सांगण्यांत हेंही सांगितलें कीं या वेळची ही आमची मुंबईची खेप आमच्या पत्नी विलायतेहून येणार आहेत त्यांस घेऊन जाण्याकरितां मुख्यत्वें आहे.

रविवारीं ते रोमनक्यायोलिक देवाळयामध्यें प्रार्थनेस गेले होते व सेंट विन्सेंट डी पालच्या मंडळीकडून त्यांनां अड्रेस झाला व त्यावर त्यांनीं उत्तम जवाब दिला.

सोमवारीं तिसरे प्रहरीं सेक्रटरी आफिसामध्यें लेव्ही ह्मणजे धूळभेटीचा समारंभ झाला. प्रथम खानगींत कांहीं युरोपियन व नेटिव गृहस्थांच्या भेटी झाल्या. रा. बैरामजी जीजीभाई सी एस आय, मे डोसाभाई फ्रामजी सी. एस. आय, रा. ब. गोपाळराव हरी देशमुख, रा. ब विजरंग अया मुदलियार, श्री. रा. शंकरराव पंडित पंत सचीव, श्री. रा. विनायकराव भाऊ साहेब सांगलीकर, रा. सा. विश्वराथ नारायण मंडलीक, रा. रा विनायक वासुदेव, मे. सयद हसन एदरूस, मि० सोराबजी शापुरजी, रा. रा. शंकर पांडुरंग पंडित; मिरजा फजल उल्ला खान, मि. माणकजी करशेटजी, मि. महंमद अली रोगे, रा. रा. खंडेराव विश्वनाथ रास्ते इत्यादि गृहस्थ खासगी भेटींत होते. नंतर लेव्हींत युरोपियन सुमारें तीनशें व नेटिव दोनशें गृहस्थांच्या भेटी झाल्या. नंतर चेंबर आफ कामर्स सभेचा अड्रेस झाला व त्यावर व्हाइसराय साहेबांचे संभाषण झालें. मग पलटणीची कवाईत झाली. ती पाहून व्हाइसराय साहेबानीं तिची वाखाणणी केली नंतर संध्याकाळीं अफगाणिस्थानांतून विजयी होऊन आलेल्या ६६ व्या पलटणींतील लोकांस मेजवानी झाली ती पहाण्यास व्हाइसराय साहेब गेले होते व तेथें त्यांनीं संभाषण करून त्या पलटणीची तारिफ केली.

मंगळवारीं सकाळीं व्हाइसराय साहेबाची स्वारी शहर पहाण्यास निघाली होती, क्रॉफर्ड मार्केट व तेथील व्यवस्था पाहून खूश झाले. नंतर स्कूल आफ आर्ट ह्मणजे उद्योगशाळा पहाण्यास गेले. तेथील कारागिरी पाहून त्यांनीं संतोष दाखविला. दोन फूट उंचीचा एक रुप्याचा हत्ती मोठ्या नकशीचा तयार होत होता तो पाहिला आणि परत बंगल्यावर गेले. नंतर संध्याकाळीं सेंटझेवियर कालेजाचे बक्षीस समारंभाकरितां गेले. त्या कालेजाची घटणा व विद्यार्थ्यांचा अभ्यास पाहून त्यानीं आनंद प्रदर्शित केला. एका तरुण पारशी मुलानें त्यांच्या स्तुतिपर केलेल्या सुस्वर कविता ह्मटल्या. नंतर वेनिस शहरचा व्यापारी या नावाचें शेक्स्पियरचें सुरस नाटक आहे त्याचा प्रयोग विद्यार्थ्यांनीं करून दाखविला, त्या प्रसंगीं कित्येक वेळां त्यांनीं आनंदाच्या टाळ्या पिटल्या. मग कालेजाचा रिपोर्ट वाचला गेला. व त्यावर त्यानीं उत्तम भाषण केलें. नंतर बक्षिसें वाटलीं.

बुधवारीं सकाळीं ७ वाजतां विलायतची आगबोट आली तींतून त्यांच्या पत्नी मार्चीनेस आफ रिपन व चिरंजीव अर्ल डि ग्रे हे आले. त्यांकरितां व्हाईसराय साहेब बंदरावर गेले होते व त्यांनां बोटीवरून उतरतांच प्रेमपुरःसर भेटून बंगल्यावर घेऊन आले. या दिवशीं ही बंदरावर शोभा वगैरे पहिल्याप्रमाणेंच होती. नंतर तिसरे प्रहरीं व्हाईसराय साहेब, त्यांच्या पत्नी, चिरंजीव, गवरनर साहेब व कांहीं निवडक मंडळी घारापुरीचें लेणें पहाण्यास गेली. तेथें चांगली रोशनाई केली होती. सर्व पहाणें झाल्यावर तेथेंच भोजनसमारंभ होऊन रात्रीं स्वारी परत आली.

गुरुवारीं दोन प्रहरीं व्हाईसराय साहेब, त्यांचे चिरंजीव, गवरनर साहेब व कांहीं मंडळी मुंबईहून पुण्याकडे गेली. व मार्चिनेस आफ रिपन मुंबईसच राहिल्या व त्यों पांच वाजतां अलिकझांड्रिया मुलीच्या इंग्लिश शाळेच्या बक्षिसाच्या समारंभास गवरनर साहेबाच्या पत्नीसह गेल्या होत्या. तेथील स्त्रियांचा विद्याभ्यास, गायन, चित्रविद्या आणि कशिद्याचें काम पाहून फार संतोष पावल्या. व त्यांनीं आपल्या हातांनीं बक्षिसें वाटलीं. परत जातांनां तेथील स्त्रियांनीं तयार केलेले गाडींत घालावयाचे दोन सुंदर गालीचे त्यांस नजर केले व ते त्यांनीं आनंदानें स्विकारिले.

गुरुवारीं सायंकाळीं व्हाईसराय साहेबाची स्वारी खडकीचे स्टेशनावर उतरली तेथें कित्येक मंडळी त्यांस भेटावयास गेली होती व स्टेशन सुशोभित केलें होतें. तेथून गणेश खिंडींतील सरकारी बंगल्यांत स्वारी गेली.

शुक्रवारीं सकाळीं १० वाजतां पुण्याच्या सार्वजनिक सभेचे ३५ गृहस्थांचें डेप्युटेशन गणेश खिंडीवर गेलें होतें. त्यांचा व्हाइसराय साहेबानीं आदर केला. नंतर रा- ब- कृष्णाजी लक्ष्मण नूलकर यानीं सार्वजनिक सभेचा अड्रेस त्यांस दिला व त्यावर व्हाईसराय साहेबानीं उत्तम जवाब दिला. नंतर शहर पहाण्यास स्वारी निघाली ती लकडीपुलावरून नारायण पेठेंतून आपा बळवंतचे घरावरून मंडईकडून नानाफडणीसांचे वाड्यावरून बुधवार वाड्याचे मैदानांत आली. तेथें शामियाना देऊन उत्तम बैठकीचा थाट केला होता व व्हाईसराय साहेब गव्हरनर साहेबासह गाडींतून उतरून समारंभाचे जागीं गेले. तेथें म्युनिसिप्यालिटीचा आड्रेस रा. रा. महादेव मोरेश्वर कुंठे यानीं दिला व त्यावर व्हाईसराय साहेबानीं सुरस भाषण केलें. नंतर पान सुपारी होऊन स्वारी गाडींत बसली ती आदितवार पेठेंतून स्टेशनावर गेली व रात्रीं परत मुंबईस आली

शनिवारीं सकाळीं १० वाजतां कलकत्यास जाण्याकरितां निघणार होते पण शुक्रवारीं रात्रीं त्यांस थोडा ज्वर आल्यानें निघण्याचा बेत रहित झाला. आतां प्रकृती बरी होऊन आज उद्या मुंबईहून व्हाईसराय साहेब कलकत्यास परत जातील. तेथेंही त्यांचें हें प्रथमचेंच आगमन होणार आहे ह्मणून कलकत्यासही चांगला थाटमाट होईल असें प्रसिध्ध झालें आहे.

याप्रमाणें व्हाईसराय साहेबांच्या फिरण्याची ही संक्षिप्त हकीकत आहे. ती तपशिलवार लिहिली व त्यांचीं सर्व भाषणें आणि त्यांनां मिळालेले सर्व अड्रेस साग्र प्रसिध्ध केले तर एक मोठा ग्रंथ होईल. वेळ थोडा ह्मणून त्यांनां कित्येक गोष्टी करतां आल्या नाहींत. टेलिफोन कंपनीनें त्यांनां अड्रेसासाठीं विनंती केली होती तें काम त्यांनीं आपले कौन्सलर मान. गिब्स साहेबांचे जकडे सोपविलें होतें. एकंदरींत व्हाईसराय साहेब मोठे उद्योगी, चलाख, विद्वान, उत्तम वक्ते, आणि स्वभावानें नामी आहेत असें दिसून आलें. त्यांचें वय ५३ वर्षांचें आहे. त्यांचे आजे मार्गे मद्रासेस गवरनर होते वडील बोर्ड आफ कंट्रोलचे प्रेसिडेंट होते, व ते स्वतां हिंदुस्थानचे अंडर स्टेट सेक्रटरी, व स्टेट सेक्रटरी होते व प्रधान मंडळ बदललें तेव्हां त्यांनां ऐलेंडास व्हाईसराय करून पाठविणार होते परंतु चक्रवार्तीनी साहेबानीं हिंदुस्थानांतच त्यांस पाठविण्यास निवडिलें व त्यांनां हिंदुस्थानाची फार कळकळ, अगत्य व माहिती आहे, व आपल्या कडून या देशाचें जितकें बरें करवेल तितकें करण्यास आपण झटू अशीं त्यांनीं कित्येक संभाषणांत आश्वासनें दिलीं आहेत व त्या प्रमाणें ते करितील असें धोरण दिसतें. त्यांनां हिंदुस्थानांत येऊन सहा महिने झाले इतके दिवस अफगाणास्थान प्रकरणाची गडबड होती तिचें निवारण झालें आतां ते आपल्या मुख्य कामाकडे लक्ष देतील व त्यांपासून आमचे देशाचा फायदा होईल असें आह्मी इच्छितो.

---

## निजाम सरकारची वसूल संबंधी व्यवस्था.

अलीकडे कांहीं कागदपत्र प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून सदरील प्रकरणीं माहिती मिळाली आहे ती आह्मी आपले वाचकांस कळवितों.

सन १२६३ फसली ह्मणजे इसवी सन १८५३ सालापूर्वीं निजाम सरकारचे राज्यांत वसूल संबंधाची फार अव्यवस्था होती. प्रत्येक जिल्ह्याच्या जमाबंदीचे मक्ते दिले होते. ते मक्तेदार रयतेस पिळून पै ना पै वसूल करीत होते व आपलीं घरें भरीत होते. सरकार खजिन्यांत त्यांतून कांहीं रकम जमा करीत. सरकारांतही त्याबद्दल विशेष लिहिणें वगैरे नसे. खर्चाचे रकमेपेक्षां जमेची रकम फार कमी वसूल होत असे. व सरकारावर लोकांचे व सरकारी संबंधाचे कर्जाचा बोजा वर्षानुवर्ष जास्ती चढत असे. एकट्या कंटिजंटच्या पगाराची बाकी ८० लक्ष रुपये चढली होती. सावकार लोक व्याजाचा आकार रयतेपेक्षां दिढीनें सरकारांतून अधिक घेत असत. कोणा जमादाराकडून एक लाख रुपये सरकारांत कर्जी घेतले तर त्यानें जबर व्याज घेऊन शिवाय आपले दोनशेंपासून चारशें पावेतों लोक दरमहा १४ रुपये पगारानें सरकारी नोकरीवर लावून द्यावे असा शिरस्ता असे. सारांश पगारी खर्चाचें मान इतकें निकृष्ट दशेस आलें होतें कीं एकंदरींत निम्याहून अधिक पगारखर्च केवळ कांहीं उपयोगाशिवाय होत असे. हलक्या कामावरील साधारण मनुष्य देखील मनसुबीच्या डौलाचा असे, अशा अंदाधुंदीनें शेतकरी लोक धुळीस मिळून गेले होते, जमीनदार लोकांचें नुकसान होऊन ते बेदील झाले होते. शेतकी, व्यापार, आणि इतर उद्योगधंदे अगदीं मंदावले होते. फक्त तालुकदार, सरबस्तेदार, देशमुख, आणि देशपांडे यांची चंगळ होती, व ते पाहिजे तसे चरत होते. सरकार आणि रयत मात्र दिवसानुदिवस अधिकाधिक दरिद्र दशेस येत चालली होती. एके प्रसंगीं पगाराकरितां फौजेनें राजवाड्यास वेढा दिला होता, सैन्य हुकूम मानीनासें झालें होतें व कांहीं तडजोडीकरितां निजाम सरकारानें अंगावरील सात लक्षांचे दागिने गहाण टाकिले होते. हा प्रकार सालरजंग साहेब दिवाण होण्याच्या पूर्वींचा होय.

आतां जे कागदपत्र प्रसिद्ध झाले आहेत त्यांत सन १२६३ फसलीपासून सन १२८८ फसलीपर्यंत ह्मणजे अलीकडील १५ वर्षांत

या कामीं कसकशी सुधारणा झाली व तिचें काय फल झालें याजविषयीं लिहिलें आहे त्यावरून कळतें कीं सन १२६३ फसलींत जमीन बाब वसूल ६४,८५,०९९ रुपये होता तो १२७४ फसलींत १,२३,३२,३४७ रुपये झाला, व सन १२८४ फसलींत १,८४,२८,१३९ रुपये झाला. व सन १२८८ फसलीचे अजमासांत याची रकम १,८८,८२,०६१ रुपये आकारली आहे. तेव्हां २५ वर्षांत १,२९,८६,५१७ रुपयांचें जमीनबाब उत्पन्न वाढलें. ह्मणजे शेकडा २२० रुपयांचें बढतीचें मान झालें. इतर बाबीही अशाच वाढल्या आहेत. अबकारी चें उत्पन्न आरंभीं ह्मणजे सन १२६३ फसलींत पावणे दोन लक्षांचें होतें तें १२८८ फसलींत ३२॥ लाखांचें झालें. ह्मणजे शेकडा २०७५ रुपयांची वाढ झाली. कष्टम ह्मणजे जकातीचें उत्पन्न पहिलें ४॥ लक्ष रुपये होते ते सन १२८८ त ३०॥ लक्ष रुपये आकारलें आहे. व इतर किरकोळ करांचें उत्पन्न ३॥ लाखांचें होतें तें ९८॥ लाखांचें झालें आहे. याप्रमाणें राज्याची एकंदर जमा पहिली ७४,८१;७९३ रुपये होती ती सन १२८८त २,८६,४४,९२४ रुपये झाली आहे, ह्मणजे पंचवीस वर्षांत तिपटीचें मान झालें आहे.

या गोष्टी आजच निदर्शनास आल्या असें नाहीं. दहा वर्षांपूर्वीं मे० सांडर्स साहेब त्या वेळचे रेसिडेंट यांनीं ही सुधारणा कबूल केली आहे व ही होण्यास दिवाण साहेबाची कर्तबगारी व तिला रेसिडेन्सी कडील मदत मुख्य कारण आहे असें ह्मटलें आहे. हल्लीं सरकारचा खजिना चांगली भरला गेला आहे एवढेंच नव्हे तर खर्चापेक्षां ८ लक्ष रुपयांनीं उत्पन्न वाढलें आहे असें दिसून येतें. याचें मुख्य कारण हेंच आहे कीं प्रांतांतील बखेडे मोडून मक्त्यानें मामले देण्याची वहिवाट बंद केला. आतां जमा वाढविण्याकरितां खर्च वाढवावा लागतो हें उघड आहे व त्या प्रमाणें झालें आहे. पुष्कळ नवीन नेमणुका केल्या, लोकांचीं कर्जें वारलीं, देणें राहिलेल्या रकमा आदा केल्या, निजामसरकारचा खानगी खर्च नियमितपणें दिला तरी खर्चाची वाढ मूळच्या दुप्पट कांहीं झाली नाहीं. तालुक्यांतून व जिल्ह्यांतून रिविन्यू आणि जुडिशियल वेगवेगळे कामदार, सदर उलमोहिमची नेमणूक, रेलवे करण्याला भांडवल लागलें त्याचें व्याज, ती हमेशा चालविण्याचा खर्च, पब्लिक वर्क्स ह्मणजे इंजिनियर खातें, टपाल खातें, विद्या खातें, वैद्यक खातें, पोलिस खातें, आणि म्युनिसिप्यालिट्यांचें खातें, हीं अगदी स्वतंत्र झालीं आहेत व त्यांचीं कामें सुरळित चाललीं आहेत. निजाम सरकारच्या खानगी खर्चाकडे राज्याच्या एकंदर जमाबंदीच्या सुमार अष्टमांश ह्मणजे शेकडा १३ रुपये १० आणे ११ पईची नेमणूक आहे. ही बरीच जास्त आहे व हिनमध्यें सुधारणा होणें अवश्य आहे असें वाटतें. निजाम सरकारच्या फौजेमध्यें रेग्युलर आणि इरेग्युलर असे दोन प्रकार आहेत. त्यां पैकीं रेग्युलर फौजेकडे वर्षाचा खर्च २१,९१,०००रुपये, आणी इरेग्युलर फौजेकडे ४४,१५,००० रुपये आहे. रेग्युलर फौजेमध्यें हैदराबादेस असणाऱ्या दोन पलटणी धरून ४३७२ पायदळ शिपाई, १६३५ घोडेस्वार आणी ५२१ तोफखान्याकडील लोक आहेत. इरेग्युलर फौजेंत २०२७७ पायदळ शिपाई आणी ३८९६ घोडे स्वार आहेत. इरेग्युलर फौजेंत भरणा अधिक आहे व तो कमी करण्याविषयीं दिवाण साहेबाचा विचार आहे पण हत्यारें बाळगणारे बरेच लोक एकदम कमी केल्यानें गडबड व घोटाळा होईल ह्मणून हर्सें ते करीत नाहींत. त्यांच्यांतील जागा कमी झाल्या असतां त्या ते भरीत नाहींत, व पोलिसांत जसजशी लोकांची गरज लागेल तशीतशी या फौजे पैकी भरती करितात येणेंकरून थोड्या काळांत त्यांचा इष्ट हेतु सिद्धीस जाईल.

सन १२६१ फसलीमध्यें लष्करी खर्च ८१,०१,४७९ रुपये होता त्या मानानें तो हल्लीं बराच कमी झाला आहे. दुसरें एक मनसब प्रकरण तिकडे बरेंच जड आहे त्यांत छाटाछाट करावी असें दिवाण साहेबांचे मनांतून आहे. पण त्या फार दिवसांच्या दरकी नेमणुका असल्यानें तसें केल्यापासून लोकांत नाखुशी उत्पन्न होईल असा धाक आहे. तरी मागें या बाबे खर्च रुपये २३,०६,८२१होता तो हल्लीं १३६०००० रुपयेच राहिला आहे. ह्मणजे वेगळ्या उपायांनीं यासंबंधी खर्च कमी करण्याची सरकारानें तजवीज चालविली आहे. तरुण मनसबदार लोकांच्या विद्याभ्यासाकरितां एक शाळा स्थापन केली आहे तेथें त्यांस विद्या शिकवून तयार केल्यावर त्यास सरकारी हुद्याच्या दुसऱ्या जागा देतात व त्यांच्या पगारांतून मनसबी नेमणुकीचा पैसा वजा करून घेतात अशा प्रकारें सालीना दीड लक्ष रुपये या बाबेतून खर्च बाचला आहे असें कळतें.

निजाम स्टेट रेलवे तयार केली तिजबद्दलचें सरकारास २ कोटि रुपये कर्ज आहे. व शिवाय कर्ज ७७४०१६० रुपये आहे. पब्लिक वर्क्स खात्यांत ८० लक्ष रुपये खर्च झाला आहे. पोलिस खात्याकडे २० लक्ष रुपये, स्यानिटरी ह्मणजे आरोग्यरक्षक कामाकडे १६ लक्ष रुपये आणि दुष्काळाचे वेळीं लोकांचे बचावाकरितां व सरकारी जमीनीचा सारा आला नाहीं त्या करितां ४६३४००० रुपयांची रकम आहे व सरकारी नोटांकडे ४२ लक्ष रुपये गेले आहेत व सावकार लोकांचें देणें फक्त ३२४९२२३ रुपये राहिलेलें आहे तें जमेच्या मानानें सुमार नववा हिसा आहे. व दिवाण साहेब ह्मणतात कीं कांहीं आकस्मिक खर्च पुढें आला नाहीं तर दोन वर्षांत हें कर्ज फिटणार आहे.

याप्रमाणें निजाम सरकारच्या वसूलसंबंधाची हकीकत आहे ती वाचिली व चांगली मनन करून पाहिली तर निजाम सरकारच्या राज्याची मोठी सुस्थिति व तिचें दिवसानुदिवस पुढें पाऊल आहे असें समजून येईल व तेणेंकरून सर्वांस आणि आमचे वऱ्हाडवासी प्रजेस अत्यंत संतोष होईल यांत संशय नाहीं.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत हवा फार चांगली झाली आहे. थंडी पुष्कळ पडते. पण अकाळीं पाऊस पडल्याचे योगानें सीतज्वराचं आजार बरेच उद्भवले आहेत.

खामगाव सब डिव्हिजनचे एक्झिक्युटीव इंजिनियर मि. हिगिन साहेब यांस जळगाव तालुक्यांत झिरी देऊळगावच्या रस्त्याची सरव्हे करण्याकरितां पाठविलें आहे. व त्यांचें काम ३ महिने पावेतो रा. रा. कृष्णाजी दिनकर सब इंजिनियर यांस पाहण्यास नेमिलें आहे. त्याप्रमाणें ते आपलें काम संभाळून दुसरे तारखेपासून त्या डिव्हिजनचेंही काम पाहू लागले असें समजतें.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं यंदाच्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या एम एच्या व एल एल बीच्या परिक्षेंत मिळून वऱ्हाडांतून गेलेले तीन गृहस्थ पास झाले. रा. रा. आबाजी खंडेराव दिवेकर एथील वकील यांचे चिरंजीव रा. रा. बळवंत आबाजी दिवेकर व आबाजीचे जामात आणि रा. रा. बळवंत नरसिंह मुधोळकर इलिचपुरचे डिपुटी इन्स्पेक्टर यांचे बंधू रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर हे उभयतां गृहस्थ एल एल बी झाले. व रा. रा. सदाशिव विष्णु भागवत लोकलफंड ओव्हरसियर यांचे भाचे रा. रा. गोपाळ गणेश आगरकर हे एम ए झाले.

इलिचपूरचे क्लार्क अफ कोर्टचे जागेवर उमरावतीचे डिपुटी क्लार्क रा. रा. गणेश बापुजी यांस नेमिलें.

अलीशान रेसिडेंट साहेब व्हाईसराय साहेबांस भेटण्याकरितां मुंबईस गेले आहेत. व रोबर मेजर ट्रेव्हर साहेब असिस्टंट रेसिडेंटही गेले आहेत. ते गवर्नर साहेबाचे पाहुणे आहेत. व्हाईसराय साहेबाचा शनिवारीं मुंबईहून निघण्याचा बेत त्यांस थोडा ज्वर आल्यावरून रहीत झाला. आतां आज उद्या ते तेथून जातील व रेसिडेंट साहेबाची स्वारीही माघारी जाईल असें वाटतें.

कमिशनर साहेब बाळापुराकडे, जुडिशियल कमिशनर साहेब वाशिमाकडे, डायरेक्टर साहेब उमरावतीकडे स्यानिटरी कमिशनर साहेब जळगावाकडे, डिपुटी कमिशनर सा. अकोटाकडे, इजुकेशनल इन्स्पेक्टर साहेब वणीकडे, व डिपुटी इन्स्पेक्टर खामगाकडे आहेत.

पुणेंकर रा. रा. बापुराव नारायण वैद्य एथें आले आहेत. व त्यांचा एथें कांहीं दिवस रहाण्याचा विचार आहे. तूर्त विन्हाड स्टेशन मास्तर यांजकडे आहे. तरी गावांतील मंडळीच्या सोयीकरितां ते इकडे जागा घेणार आहेत. वयानें पोक्त असून अनुभवीक व हुशार आहेत, आणि त्यांजपाशीं औषधी फार चांगल्या आहेत असें आमचे समजण्यांत आलें आहे.

रा. रा. हणमंतराव रामचंद्र रजेवर असलेले तहशिलदार या महिन्याचे आरंभीं रुजू होणार होते पण तसें झाल्याचें दिसत नाहीं. सरकार त्यांस रुजू करणार किंवा खात्रीलायक प्रकृती नाहीं असेंच ह्मणणार तें समजत नाहीं. त्याची प्रकृती बरी आहे असें आह्मी ऐकतों.

वाशिम जिल्ह्यांतील रजेगावचे पोस्टमास्तर ऑफिस बंद करून तें तामगाव तालुका जळगाव एथें पहिले तारखेपासून सुरू केलें आहे.

औरंगाबादचे पोस्ट मास्तर मि० मेब्री साहेब तीन महिन्यांचे रजेवर जाणार आहेत.

वाशिम—( मित्राकडून )ता १ डिसेंबर गेल्या आठवड्यांत पावसानें फारच गर्दी उडविल्यामुळें जवारी वगैरे पिकाचे जरी नुकसान झालें नाहीं तरी जी जवारी सुरेख पांढरी यावयाची ती लाल, काळी अशा रंगाची येईल. कापसाचीं बोंडें पावसामुळे गळून पडलीं तरी दुसरा बार चांगला येईल असें शेतकरी लोक ह्मणतात. रबीचे पिकास तर हा पाऊस फार चांगला झाला. भाताचीं शेतें लोक पुन्हा तयार करून त्यांत हरबरा वगैरे पेरण्याचे तयारीस लागले आहेत हवा चांगली झाली आहे.

मे० फ्यारर साहेब नवीन डिपुटी कमिशनर यांनीं चार्ज घेतला व कालपावेतों येथेंच काम करून नागरदासाचे यात्रेकडे गेले. यात्रेंतही पावसामुळें लोकांचा माल वगैरे भिजला व अतिशय नासाडी झाली या सालीं यात्रा असावी तशी नाहीं.

हैदराबाद येथें गुरुवार ता. २५ नोवेंबर रोजी रेसिडेन्सींत मोठा बाल झाला. त्यांत निजामसरकार खुद्द गेले होते. रेसिडेन्सींतें निजामसरकारची स्वारी आजपर्यंत कधीं गेली नव्हती ह्मणून सर्वांस फार संतोष झाला. बरोबर दिवाण साहेब, अमीरी कबीर साहेब व पेशकार साहेब होते व इतर मंडळी होतीं. रेसिडेंट साहेब गाडीपर्यंत घेण्यास व परत पोचविण्यास गेले होते. पुरी सलामी झाली व निजाम सरकारचा मोठा मान सन्मान झाला. व आनंदाचा थाट झाला. सरकार एक दोन तास तेथें होते. व एकंदर कर्मणुकीनें खुष झाले. शहरांत अडाणी लोक बोलू लागले कीं आजपर्यंत आमचे सरकार रेसिडेन्सींत कधीं गेले नाहींत तेव्हा काय प्रकार आहे कोण जाणे! परंतु तेथील थाटमाट पाहून त्यांची खात्री झाली कीं ही मेजवानी आहे. निजामसरकार फार चलाख व हुषार दिसतात व चांगली शिकार करितात. सरकार स्वारी या मेजवानीचे रात्रीं मेजर कुक साहेब यांजबरोबर बिलियर्डचा खेळ खेळली तोही खेळ त्यांनां उत्तम प्रकारचा समजतो.

अलीशान रेसिडेंट साहेबांची स्वारी ३० वे तारखेस मुंबईकडे नामदार व्हाईसराय साहेब यांचे मुलाकतीस जाणार होती. परत येण्यास सुमार एक आठवडा लागेल.

वऱ्हाडांत असिस्टंट पोलिस सुप्रिंटेंडेंटची जागा होणार ती एका अस्याचीस देतील अशी बातमी होती पण आतां असें ऐकतों कीं, विलायतेस असलेल्या एका पार्शी गृहस्थास ती जागा मिळणार आहे.

मि० टी. रंगराव साहेब अस्याची यांस त्यांचे वडील बडोद्याकडे एका मोठ्या हुद्यावर नेणार असें ऐकण्यांत आलें आहे.

रतलामचे दिवाण खान बहादूर शहामत अलीखान सी. एस. आय यांचे चिरंजिवास वऱ्हाडांत एक मोठी जागा मिळण्याचें घाटत आहे.

## वर्तमानसार,

आयुबखानास हिरात एथें अधिकाधिक अडचणी येत आहेत आणि कंदाहारच्या लोकांस असें वाटूं लागलें आहे कीं इंग्लिशानीं आयुबखानाबरोबर तह केला आहे आणि लोक जमीनीची लागवड करूं लागले यावरून अफगाणिस्थानांत आणखी बरेच दिवस लढाई होणार नाहीं असें दिसतें.

दुल्सिग्नो एथें तुंबळ युद्ध होऊन उभय पक्षाकडील पुष्कळ लोक पडले व नुकसान झालें असें कान्स्टांटिनोपलच्या ता. २९ नवंबरच्या तारेवरून समजतें.

श्री. होळकर सरकार यांची प्रकृति बिघडली असून ते हवा बदलण्याकीरतां दक्षिण प्रदेशीं जाणार आहेत असें समजतें-

काश्मीर प्रांतांतील बंडाच्या संबंधानें असें कळतें कीं गिलगिट प्रांतांत स्वस्थता असून लोक दंगा करतील असा संभव दिसत नाहीं. कर्नल टान्नर श्रीनगरास पोंचले. मेजर बिडल्फ यांजवरचें संकट दूर झालें, कारण बंडावा करणाऱ्यांचे मुख्य पाहिलवान बहादर हे पळाले असें समजतें. काश्मीरची १३ हजार फौज चाल करून जात आहे.

विलायत सरकारानें कंदाहार येथील सैन्यास कंदाहार सोडून तजावेजीनें तावडतोब निघून येण्याचा हुकूम पाठविला असें बां. ग्या. कर्ते ह्मणतात. या पुढें इंग्रजांचें मुख्य ठाणें क्वेट्यास राहील.

हिंदुस्थानांतील कातडी व सागळी यांचा व्यापार अधिकाधिक वाढत आहे. विलायतेस व युरोपांतील इतर देशांत कातडीं येथून पुष्कळ जातात. गेल्या एक्या महिन्यांत नुस्ते मद्रासेहून १० लक्षांचीं कातडीं रवाना झालीं असें समजतें.

इंग्रज सरकारच्या ताब्यांतील हिंदुस्थानांतील मुलखांत एकंदर १९०८६२५३७ प्रजा आहे त्यांजपैकीं ९८०५५३८१ पुरुष व ९२५८०८८६ बायका आहेत यांजपैकीं बारा वर्षांच्या आंत ३५७८७५६४ मुलगे व ३११८२२०० मुली आहेत असें समजतें.

यंदाच्या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत मिठाबद्दल एकंदर १३६१७००० रूपये उत्पन्न झालें. गतवर्षीं या सहा महिन्यांचे ३१८३५००० रुपये उत्पन्न झाले होते असें समजतें.

हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या मालापैकीं फक्त तांदुळावर मात्र जकात आहे आणि या जकातीचें गेल्या मार्च अखेर वर्षाचें ५९ लक्ष रुपये उत्पन्न झाल्याचें कळतें

भोपाळ स्टेट-रेलवेचें काम करण्याचा मक्ता मेसर्स ग्लवर आणि कंपनी या मक्तेदारास मिळाल्याचें समजतें.

सरकारी कामदारांच्या फिरण्याबद्दलच्या भत्याबद्दल हिंदुस्थान सरकारानें नवीन ठराव केला आहे. मैली तीन आणे मिळत होते त्याजबद्दल पहिल्या क्लासाच्या रेलवेचे भाड्याच्या दुप्पट आणि दोड आणा मैलाच्या मोबदला दुसऱ्या क्लासाच्या भाड्याच्या दुप्पट याप्रमाणें आतां भत्ता मिळेल.

आयुबखान हे हत्यारें जमविण्यांत आणि नवीं करण्यांत अगदीं गुंतले आहेत असें त्यांनीं आपले घरगुती दागिने नाणीं पाडण्याकारितां मेशेद एथें पाठविले त्यानीं शींयाकडे मदत मागण्याकारितां आपले तीन वकील पाठविले होते त्यांस शहानीं तेहरानास पाठविण्याचा हुकूम केला असें कंदाहारच्या १९ नोवेंबरच्या तारेवरून समजतें.

वेडा न्हावी—मद्रासचे गव्हरनर डयूक आफ बर्किंघम हे थोड्या दिवसापूर्वीं रेलवेनें त्रिचनापली स्टेशनावर आले तेव्हां त्यांच्या गाडीजवळ एका न्हाव्यानें जाऊन त्यांस एक अर्ज दिला. त्यांत असें लिहिलें होतें कीं, प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत आले होते तेव्हां त्यांनीं मद्रासच्या गवरनरची जागा मला देऊं केली होती, ती मिळेल ह्मणून पुष्कळ दिवस वाट पहात आहे, तरी मिळत नाहीं ह्मणून हो पुनः सूचना करित आहे. ते अर्ज वाचल्यावर त्यास एकदम पोलिसाच्या स्वाधीन केलें परंतु तो वेडा आहे असें आढळल्यावरून पुनः सोडून दिलें. ने. ओ.

बडोदें संस्थानचे दिवाण राजे सर. माधवराव याणीं आपल्या देशीं जाण्याकरितां ३ महिन्यांची रजा घेतली.

रा. ब माधवराव गोविंद रानडे फ० क्ला० सब् जज्ज यांस ज्वर येत असल्या कारणानें हवा बदलण्यासाठीं ते रजा घेऊन धुळ्याहून गेल्या बुधवारीं पुणें येथें गेले.

मे० जे बी. पिल साहेब हे विलायतेहून परत येऊन त्यांनीं मुंबई सरकारचे पोलिटिकल व ज्युडिशियल खात्याच्या सेक्रेटरीचे कामाचा चार्ज घेतला.

येत्या फेब्रुवारी महिन्यांत जी बडी खानेसुमारी होणार ती ता० १७ रोजीं होईल व त्या संबधानें ३ दिवस ह्मणजे ता० १६।१७।१८ फेब्रुवारी रोजीं सरकारी सर्व आफिसांत सुट्टी देण्यांत येईल. आफिसचे मुख्य अधिकारी याणीं जरूरीच्या कामापुरती व्यवस्था ठेवून बाकी आपापल्या हाताखालील नौकर लोकांस खानेसुमारीच्या कामगिरीकडे द्यावें. व त्यांनीं तें काम करावें अशा विषयीं मुंबईच्या गेल्या सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध झालें आहे.

स्टांप कागदावर दोन्ही बाजूंस लिहिण्याची वहिवाट आजपर्यंत चालू आहे, परंतु या पुढें स्टांप कागदावर फक्त शिक्याचे बाजूसच लिहित जावें दुसऱ्या बाजूनें ह्मणजे शिक्यांच मागील बाजूस बिलकुल लिहीत जाऊ नये अशा विषयीं सरकारानें पूर्वी ठराव प्रसिद्ध केला होता, तशी सररास वहिवाट सुरू झाली नसल्यामुळें मुंबईच्या गेल्या सरकारी ग्याझिटांत पुनः एक ठराव प्रसिद्ध झाला आहे. या ठरावाकडे स्टांप कागदावर दस्ताऐवज लिहिणाऱ्या लोकांनीं लक्ष पुरवावें.

सातार जिल्ह्यांत एकंदर किती वकील आहेत याची माहिती सरकारानें मागितल्यावरून त्या जिल्ह्यांत १२ कोर्टांतील मिळून ९२ आहेत असें लिहून गेले आहे वकिलांची संख्या जास्तं वाढल्यामुळें तूर्त ही परीक्षा महकूप करण्याचा सरकारचा विचार दिसतो.

एका शेतकऱ्यानें शेत लावलेल्या आपल्या जमनींत एक मेख पुरून ठेविली होती व ती माझ्या मुलाच्या पायास लागून जखम झाली अशाबद्दल दुसऱ्या एकानें शेतकऱ्यावर ३० रुपये नुकसानीचा दावा केला व शेतकऱ्यास आपल्या शेताच्या बचावाकरतां तशा मेखा मारण्याचें अवश्य असून इजा झालेल्यानें शेतकऱ्याची परवानगी घेतल्यावांचुन तेथें जावयाचें नव्हतें असें ठरवून खालच्या कोर्टानें दावा रद्द केला, पण अपिलांत ज्यांच्या योगानें लोकांस इजा होण्याचा संभव आहे अशा शेतकऱ्यानें शेतांत मेखा मारून ठेवणें फार वाईट आहे असें ठरवून अपील कोर्टानें दावा देवविला असा एक ब्रिटिश ब्रह्मदेशांतला खटला प्रसिद्ध झाला आहे.

वेंगुर्लें येथें गेल्या आठवड्यापासून गोमांतकांतील चमत्कारिक बातमी पसरली आहे ती येणेंप्रमाणें:—गोमांतकांतील साष्टी प्रांतांत एका गांवीं एका वाटेनें ८।१० वर्षांची मुलगी जात असतां एका झाडांतून असा शब्द निघाला कीं, मीं तुझ्या बरोबर येऊं काय! ते शब्द ऐकतांच ती भ्याली, आणि तिनें ही हकीकत आपले बापास कळविली. त्यावरून बापानें तीस आपण बरोबर येतो, त्या वाटेनें पुनः जा, व मागच्याप्रमाणें शब्द झाला असतां 'ये' असें बोल. याप्रमाणें सांगून बापाबरोबर ती मुलगी त्या वाटेनें गेली. तेव्हां वरीलप्रमाणें शब्द होतांच मुलीनें ये ह्मणून सांगितलें; तेव्हां एक मोठा लांब सर्प झाडांतून निघून मुलीस वेष्टण देऊन मुलीवर छत्रादाखल आपली फडा उभारून राहिला. तेव्हां मुलीनें व बापानें ओरडाओरड केल्यावरून पुष्कळ मंडळी जमून ही बातमी सरकारपर्यंत गेली, तेव्हां सरकारांतून शिपाई वगैरे येऊन बंदुकीच्या गोळ्या त्या सर्पावर सोडल्या; परंतु लागू होईनात तेव्हां ती मुलगी "तुह्मी विनाकारण कां मारितां" असें बोलल्यावरून तूं कोण ह्मणून विचारतां आजपासून पंधरावे दिवशीं सांगेन ह्मणून बोलली त्यास आज ता० १८ नोवेंबर हा पंधरावा दिवस आहे. ती मुलगी कांहीं खात नसून सर्पही तिच्यावर छत्र धरून तसाच आहे. अशी दाट बातमी पसरली आहे, व याप्रमाणें आपण पाहिल्याचें कांहीं लोक सांगतात यांत खरेपणा कितपत आहे हें आज आमच्यानें सांगवत नाहीं. ज्ञा. प्र.

अलीकडे आरब लोकांच्या टोळ्या रेलवेतून वगैरे फिरूं लागल्या आहेत. ह्या टोळ्या मोटमोठ्या स्टेशनावर न बसतां मध्येंच कोणत्या तरी स्टेशनावर जाऊन बसतात व त्याप्रमाणेंच उतरून फिरतात. गेले सोमवारीं सुमारें ५०।६० लोकांचे एका टोळीस सोलापुर एथील पोलिसांनीं अटकाव केला होता व तिचा योग्य तपास होईपर्यंत आपल्या ताब्यांत ठेविलें होतें.

सोलापुर एथें इंजिनियर खात्याकडे एक साहेब बहादूर आठ रुपये पगारावर नोकरीस राहून काम करीत आहेत तेव्हां आमचे नेटिवानीं आपले नशिबास हात लावून ढोळे कां चोळावे?

मि० लशिंगटन अलाहाबादचे माजी जडज हे ह्या देशांत ३५ वर्षें नोकरी करून पेनशन घेऊन विलायतेंत गेले ते हल्लीं तेथील शेतकीच्या कालेजांत शेतकीचे शास्त्रोक्त शिक्षण मिळविण्याकरितां विद्यार्थी बनले आहेत ! धन्य आहे या लोकांची ! ! !

प्र. सिं.

प्रवासखर्च— हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल यांस सालीना ५,९२,३२० रुपये, बंगालचे लेफटनेंट गव्हरनरास ३४,७६० रुपये; वायव्य प्रांतयाचे लेफटेनेंट गव्हरनरास ९,९३०; पंजाबचे लेफटनेंट गव्हरनरास ५,६१,२१० रुपये; मद्रासचे गव्हरनरास ११,९४० रुपये; आणि मुंबईच्या गव्हरनरास ४०,२७० रुपये; याप्रमाणें दरसाल प्रवास खर्च होत आहे.

चीन देशाची लोकवस्ती एकंदर ४०००००००० आहे. यांपैकीं मुसलमानी धर्मांचे लोक २०००००० आहेत

मद्रासचे भावी गव्हरनर रा. आ. डब्ल्यू पी. आडम हे गेले शुक्रवारीं या देशीं येण्यास विलायतेहून निघाले.

डायरेक्टर साहेबांचा रिपोर्टः— सन् १८७९–८० सालचा मुंबई इलाख्याचा विद्याखात्याचा जो वार्षीक रिपोर्ट नुक्ताच प्रसिद्ध झाला आहे त्यावरून असें कळतें कीः- २५,८१,९९९ रुपये उत्पन्न झालें व खर्च भागून १,६८,८२५ रुपये शिल्लक राहिले १८७६-७७ सालीं १४ शाळा व १२७१ विद्यार्थी कमी झाले. तसेंच १८७७-१८७८ सालीं ४७ शाळा व १३०१ विद्यार्थी कमी झाले. कारण तीं दुष्काळींचीं वर्षें होतीं, आतां १८७९ सालीं शाळांची संख्या १८८ नीं कमी झाली. सरकारी शाळांतून म्याट्रिक्युलेशन परिक्षेस गेलेल्या उमेदवारांची सरासरी शेंकडा ४८-७६ व खाजगी शाळांतून गेलेल्यांची सरासरी ४१-९० या प्रमाणें आहे, व सरकारी शाळांत मुसलमानांची संख्या २४,५४५ होती. ती आतां २९,४७८ झाली आहे.

बारशी पासून पंढरपूर, पिलिवें, वडूज, खानापूर व तासगांव या गांवावरून नवीन एक रेलवेचा रस्ता मिरजेकडे जाणार आहे व त्याचा एक फांटा साताऱ्यास येणार आहे. या प्रमाणें रेलवे झाली असतां व्यापारास उत्तेजन येऊन लोकांस ही सुखावह होईल.

पंढरपूर— साल मजकूरचे कार्तिकीस सुमारें ५०-६० हजार यात्रा जमून कमिटीस अजमासें १२००० रु. उत्पन्न झालें.

अपूर्व देहें- पंढरपुरीं यात्रेचे दिवसांत कांहीं पाहण्यासारखीं चित्रें वगैरे येतात, त्यांत एक मद्रासचा माणूस आला आहे. तो आह्मी समक्ष पाहिला. त्याची उमर सुमारें सोळा सतरा बर्षांची असावी असें त्याचे चहऱ्यावरून दिसतें. परंतु त्याचें पोट व हातपाय इतके मोठे आहेत कीं, पोट एक दोन बैलांची मोट ह्मटलें तर सहज शोभेल, हात ज्वानींतल्या मनुष्याच्या मांड्या येवढे आहेत, व पायांचाहि आकार त्याचप्रमाणें आहे. मुलगा उभा राहिला असतां पोटाचें पोंक गुडघ्यापर्यंत पडतें, सबब दोन चार पावलांखेरीज अधिक चालवत नाहीं.

ता० २१ नोवेंबर रविवारीं रात्रीं साडेनऊ बाजण्याचे सुमारास नगरास एक मोठा तारा पडला नंतर थोड्या अवकाशानें मोठा आवाज झाला. आणि त्याचा प्रकाश चंद्रोदयाप्रमाणें होता. सदहू वेळेस पुणें, मुंबई वगैरे ठिकाणींहि तारा पडल्याचें तिकडील पत्रावरून समजतें. तेव्हां तो हाच असावा. इतक्या मोठ्या प्रकाशाचा तारा या प्रांतीं बहुत दिवसांनीं पडला आहे. न्या. सिं.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १८ अकोला, सोमवार तारीख १३ माहे डिसेंबर सन १८८० इसवी अंक ४९


## वऱ्हाड समाचाराचा [illegible]

वर्षाचे अगाऊ ७
साल अखेर
किरकोळ अंकास ०४
डाक हशिल.
[illegible] अगाऊ ४८
,, ,, अखेर २
नवीन वर्गणीदार [illegible] लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल

## नोटिस [illegible].

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर

सर्वत्र लोकांस खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते की कसबे जामोद तालुके जळगांव जिल्हे अकोला या गावी मयाराम छोटुलाल या नावची सावकारीची आमची दुकान असोन मयाराम हे मेत झाले आहेत. मयाराम याची शरीरस्त्रायको चवथी बाई ह्मणजे मयाराम ही असून तिचा नवरा ह्मणजे मयाराम हा मेत झाल्यावर दुकानचे नांव जें पूर्वी मयाराम नथमल या नावचें होतें तें बदलून वर तिनें नांव मयाराम छोटुलाल दाखविलें आहे तें ठऊन आपले तर्फे दुकानचें काम करण्यास व इस्टेटीची व्यवस्था पहाण्यास नोकर या नात्याने छोटुलाल नंदराम मारवाडी याजला नेमिलें होतें व त्या नोकराचें वर्तन वगैरे चांगले दिसल्यावर त्याजला कुलमुखत्यार पत्र देण्याचें ठरविलें होतें पण सदर्हु नोकर छोटुलाल याणें बाईच्या मर्जीप्रमाणें न वागतां कपट करून मला मेताचे बायकोनें दत्तक घेतलें आहे व मी मालक आहे असें सर्वत्रास खोटें भासवून आपला बराच फायदा करून घेतला ही गोष्ट आमची मालकीण चवथी बाईचे जेव्हां समजण्यांत आली तेव्हांच अशा कपटी मनुष्यास तिणें आपले दुकानावरून काढून दिलें आहे व मजला कुलमुखत्यारपत्र दिल्यावरून हल्लीं मी त्या दुकानचें सर्व काम पाहात आहे. बाईतर्फे सर्व दुकानची व्यवस्था पाहाण्याचा अधिकार मला असल्यामुळें मी बाईच्या आज्ञेनें सर्वत्रास असें कळवितों कीं ह्या नोटिसीचे तारखेपासून आमचे दुकान च्या संबंधानें ज्या ज्या लोकांकडेस आमचें घेणें असेल त्या त्या इसमांनीं सदर्हु काढून दिलेला छोटुलाल मारवाडी यास कांहीं एक पैसा देऊं नये किंवा त्याची पावती घेऊं नये त्याचा या दुकानासी अर्थाअर्थी कांहीं संबंध राहिला नाहीं व त्याजला बाईने दत्तकही घेतला नाहीं. ह्या नोटिसीनंतर जो कोणी असामी आमचे दुकानचे संबंधाचा पैसा छोटूलाल याजला देईल तर तें देणें आमचे घेण्यांत मजरा धरलें जाणार नाहीं व कायदेशीर होणार नाहीं. त्याची सर्व जबाबदारी सदर्हु इसमास पैसा देणारावर राहील. सारांश ह्या नोटिसीनंतर छोटूलाल याणी आमचे दुकानचे संबंधानें जो ह्मणून कांहीं व्यवहार होईल तो सर्व निरर्थक समजण्याचा आहे तसेंच ज्या ज्या व्यापारी अगर शेटसाहु लोकांचि आमचे कडेस घेणें असेल त्यांणीही ह्या नोटिसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत खाली सही करणाराकडे कसबे जामोद या गांवीं आमचे दुकानीं येऊन आपलें घेणें रुजू करून घ्यावे तसें न केल्यास नोटिसीच्या मुदती नंतर जर कोणी आपले घेण्याचें मागणें करील तर त्याचे घेण्याबद्दल आह्मी बिलकुल जबाबदार होणार नाहीं व त्याची जबाबदारी आह्मावर राहाणार नाहीं कळावें तारीख २० मांह नोवेंबर सन १८८० इ०

( सही ) गणेशदास शालिग्राम
मारवाडी मुकत्यार निसबत चवथी बाई.

## नोटिस

भगवंत महादेव कुलकर्णी [illegible] रखड तालुके अकोट यास जगन्नाथ बलदेव दास साहू दुकान तेल्हारे कळविण्यात येतें कीं. गाहाणावर तुमचे कडून रुपये येणें आहेत ते रुपये व्याजासुद्धा पटविण्याविषयीं तुह्मास पुष्कळ वेळ तगादा पाठविला परंतु रुपये पोंचविले नाहीत. हल्लीं नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आत व्याजासुद्धा रुपये पटवावे न पटविल्यास रीतिप्रमाणें तुह्मावर फिर्याद करून कोर्ट खर्चासुद्धा घेण्याचे फेडींत गाहाण माल हरास करून आदाई करून घेऊ कमती राहिल्यास तुमचे अंगावर हुकुमनामा बजावू. तारीख २८ माहे दिसेंबर १८८०

( सही ) जगंनाथ बलदेवदास
साहु दुकान तेल्हारे
दस्तु खुद्द

## नोटिस.

सजी मर्द बाळाजी सुतार रहाणार मौजे निरोड तालुके खामगाव हल्लीं वस्ती टेंभुरणें तालुके खामगाव (विष्णाजी सुताराचे घरीं ) इला बाळजी वल्द एकोबा सुतार रहाणार जनुनें तालुके खामगाव याजकडुन नोटिस देण्यांत येते कीं तूं मोकळे होण्याचे इरादानें मला नोटिस दिली पण अशानें तूं कधीं मोकळी होणार नाहींस. मी पुरुषांतनाहीं ह्मणून तूं हल्लीं नोटिशींत लिहितेस पण मी अजूनही तुझ्या सारख्या तीन बायका करण्याची उमेद ठेवितो तुझे बापाचे मनांत असें असावें कीं तुझे अंगावरील डागिने वगैरे फस्त करून मुझे दुसऱ्याशी गंधर्व करून द्यावें व त्याजपासून शे दोनशे रुपये खावें पण यांत तुझें हित नाहीं. तुला संसार होण्याची आशा असल्यास ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझा घरच्या सर्व डागिण्यासह माझे घरीं परत ये. याप्रमाणें तूं न आल्यास कायदेशीर रीतीनें तुला नांदेत नेण्याची वजवीज करीन. पण फारकत कधीं देणार नाहीं. हें पक्के समज. कळावें तारीख ८ दिसेंबर १८८० इस्वी.

( सही ) बाळाजी वल्द एकोजी सुतार
दस्तुर खुद्द

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

मुक्काम रिसोड ता. ३०–११–८०

वि. वि. पर्जन्य काळीं पावसानें फार आढाताण करून लोकांचे डोळे पांढरे केले होत. परंतु आतां मोठें औदार्य धरिलें आहे आठ दहा दिवसांपासून इतका झपाट्यानें पाऊस पडतो कीं खरीपाच्या पिकांची मृत्तिका झाली. जवारीचे दांडे जमीनीवर पडून धान्यास मोड आले. कपाशी अगदीं वाईट झाली. ज्यांचें कपाशीचें मोठें उत्पन्न त्यांच्या स्वस्ताई झाली ह्मणून गरीबा गुरीबास- आनंद होऊन गेला आहे परंतु शेती लोकांस मोठें दुःख झाल्याचे उद्गार ऐकूं येतात. स्वस्ताई झाली यामुळें सरकारी सारा भरण्यास सर्व शेताचें उत्पन्न भरीस घातलें तरी कठीण पडतें. पूर्वी रिसोड मावि एक मण गहू विकले असतां ४० रुपये येत असत आतां साहुकार लोक १० रुपये मण मागतात. खचीत धान्य विकून ज्यांस दस्त द्यावा लागतो त्यांचें मोठें दैन्य आहे. दोन दिवसांपासून पाऊस कमी होऊन गेला आतां कृपा करील तर बरें असें सर्व लोक ह्मणतात "वरातं मागून घोडें,, याप्रमाणें पर्जन्यानें मांडलें आहे. पूर्वी न पडून लोक रडले आतां पडून रडतात. कोणीकडून दगदग जात नाहीं.

हल्लीं खानेसुमारीचें काम झपाट्यानें चालू आहे. पाटील पांडे सुपरवायझर व सुपरिंटेंडेंट जिकडे तिकडे नंबर पाहत फिरतात. मेघराजानें लाविलेले नंबर खराब केले यासाठीं दुप्पट मेहनत पडत आहे. सरक्युलरें संदिग्ध असल्यामुळें निरनिराळा समज होऊन पुनः पुनः नंबर पुसले गेले. आमच्या गावचे सरकारि नोकरांपैकीं चिफकानस्टेबल व हेड मास्तर यांस रिसोड पोलिस स्टेशनचे भागांत सुपरिंटेंडेंट नेमिलें आहे. यांस गांवें फिरून नंबर तपासावे लागतात. चीफ यांस नेहमी फिराव्याचें असतें यामुळें त्यांस फार कठीण पडेल असें नाहीं, परंतु हेड मास्तरास कठीण पडतें. घोडें ना गाडें. बिचारा कसा तरी फिरतो.

एथील शाळेची वार्षिक परीक्षा झाली. ५१ मुले पास झालीं असें ऐकतों. इतकीं मुलें कधींच पास झालीं नव्हतीं. शाळेंतील मास्तर लोकांत अझून सफाई नाहीं. एकाचें तोंड पूर्वेस तर एकाचे पश्चिमेस असा प्रकार चालू आहे असें दिसतें. इतक्या दिवस शाळा चालली असून आतां बिघडली असें सर्वेतो मुखीं झालें आहे. एक दोन महिन्यांत एका एकीं असें होण्याचें कारण काय झालें असावें तें समजल्यावर कळवीन दोघांचें भांडण व आह्मी जे रिसोडस्थ तिराईत यांचा नाश कशाकरितां हें नशीबास विचारलें पाहिजे.

या प्रांतांत लोणी एथें सखाराम मास्तर या नावचे एक साधू होऊन गेले. त्यांस समाधिस्थ होऊन २ वर्षें झालीं ते जिवंत असतां त्यांचा महिमा मोठा होताच व हल्लींही त्यांचें महात्म फार वाढत चाललें आहे. त्यांचे निःसीम भक्त या गावीं पुष्कळ आहेत व त्यांत प्रल्हाद भट जोशी व बळवंत पेंडगे हे मुख्य होत यांच्या मदतीनें महाराजांच्या समाधी बांधण्याच्या कामीं एथें बराच पैसा उत्पन्न झाला महाराज नवसास पावतात अशीही ख्याति आहे. त्यांची पुण्यतीथ कार्तिक वद्य १४ स असते. तिकडे लोक फार जाऊं लागले आहेत. दोन तीन हजार लोकांचा समाज जमतो.

एथें पोस्टांत मागें तंटा होता. त्या पोस्टमास्तराची राजगावास बदली झाली. हल्लीं अस्टातेल भांडण अगदीं मोडलें परंतु जुन्या लोकांपैकीं एक इसम एथें राहिले आहेत. हे गावांत पत्रें वाटणारे होत. याचें नाव आनंद भट. हे दोनही कामें ह्मणजे भिक्षुकीचें व पत्रें वाटण्याचें करितात. यांचें घर याच गावीं आहे. यांच्यावर फार लोक नाखुष असतात परंतु यांस वशीला चांगला असल्यामुळें यांची बदली एथून व्हावयाची नाहीं असें लोक समजतात. कळावें

आपला दास
एक रिसोडकर क्ष.

## महानुभाव पंथ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. कृतयुगरचनाकाळीं जो क्षराक्षरपर उत्तम पुरुष भगवान तो जीवोद्धारणार्थी कैवल्यपद प्राप्त्यर्थी त्रिगुणातीत ज्ञान प्रगटार्थी जंबुद्वीपीं भरतखंडीं बद्रिकाश्रमीं धर्मकविग्रहीं नारायण नर प्रवर प्रशांत ऋषि या पंच मूर्ति करून श्वेत, आरक्त, श्यामल, पीत । चित्र वर्ण करून चहूयुगीं महात्ममार्ग प्रतिष्ठितें झाले. या अर्थीं श्रुतीची कारकावली लिहितो.

कृते स्वाभाविको मार्गो दत्तात्रेयेण निर्मितः
तत्र नारायणाचार्य चक्रपाणि स एवच १
तच्छिष्यो बहूवच प्रोक्तो आचार्योस्थ महात्मतां
महाराष्ट्रनिवासीच श्रीदत्तो यत्र तिष्ठति २
बहूवचादुपरिष्टाच कृते सारस्वतो मुनी ॥
उपेंद्र मुनिरेतस्मादित्याचार्य त्रयं कृते ३ ॥
त्रेतायां मुनिमार्गो सौ दत्तात्रेयेण निर्मितः ॥
तत्र प्रोक्तो नगाचार्या श्रीप्रभु श्च स एवच ४
तच्छिष्यो निगद प्रोक्तो आचार्योस्थ महात्मनां
महाराष्ट्रनिवासीच श्रीदत्तो यत्र तिष्टति ॥५॥

निगदादुपरिष्टाच त्रेते चानगो मुनी ॥
इत्याचार्यत्रयं त्रेतें ततश्च मुनि पिंगल: ॥६॥
द्वापारे ध्यात्ममार्गो सौ दत्तात्रेयेण निर्मितः
तत्रास्ते प्रवराचार्य: स एव ऋषभ स्मृत:॥७
रथंतरश्च तच्छिष्य आचार्योत्थ महात्मनां ।
महाराष्ट्रनिवासीच श्रीदत्तो यत्र तिष्ठति ८
रथंतदुपरिष्टाच दवधूतो मुनि स्मृतां ।
मुनिर्भिक्षुर्द्वापरेथ इत्याचार्य त्रय स्मृतं ।९ ॥
कलौच त्रिविधामार्ग आद्यःस्वाभाविको मुनिं
अध्यात्मश्च तृतीयश्च दत्तात्रेयेणं निर्मितः १०
कलौप्रशांत आचार्य स श्रीचक्रधर स्मृतः
अंगीरस श्चतच्छिष्योआचार्योत्थमहात्मना ११
महाराष्ट्रनिवासीच श्रीदत्तो यत्र तिष्टति
अंगीरसा परिष्टाच्च कलौ नागार्जुनो मुनिः
हरींद्रमुनिरेतस्मा दित्याचार्यत्रयं कलौ १२

कृतयुगीं मुख्य घेऊन बत्तीस आचार्य झाले. त्रेतामध्यें एकशे साठ झाले, द्वापारी आठशें झालें, कली संपेपर्यंत चार हजार होतील. असे हे युगयुगीं आचार्य महात्म पंथातें विस्तारते झाले. या पंथास प्रमाणीक शास्त्र गौतमोक्त सूत्र पाठतत्व न्यायशास्त्र गीता भागवत उपनिषद ब्रह्मविद्या प्रमाणिक आहे. हे चार पदार्थ मानततात. ह्यांचे मठ नारायण क्रीडा स्थान, वनर क्रीडा स्थान, प्रवर क्रीडा स्थान, रुद्धपुर, मथुरा प्रशांत मातापुर, पंचाळेश्वर दत्तक्रीडा स्थान गौतमस्थळ बद्रिकाश्रमांत हे मुख्य मठ मानितात. व धर्म, सप्तवेषनरहित नवहेतुरहित दान अरण्यवासी अष्टौमासी अटण चतुर्मासीं एक स्थळ एकांण नैष्कर्मादि लक्षणयुक्त चतुर्वर्ण भिक्षाहीं जितका आचार व क्रम तितका प्राचीन मतानें व उपनिषदानें चालत आलेला आहे. दुसरे स्त्री व पुरुष विषयासक्त झाले तर त्याला शासन करून मार्गभ्रष्ट करितात. त्यानें आपली संतति जर दिली तर त्या संततीला ग्रहस्थाश्रमासारखे संन्यास देतात व स्वजातीनें पुन्हा संसाराची विरमता धरली तर पुरश्चरण देऊन दोन्ही स्त्रीपुरुषांचा विभाग करून मार्गांत मेळावितात. या पंथाचे लोक पुष्कळ देशांत आहेत या पंथास कोठें महानुभाव, कोठें महात्मा, कोठें कृष्ण उपासक, कोठें परमहंसमत्हामा असें ह्मणतात. महाराष्ट्र देशीं कज्जलरंजित व हुर्मुंचरंजित असें द्विविध प्रकारचें वस्त्र धारण करितात. अग्नीपासून दोन पदार्थ उत्पन्न होतात. अधसिखेपासून रक्षा व ऊर्ध्वसिखेपासून कज्जल. रक्षा अन्य लोक धारण करितात. कज्जल मानभाव धारण करितात. कारण ऊर्ध्वशिखेच्याठायीं देवतेचा निवास असतो ह्मणून पवित्र देशीं पवित्र लोकीं पावित्रता धारण केली आहे. केवळ ज्ञान निष्ठ ईश्वरभक्तिरत संसारीं विरत लिंगचिन्हां सहित चारी आश्रमांचा त्याग करून विषय परित्याग करून वेदवाद, शुष्कवाद, पक्षवाद, इत्यादिकासी न धारण करून अध्यात्म विद्यारत निष्प्रविरक्तपणें क्रीडतात. शांत दृष्टीनें कोणी जसी भिक्षा दिली तींतच उदरनिर्वाह करून महाराष्ट्र देशांत विचरतात. कळावें, हे विनंती. तारीख २९ माहे नोवेंबर सन १८८० इसवी.

एक
शोधक.

---

वऱ्हाडसमाचार.

मिति मार्गशीर्ष शुध्द १२ शके १८०२

लार्ड रिपन साहेब व्हाईसराय यांणीं सुमार दीड महिना हिंदून मोठा प्रवास केला. अनेक ठिकाणीं गेले, तेथील सर्व समारंभास हजर राहिले, संभाषणें केलीं, प्रियपत्नी व चिरंजीव यांनां भेटले व सर्व फिरण्याचें त्यांचें काम संपून ते कलकत्त्यास परत जाण्याकरितां तारीख ४ रोजीं मुंबईहून निघणार तों तिसर दिवशीं ज्वरानें आजारी झाले. ही मोठी दिलगिरीची गोष्ट झाली. तरीं ५वे तारखेस रविवारीं त्यांस थोडें बरें वाटल्यावरून त्याच सायंकाळीं ते मुंबईहून निघाले. प्रकृति हलक झाली असल्यामुळें परत जाता वेळचा समारंभ त्यांणीं कांहीं होऊं दिला नाहीं. केवळ खासगी मनुष्याप्रमाणें ते स्पेसिअल ट्रेंनींतून गेले. पण आगगाडींतील श्रमामुळें व गाडींत झोप न आल्यामुळें अलाहाबाद ह्मणजे प्रयागच्या सुमारास ते अधिक आजारी झाले व तेथेंच उतरून सरकारी बंगल्यांत नेले. आगगाडींतून त्यांनां दुसऱ्याच्या मदतीशिवाय उतरतां आलें नाहीं. अजूनही त्यांची प्रकृती चांगली दुरुस्त झाली नाहीं. शक्ति [illegible] चालवत नाहीं. १० दिवस तरी प्रयागाहून त्यांचे पुढें जाणे होणार नाहीं असें प्रसिध्द झालें आहे त्यांच्या पत्नीही थोड्याशा आजारी झाल्या आहेत. व त्यांचे चिरंजीव वाघाच्या शिकारीकरितां गेले आहेत त्यांनां मागें येण्याविषयीं तार गेली आहे. ईश्वरकृपेनें आमचे व्हाईसराय साहेब लवकर दुरुस्त होवोत असें आम्ही इच्छितों.

---

## व्हाईसराय साहेबांचीं भाषणें.

पुणें मुक्कामीं व्हाइसराय साहेबाची स्वारी गेली होती तेव्हां सार्वजनिक सभेनें त्यांनां अड्रेस दिला त्यावर त्यांनीं उत्तर दिलें तें:—

तुह्मी आह्मास जें मानपत्र दिलें त्याजबद्दल आह्मी तुमचे फार आभारी आहोंत. आह्मी तुह्मास खात्रीपूर्वक असें सांगतों कीं, इलाख्याचे गवरनर साहेब यांच्या मदतीनें आह्मी पुणें शहर पाहिलें, व ह्या शहरांतील व जिल्ह्यांतील गोष्टींची आह्मास माहिती (ही माहिती अर्थातच अपुरती असली पाहिजे.) मिळाली ह्मणून आह्मास मोठा आनंद झाला आहे. तुमच्या मानपत्रावरून आह्मास असें कळून आलें आहे कीं, आह्मी हिंदुस्थानांत आल्यानंतर वेळोवेळ ज्या अनेक गोष्टी बोलून दाखविल्या त्या तुह्मास पसंत झाल्या आहेत व यैाजबद्दल आह्मास फार संतोष झाला आहे. तुमच्या मानपत्रांत ज्या अनेक विषयांचा उल्लेख केला आहे त्या सर्वांचे संबंधानें खुलासेवार जबाब देण्यापुरता अवसर आह्मास नाहीं, परंतु या विषयांपैकीं एक दोन गोष्टींचे संबंधानें कांहीं थोडे शब्द बोलण्याची आमची इच्छा आहे. वरिष्ठ प्रकारच्या विद्येच्या संबंधानें तुह्मी जो मजकूर आपले मानपत्रांत लिहिला आहे त्याजवरून असें दिसतें कीं, सर्व देशांत विद्येचा फैलाव होण्याचें महत्व तुह्मास पूर्ण रीतीनें माहित आहे, व ही गोष्ट पाहून आह्मास खरोखर फार आनंद झाला आहे. ह्या संबंधानें आह्मी आणखी असें सांगतों कीं, हिंदुस्थान देशांत वरिष्ठ प्रकारच्या विद्येचा दिवसेंदिवस पूर्वीपेक्षां अधिकाधिक फैलाव होईल, येवढेंच नाहीं तर सर्व रयतेस विद्या देण्याचे संबंधानें पूर्वीं जी खटपट झाली त्याहून पुढें अधिक खटपट होईल अशी आह्मास आशा आहे. सन १८५४ इसवी सालांतील विद्या खात्याचे संबंधाच्या खलित्याबद्दल तुह्मीं आपल्या मानपत्रांत जें लिहिलें आहे तें ऐकून आह्मास मोठा संतोष झाला. सदर्हू खालिता हिंदुस्थानांतील विद्याखात्याची एक मोठी सनद होय असें आह्मी समजतों व ह्या खलित्यानुरूप हिंदुस्थान देशांतील विद्याखात्याची व्यवस्था ठेवण्याची आमची इच्छा आहे. हल्लींचा काळ पुष्कळ सुधारल्यामुळें फार फेरफार झाले आहेत त्यांजकडेंही ह्या संबंधानें आमचें पूर्ण लक्ष आहे. लाहोर एथील दरबारांत जे एतद्देशीय राजेरजवाडे हजर होते त्यांस उद्देशून आह्मी जें संभाषण केलें त्यांतील कांहीं गोष्टींचा उल्लेख तुह्मी आपले मानपत्रांत केला आहे. लार्ड क्यानिंग साहेबांचे जाहिरनाम्यांत ज्या मूलतत्वांचा उल्लेख केला आहे व जीं मूलतत्वें त्यांनीं दिलेल्या सनदांत नमूद आहेत त्या मूलतत्वांस अनुसरून राणी साहेबांचा व सरकारचा वर्तनक्रम दृढतेनें व सक्तीनें चालू आहे ही गोष्ट तुह्मास सांगणें जरूर आहे असें आह्मांस वाटत नाहीं. हिंदुस्थान देशांत नेटिव संस्थानें असलीं ह्मणजे संस्थानिकांचाच काय, परंतु ब्रिटिश सरकारचाही मोठा फायदा आहे ही गोष्ट आह्मी पूर्ण रीतीनें कबूल करितों, परंतु ह्याच वेळेस आह्मास आणखी असें सांगितलें पाहिजे कीं, सरकारचे सार्वभोम अधिकारानें सर्व देशास जी शांतता मिळाली आहे त्याच शांततेमुळें आह्मास वेळोवेळ ह्या शांततेचे आश्रयानें रहाणाऱ्या संस्थानिकांस असें जरूर स्मरण दिलें पाहिजे कीं, तुमचे संस्थानांतील राज्यव्यवस्था चांगली आहे हें आह्मास दाखविण्यांत तुह्मी बांधिले गेला आहांत. तुमच्या मानपत्रांत ज्या दुसऱ्या विषयांचा उल्लेख केला आहे त्या संबंधानें आह्मी आतां बोलत नाहीं. हिंदुस्थानचे व्हाइसराय याणीं वारंवार फार बोलावें असें आह्मांस वाटत नाहीं व हिंदुस्थानांतील आमच्या कारकीर्दीची मुदत जेव्हां संपेल तेव्हां हिंदुस्थानांतील प्रजेनें "ह्या व्हाइसरायानीं मोठमोठाल्या गंभीर व डौलदार शद्बांचा उपयोग केला. परंतु ते प्रचारांत आणण्याची कांहीं एक तजवीज केली नाहीं." असें न ह्मणतां उलट असें ह्मणावें कीं "ह्या व्हाइसरायानीं एकंदरीनें बोलण्यापेक्षा अधिक चांगलें वर्तन केलें" ही गोष्ट आह्मास निःसंशय अधिक पसंत आहे. आह्मांस असें वाटतें कीं हिंदुस्थान देशास सांप्रतच्या स्थितींत इतर सर्व गोष्टींपेक्षां शांतता व विश्रांति या दोन गोष्टींची फार जरूर आहे, कारण ह्या गोष्टी हिंदुस्थान देशास मिळाल्या ह्मणजे शेतकी व व्यापार यांची सुधारणा व बढती करण्यास फुरसत मिळणार आहे. हिंदुस्थानासारख्या देशांत संपत्ति वाढविण्याच्या कामांस सरकारानें फार मोठी मदत दिली पाहिजे ही गोष्ट सर्वांशीं खरी आहे परंतु आह्मास अशी आशा व भरंवसा आहे कीं ह्या बाबदींत आह्मी स्वतंत्र रीतीनें सुधारणा करण्यास लायख आहोंत असें हिंदु लोकांनीं वर्षानुवर्ष अधिकाधिक दाखविलें पाहिजे व असें झालें ह्मणजे सरकारचे मदतीनें व आश्रयानें तुह्मी ह्या बड्या राष्ट्रांतील संपत्ति निश्चयानें वाढवाल अशी तुह्मास आशा करणें योग्य आहे.

याचप्रमाणें बुधवारांत म्युनिसिप्यालिटीनें अड्रेस दिला त्यावर त्यानीं उत्तर दिले तें-

हिंदुस्थानचे इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या इसमास ज्या अनेक ऐतिहासिक गोष्टी माहित आहेत त्या सर्व ह्या जुनाट शहरांत असल्यामुळें तें पाहून आह्मास फार आनंद झाला, व तुह्मी आमचा जो सत्कार केला त्याजबद्दलही आह्मी तुमचे फार आभारी आहोंत. तुमच्या राणी साहेबांचे प्रतिनिधी आह्मी असल्यामुळें तुह्मी आमचा इतक्या उत्तम रीतीनें आदरसत्कार केला हीं गोष्ट आह्मास पूर्णपणें माहित आहे आपल्या हिंदू प्रजेचे सुधारणुकीचे व हिताचे संबंधानें राणी साहेब फार कळकळ बाळगतात ही गोष्ट तुह्मास पूर्णपणें माहित आहे, याजबद्दल आह्मास शंका नाहीं. राणी साहेब आमच्याकडे वेळोवेळ कांहीं निरोप धाडून आमचा गौरव करितात व आह्मी तुह्मास असें खात्रीनें सांगतों कीं, राणी साहेबांच्या ह्या प्रत्येक निरोपांत त्यांचा हिंदु प्रजेच्या संबंधानें कांहीं तरी उल्लेख असतो. व राणी साहेबांच्या राज्यपैकीं हा जो विस्तीर्ण व सुशोभित देश त्यांतील प्रजेचे हिताबद्दल त्या सदैव फार मोठी कळकळ बाळगितात असें त्यांच्या निरोपावरून उत्तम रीतीनें दिसून येतें. आह्मी आज पुणें शहरीं आलों याजबद्दल आह्मास फार आनंद होत आहे; कारण आमचें येथें रहाणें जरी फार थोडें झालें तरी आमचे शिलक राहिलेल्या कारकीर्दींत आह्मास येथें फिरून येण्याचा अवसर सांपडेल असें वाटत नाहीं. पुणें शहर पहाण्याची आह्मास फुरसत मिळाली याजबद्दल तुमचे गव्हरनर साहेब सर जेम्स फर्गुसन यांचे आह्मी फार आभारी आहोंत. आह्मी हिंदुस्थानांतील पुष्कळ भागांत फिरलों आहोत व निरनिराळ्या जातीच्या व धर्माच्या लोकांनीं आमचें मनापासून आदरातिथ्य केलें आहे आज तुह्मी जें माझें आदरातिथ्य केलें त्याजबद्दल मी तुमचा फार आभारी आहे व हें आदरातिथ्य आमचे स्मरणांतून कधींही जाणार नाहीं व तुमचे बढतीबद्दल आह्मी फार काळजी बाळगूं हें तुह्मी निश्चयानें समजावें. ज्ञा. प्र.

---

## मध्यप्रांत.

नागपूर व त्याचे खालील सर्व जिल्हे मिळून जो भाग त्यास सेंट्रल प्राव्हिन्सेस ह्मणजे मध्य प्रांत असें सरकारानें नांव दिलेलें आहे. त्या विषयींची कांहीं माहिती वऱ्हाणपुरच्या सुबोधसिंधु पत्रांत हिंदुस्थानी भाषेंत आह्मांस आढळली तींतील विशेष मजकूर

आह्मी आपले वाचकांकरितां मराठींत लिहितों.

मध्यप्रांत सन १८६१ चे नोवेंबर महिन्याचे दुसरे तारखेस विलायत सरकारचे हुकुमावरून ब्रिटिश अंमलदाराचे सत्ते खालीं आला. तरी त्याची व्यवस्था नानेरग्युलेशन प्राव्हिन्स प्रमाणें चालू आहे तरी प्रथम बहुतेक खात्यावर लष्करी कायदाच मुख्य असत तसे अलीकडे नाहीं. सन १८५४ सालीं माचे महिन्यांत रघुजी भोसले मरण पावले तेव्हां हा मुलुक खालसा झाला व शिंद्याकडून सागर आणि नर्मदा हे दोन प्रांत मिळाले ते यासच जोडले. तेव्हां गवरनर जनरलचे एजंट या मुलखाकरितां नेमिले असत. पुढें सन १८६१ सालीं या प्रांताकरितां स्वतंत्र चीफ कमिशनर नेमिले सन १८६२ सालीं सर रिचर्ड टेंपल साहेब चीफ कमिशनर होते तेव्हां त्यानीं राज्यव्यवस्थेचा रिपोर्ट लिहिला तो रिपोर्ट व हल्लीं सन १८७९।८० सालचा प्रसिद्ध झाला तो रिपोर्ट हे दोन्ही पाहिले ह्मणजे असें दिसतें कीं हल्लीं पुष्कळ सुधारणा झाली आहे. व इकडील शेतकऱ्यांची स्थिति चांगली झाली आहे इकडे दुपिकी जमीनी आहेत. तांदूळ, जोंधळा, कपाशी, गहू व तेलबीजें यांचें पीक इकडे चांगलें आहे. भंडारा, बालाघाट, चंद्रपुर व छत्तीसगड या जिल्ह्यांतून तांदूळ फार उत्तम होतात. त्याचप्रमाणें नर्मदा जिल्ह्यांत गहू उत्तम होतात. व तिकडे रेल्वे झाल्यानें धान्याचा पुरवठा इतर प्रांतीं जावयास मोठें सुलभ झालें आहे. छत्तीसगडाकडे रेल्वे नसल्यानें लोकांस माल रवाना करण्याची अडचड आहे. त्यामुळें तेथें इतर सर्व प्रांतांपेक्षां धान्य स्वस्त आहे. या प्रांतांत १५ संस्थानिक आहेत. यांतील दोन शिवायकरून बाकी सर्व ब्रिटिश सरकारास करभार देतात. जे संस्थानिक आपला कारभार स्वतंत्र रीतीनें चालवितात त्यांचेंही काम काजावर चीफ कमिशनरची नजर आहे. त्यांनां थोडें तेढें वांकडे दिसेल तर ते लागलीच त्यां संस्थानाचे कामांत हात घालतील. व या धाकानें सर्वे संस्थानीक सुरळीतपणें आप आपला राज्यकारभार चालवितात. तथापि त्यांतून असावी तशी उत्तम व्यवस्था नाहीं. या संस्थानिकांपैकीं नांदगांवचे संस्थानिकाची या रिपोर्टांत शिफारस आली आहे. तेथें इमारती इतक्या चांगल्या झाल्या आहेत कीं, त्या रायपुरच्या इमारतीस मागें सारतील. नांदगावचा राजवाडा हा नामांकित आहे. त्या संस्थानास कर्ज वगैरे कांहीं नाहीं. व राज्यकारभार चांगला चालत आहे. कैदी लोकांस जी पोटगी देतात ती कमी करण्याचा या संस्थानिकानीं विचार केला होता परंतु सरकारांनीं त्यास कळविलें कीं जे निरख पुर्वीं पासून ठरलेले आहेत तेच योग्य आहेत. मजुराचे पोटगींतून कसर काढून सरकारखजिन्याची भर कितीशी होणार आहे ? सबब तसें करणें वाजवी नाहीं म्युनिसिप्यालिट्यां विषयीं रिपोर्टांत लिहिलें आहे कीं सरकारी नोकरांशिवाय गांवचे रहाणारे लोक मेंबर आहेत ते म्युनिसिप्यालिटीस हितावह अशी मतें देतात परंतु खरें पाहिलें तर अनुभव त्या वेगळा आहे. या मुलखांतील लोकांस कायद्याकानूचें राहो पण बोलण्या चालण्याचेंही चांगलें ज्ञान नाहीं तशा लोकांच्या निवडणुकीपासून म्युनिसिप्यालिट्यांची स्थिति कशी रहाण्याची हें सर्वांस समजण्याजोगेंच आहे. रेल्वेचें काम झपाट्यानें चालू असल्यानें सर्व प्रांतांत देवघेव मोठ्या जारीनें चालू आहे. छत्तीसगड रेल्वेचेंही काम झपाट्यानें चालू आहे. तुमसरपर्यंत रेल्वे झाला आहे व डोंगरगडापर्यंत सडक करण्याचा हुकूम झाला आहे. ती सडक एक वर्षाचे आंत पुरी होईल. वाइनगंगेवर पुलाचें काम चालू आहे. इकडील लोकांवर जमीनीचे सान्याचा कर आहे. त्याशिवाय व्यापारी लोकांवर पांढरी ह्मणून एक कर आहे. रयतेचें लक्ष्य कायदा कानूकडे असावें तसें नाहीं. दवाखाने जिल्ह्यांजिल्ह्यांतून व तहशिली तहशिलींतून झाले आहेत पण त्यांची स्थिति सुधारलेली नाहीं. देवी काढण्याचें खातें चालू आहे पण लोकांस त्या गोष्टीचें अगत्य कमी आहे तथापि लौकरच इकडील लोकांचें अज्ञान जाऊन सुधारणा होईल असें दिसतें.

## वऱ्हाड.

थंडी कडाक्याची पडूं लागली आहे व हवा चांगली झाली आहे.

अलीशान रेसिडेंट साहेबाची स्वारी मुंबईकडे गेली होती ती ७वे तारखेस हैदराबादेस परत गेली.

विलायतेहून ता० १९ नोवेंबरची आगबोट निघून या महिन्याचें ७ वे तारखेस मुंबईस आली तींतील उतारूमध्यें मि० जोन्स असें नुसतें नाव आहे त्यावरून आमचे कमिशनर साहेब ते असावेत असें वाटतें. त्यांची रजा नाताळचे सुटीपूर्वी संपते तेव्हां तेच परत आले असावे. उर्दूअकबारांतही लिहिलें आहे कीं कमिशनर साहेब मुंबईस येऊन कलकत्याकडे गेले.

मेजर लडलो साहेब सी. आय. ई. या नावाचे गृहस्थांची वऱ्हाडांत असिस्टंट कमिशनरचे जागीं नेमणूक झाली आहे व तिला कांहीं वर्षे झालीं पण त्यानीं या प्रांतांत अजून पाय ठेविला नाहीं. दुष्काळाचे वेळीं म्हैसुराकडे होते व बाकी काळांत रजेवर होते. तेही ७वे तारखेस आलेल्या आगबोटींतून मुंबईस आलें आहेत. तेव्हां इकडे आतां येतील असें वाटतें.

जुडिशियल कमिशनर साहेबाची स्वारी शुक्रवारीं एथें आली होती व काल वंदनेच्याकडे गेली. १८वे तारखेस यवतमाळास सेशन कोर्ट भरणार आहे त्या आधीं ते तिकडे जातील. त्यांचे नवीन नेमलेले क्लार्क आफ कोर्ट रा. रा. वासुदेव सदाशिव पिंसोळकर दहावे तारखेस एथें येऊन आपले कामावर रुजू झाले व तेच हल्लीं स्वारी बरोबर गेले आहेत.

मेजर लेन साहेब इन्सपेक्टर जनरल शुक्रवारीं एथें आले. आज मलकापुराकडे जाणार आहेत.

रा. रा. हणमंतराव रामचंद्र तहशिलदार यांच्या कामावर रुजू होण्याच्या संबंधानें गेले आठवड्यांत आह्मी लिहिलें होतें. आतां कळतें कीं, त्यांनां आणखी ६ महिन्यांची रजा दिली; ते घरें आहेत. रुजु होतां ह्मणतात. व सरकार त्यांची रजा महिनेच्यार महिने वाढवितें यावरून काय समजावें?

रा. रा. बाळकृष्ण काशीनाथ जोशी दर्यापुरचे पोलिस इन्स्पेक्टर यांनां खामगावास तेथील तहशिल्दार रा. रा. भास्कर महेश्वर ३ महिन्यांच्या रजेवर देशीं जाणार त्यांच्या जागेवर अकटिंग नेमणार अशी गेल्या आठवड्यांत गावांत वदंता होती. हल्लीं असें कळतें कीं एथील डिपुटी कमिशनर मेजर फिटझरल्ड साहेब यांचे मनांतून त्यांस नेमावें असें असून त्यानीं त्यांनां विचारिलें व त्यांनीं कबूल करून साहेबाची स्वतां भेट घेतली. व त्यावरून त्यांचे वरिष्ठासही डिपुटी साहेबांनीं लिहिलें हल्लीं असें वर्तमान आहे कीं खामगावचे पेषकारानींच तहशिलदारांचे रजेंत काम पाहावें असें ठरत आहे. यावरून कांय तें निश्चयात्मक कळत नाहीं. रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ हे गृहस्थ हुषार असून तरुण व सुशिक्षित आहेत व यांनीं पोलिशींत चांगलीं कामें केलेलीं आहेत सबब त्यास तहशिलदारी मिळेल तर फार चांगलें होईल.

दहिहंड्यास सब रेजिस्ट्रार आफिस होऊन त्यावर रा. रा. गोविंद माधव पेशपांडे यांची नेमणूक झाली.

उमरावतीचें लोकल फंड इंजिनियर मि० मरो साहेब यांस भ्रम होऊन ते वेडे झाले आहेत असें कळतें. मि० लक्ष्मीपती बारिस्टर यांवर अब्रू घेतल्याची दिवाणींत फिर्याद करणारा हेच गृहस्थ होत. व फत्तेअली नावाच्या एका वोहऱ्यावरही अब्रु घेतल्याची फौजदारींत फिर्याद याच गृहस्थानीं केली होती. तिची चौकशी १० वे तारखेस रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांनीं करून आरोपीस दोषमुक्त केलें. वोहऱ्यानें डिपुटी कमिशनराकडे एक अर्ज केला होता कीं मि० मरो साहेब हें माझ्या रमण्यांतील गवत कापून नेतात त्यावरून त्यानें आपणावर चोरीचा आरोप करून आपली अब्रू घेतली अशाबद्दल साहेबानीं वोहऱ्यावर फिर्याद केली होती पण ती चालण्याचे दिवशीं ते हजर नसूनें वेडे झाले होते. पण त्याजकडून वकील होते. मि० लक्ष्मिपाति यांजवरीलही त्यांचा मुकदमा त्यांच्या वेडगळ स्थितीमुळें न चालतां तकूब राहिला आहे. लक्ष्मीपाति यांनीं अब्रू घेतल्याचा संबंध अर्जांत असा आणला आहे ह्मणतात कीं लक्ष्मीपती हे एका मि० प्रीमरोज नावाचे गृहस्थाचे दुकानांत एके दिवशीं बसले असतां कांहीं मनुष्या समक्ष असें ह्मणाले कीं मि० मरो याजवर एक फिर्याद आपणाकडे आली आहे. तिचा निकाल मरो साहेबाचे विरुद्ध होऊन त्यांचावर मोठी आफत गुदरेल अशा अर्थाचे शद्ब बोलले व ते तसे बोलल्यावरून आपली लोकांमधील पत गेली आहे सबब मि० लक्ष्मीपति याजकडून दोन हजार रुपये नुकसानीबद्दल देववावे अशा मतलबाचा दावा त्यांनीं केलेला आहे.

मि० मरो यांचे मनाची स्थिति एकदम बिघडून ते वेडे झाले याबद्दल लोकांस वाईट वाटतें. प्रथम ७वे तारखेस रात्रीं त्यानीं बंदूक घेऊन पांच पंचवीस आवाज काढिले त्यांचा बंगला डि. क. कचेरीजवळ असल्यामुळें त्या आवाजांबरोबर खजिन्यावर चोर आले असावें ह्मणून पोलिस तेथें आलें. नंतर त्यांनां ती गोष्ट समजून त्यांतून कित्येक लोक मरो साहेबाकडे जाऊन त्यानीं त्यांनां समजाविलें. दुसरे दिवशीं त्यांनां भ्रम झाल्याविषयीं डाक्टराची खात्री झाल्यावरून मे. ग्रांट साहेब यानीं त्यांस पकडण्याचें वारंट दिलें इतक्यांत ते रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांचे कोर्टांत गेले व तेंथें कोणाला लाथ मार, घड्याळ फेक, भांडें फोड असें करूं लागले. मग मि० मेन वगैरे मंडळीनीं युक्तीनें समजावून त्यांनां घरीं नेलें पण त्यांचें वेड वाढत गेल्यावरून त्यांनां जेलांत नेऊन बंदोबस्तानें ठेवणें भाग झालें. डि. कमिशनर मे. बुल्क साहेब यांस बाहेर गावीं ही खबर समजल्या बरोबर ते उमरावतीस आले. व त्यानीं लोकलफंड आफिसाकडील पैसा, किल्या वगैरे आपले ताब्यांत घेतलें.

मि० मरो साहेब कित्येक वर्षे लोकलफंड इंजिनियर आहेत. त्यां जवळ संपत्ति चांगली असून ते वयानें पोक्त आहेत व त्यांस ५।४ मुलगे आहेत अशी त्यांची सुस्थिति असतां एकदम त्यांनां जर हा भ्रम झाला असला तर ही चालू दिवाणी फौजदारी प्रकरणें व अशाच कांहीं दुसऱ्या गोष्टी यानींच ते बहकले असावे असें वाटतें.

## वर्तमानसार.

बी. ए— साल मजकुरीं बी एचे परीक्षेकरितां १०४ उमेदवार होते त्यांतून ११ पास झाले त्यांचीं नांवें:—

फर्स्ट क्लास-- रामचंद्र सखाराम आठवले व चिंतामण विनायक वैद्य.

सेकंड क्लास— नरशिंगराव भोलानाथ दिवेशा, महादेव यशवंत गोळे, महादेव शिवराम तोळे, माणकजी दोराबजी कांगा, गणेश पांडुरंग केळकर, पेस्तमजी दादाभाई मरचंट, छगनलाल हरीलाल पंडे, व्यंकटेश दामोदर पुणतांबेकर.

पास— जे मेरवानजी, गोविंद श्रीधर आपटे, रामचंद्र विष्णु बकरे, एल गंगाधर भडभडे, नौरोजी होरमसजी, इच्छाराम भगवानदास, डी पेस्तमजी दस्तुर, गोपाळजी गुलाबभाई देसाई, मोतीलाल दलखतराम देसाई, उमकार अजबभाई, रामा मूळजी मिक्षण, रामचंद्र परशराम गोडबोले, सदाशिव महादाजी गोडबोले, एदलजी बेहिरामशा, रणछोडदास वलुभाई, ऐम नित्याराम मेहता, नसरवानजी फामजी मिरजा, विष्णु अनंत पटवर्धन, फर्दुनजी पालनजी पावरी, नारायण गोपाळ राजे. बाळकृष्ण रामचंद्र साने, गोकुळदास विठ्ठलदास, रामचंद्र रघुनाथ शिरगावकर, रुस्तम बमनशा वकील.

एफ सी ई ची परिक्षा झाली तींत ३८ उमेदवारांपैकीं २१ पास झाले. व एल सी. ई चे परिक्षेत २५ पैकीं १७ उमेदवार पास झाले.

कैलासवासी मुरारजी गोकुळदास यांच्या स्मारक कृत्याकरितां परळवरील गिरणीच भागीदारांनी ५००० रुपये निराळे काढिले.

कंदाहार शहर सोडूं नये अशाविषयीं लार्ड क्रानब्रूक साहेब पार्लमेंट सभेंत भाषण करणार आहत.

नागा पहाडाकडील पोलिटिकल आफिसर मेजर मिचल यांनीं एक मोठा दंगेखोर मनुष्य धरून कैद केला व त्यास असामाकडे पाठविला.

एका आठवड्या मागच्या सोमवारीं मद्रासच्या मुसलमान लोकांनीं तेथून जाणारे गवरनर ड्यूक आफ बार्किंगहाम यांस मोठी मेजवानी दिली.

मुंबईस नवीन बांधलेल्या थिएटराचे मालक मि० कुवरजी सोराबजी नाजिर याजवर १५००० रुपयांचा मेजर कौपर यांचा फैसल झाला आहे व त्याबद्दल त्यांनीं त्यांस पकडण्याचें वारंट काढिलें आहे.

श्री० रा० धुंडिराज विनायक ऊर्फ भाऊ साहेब बिवलकर यांस अलीबागेस देवाज्ञा झाल्याचें दुःखकारक वर्तमान आलें आहे. यांची वृत्ती धर्मभोळी असून ब्राह्मणांस नेहमी हे दान धर्म करीत असत. यांनीं २।३ वेळां यज्ञ केले होते व त्यांचा दीक्षितपणा स्वतां घेतला होता. प्रसिद्ध आंग्र्यांचे दिवाण बाबा साहेब यांचें हे चिरंजीव होते. यांचें वय ४२ वर्षांचे होतें. यांस पुत्र नाहीं.

रा. बा. महादेव गोविंद रानडे धुळ्याचे सबार्डिनेट जडज आजारी पडून पुण्यास गेले होते, त्यांची प्रकृती आतां बरी आहे असें कळतें.

नाताळच्या सुट्या ता. २४ दिसेंबर पासून ता. २ जानेवारी पर्यंत देण्याचा सरकारचा हुकूम झाला आहे.

पुणें सोलापुराकडे नवीन मुन्सफ कोर्टें केलीं होतीं पण तेथें कामें चांगलीं येत नाहींत; ह्मणून ७ कोर्टें कमीं केलीं, असें समजतें.

सांवतवाडीचे सरदेसाई दिवाळीनिमित्त बडोद्यास गेले होते ते मुंबईहून जलमार्गें परत गेले.

कोलापुरास कांहीं दंडेल लोकांनीं तोतया चिमा साहेब एक उभा करून दंगा करण्याचा व छावणीवर हल्ला करण्याचा बेत केला होता व एके ठिकाणीं दरवडाही घातला ती गोष्ट पोलिसास कळून धरपकड झाली आहे व चौकशी चालली आहे असें समजतें.

चालू सालच्या एल. एल. बी च्या परीक्षेंत एकंदर १७ विद्यार्थी पसार झाले त्यांचीं नांवें पुढें लिहिल्याप्रमाणें:—नारायण गणेश चंदावरकर, दाजी आबाजी खरे, हरीलाल हरसदराय ध्रुव, बळवंत आबाजी दिवेकर, टामस डंकन, रुस्तमजी मंचरजी गिमी, सिद्धेश्वर भास्कर गोळे, प्रल्हाद नारायण जोग, सखाराम वासुदेव जोशी, फरदुंजी माणिकजी कांगा, गोविंद बाळकृष्ण कोपरकर, रंगनाथ नरसिंह मुधोळकर, वामन नारायण राहुरकर, गंगाराम बापसोबा रेळे, कावसजी बेझंजी शेठणा, रुस्तमजी धनजीभाई शेठणा व शिवराम शिताराम वाळे. सदर्हुपैकीं पहिले दोघजण पहिल्या वर्गांत आले असून त्यांपैकीं मि० चंदावरकर यांस आरनोलडस स्कालरशीप देण्यांत आली आहे.

चालू सालीं एम. ए. च्या परीक्षेंत ४ विद्यार्थी पसार झाले यांचीं नांवें ( सेंट झेविहयरचें कालेज मुंबई ) सोराबजी माणिकजी कांगा. [ डेकन कालेज पुणें ] गोपाळ गणेश आगरकर. ( एल्फिन्स्टन कालेज मुंबई ) धनजीशा होरमसजी दस्तुर व कृष्णाजी महादेव जोगळेकर. ज्ञा. प्र.

हिंदुस्थांनातील काफी दरसालापेक्षां सालमजकुरीं पुष्कळच अधिक परदेशास रवाना झाली. गेल्या सहा महिन्यांत एकंदर एक कोटीपेक्षांही पुष्कळ अधिक किंमतीची काफी बाहेर गेली. व गुदस्तसालीं याच सहामाहींत ६३ लाखांपेक्षां कमी किंमतीची पाठविण्यांत आली होती.

काश्मीरच्या महाराजांनीं आपल्या राज्यांतील द्राक्षासवाच्या कारखान्यावर व द्राक्षांच्या बागांवर देखरेख ठेवण्याच्या कामाकरितां तीन फ्रेंच मनुष्य आणण्याची परवानगी मागितली आहे, व त्यांच्या मनांत त्यांच्या साह्यानें सदर्हू प्रमाणें तयार झालेल्या आसवाकरितां शिसे तयार करण्याकरितां कांचेचाही कारखाना काढण्याचें आहे.

अमेरिकेंतील कालव्यांच्या पाण्याचें बर्फ होऊन गेलें असल्यामुळें गलबतें चालत नाहींशीं झालीं आहेत.

हिंदुस्थानांतील पीक पाण्याच्या संबंधानें पुढीलप्रमाणें साधारण हकीकत प्रसिद्ध झाली आहे:- मद्रास इलाख्यांत सर्वत्र पर्जन्य वृष्टि झाली असून पिकें बरीं आहेत. दक्षिणेंत एकंदरींत पाऊस तुरळकच, परंतु पिकें बहुतक ठिकाणीं चांगलीं. बहार मध्यें थोडीशी वृष्टी झाली, त्या शिवाय बंगाल इलाख्यांत पाऊस पडला नाहीं, परंतु पिकें चांगली असून हिंवाळयात जित्रबांची पेरणी बहुतेक आटोपली. मात्र वर्षाकाळच्या ज्वराचा बऱ्याच ठिकाणीं अंमल चालू आहे. वायव्येकडील प्रांत व औध इकडेस पाऊस चांगला पडून त्याचा रबीच्या पिकांस फार उपयोग झाला, व आणखीही पेरण्या व्हावयाच्या असून अलाहाबाद व कानपूर या प्रांतांत पावसाची जरूर आहे. मध्य प्रांतांत चोहोंकडे पाऊस बरा असून खरीपाचीं पिकें चांगलीं असून रबीचीं पेरणीं आटोपलीं. ग्वाल्हेर व उत्तर बुंदेलखंड इकडेस मात्र स्थिति नीटशी नाहीं. ब्रह्मदेशांत पाऊस नाहीं. इं. प्र.

मुंबई सरकार लौकरच या इलाख्यांतील नेटिव सिव्हिल सर्व्हंटाचे जागेवर कोणाच्या नेमणुका कराव्या, याची नेमणूक करणार आहे असें ह्मणतात.

हिंदुस्थान सरकार प्रेस कमिशनरची जागा कमी करणार अशी बातमी आहे.

मद्रासचे गव्हरनर डियूक ऑफ् बकिंगह्याम हे चालूं महिन्याचे २१ वे तारखेस विलायतेस निघून जातील. व मद्रासचे भावी गव्हरनर मि० आडम हे मद्रासेस येऊन दाखल होई तोंपावेतों कौन्सिलचे सिनियर मेंबर मि० हडलेस्टन हे त्यांचें काम पाहतील असें ठरलें आहे.

ज्यांची संपत्ति १०,००,००० अगर त्यांहून अधिक रुपयाची होती, असे एकंदर ६२ पुरुष इंग्लडांत या सालीं मेले. न्या. सिं

दुलसिग्नोच्या बारीवर राष्ट्रांचीं आरमारें तयार होतीं त्यांस ब्रिटिश सरकारानें असें सुचविलें आहे कीं, त्यांनीं तीं आरमारें इतक्यांत परत नेऊं नयेत आणि बर्लिनच्या तहांतील ज्या शर्ती अजून अमलांत आल्या नाहींत त्या येत तोंपर्यंत सर्व राष्ट्रांचें ऐक्य असावें

कंदाहारच्या वलीनीं सहकुटुंब हिंदुस्थानात येऊन राहण्याचा आपला हेतु ता. १ ली दिसेंबर रोजीं जाहीर रीतीनें प्रसिद्ध केला आणि हल्लींच्या प्रसंगास तसें करणें योग्य होतें त्यास गव्हर्नर जनरल साहेबांची मंजुरी मिळाली आहे. ते १०।१२ दिवसांनीं कराचीस येण्यासाठीं निघणार.

भोरचे श्री. पंत सचीव; राजपिंपळ्याचे राजे; साताराचे श्री आबासाहिब महाराज; श्री. आपासाहेब जमखिंडीकर वगैरे संस्थानिक गेल्या आठवड्यांत गव्हरनर जनरल साहेबांच्या मुलाकतीसाठीं मुंबईस गेले होते.

दुरी काढण्यासंबंधी कायद्याचें उल्लंघन केलें. अशा आरोपाबद्दल मुंबईच्या १५३ मनुष्यांवर देवीखात्याचे मुख्य डा. अनंत चंद्रोबा यांना गेल्या मंगळवारीं समनें लाविलीं आहेत

सर्व राष्ट्रांचें आरमार एकत्र आहे तसेंच राहूं द्यावें अशी ब्रिटिश सरकारानें सूचना केली होती ती रशियानें मान्य करून आस्त्रियानें अमान्य केली असें तारीख ३ दिसेंबरच्या तारेवरून समजतें.

चीनच्या सरहद्दीवरील कलजा प्रांताच्या संबंधानें चीन व रशिया यांजमध्यें पुष्कळ दिवस बोलणें चाललें होतें त्याचा निकाल नीटपणे झाला नाहीं असें सेंटपीटर्सबर्गच्या ता. २ दिसेंबरच्या तारेवरून समजतें.

ग्रीस देशाच्या सरहद्दीचा निकाल करण्याच्या कामीं तुर्कस्थानच्या बादशहानीं युरोपांतील प्रमुख राष्ट्रांची मसलत मागण्याचा निश्चय केल्याचें कान्स्टांटिनोपलच्या तारीख ३० नवेंबरच्या तारेवरून समजतें.

आयूबखान अडचणींत आहेत तथापि त्यांनीं सुमारें १५ शें बंदुकी ( ब्रीचलोडर्स ) जमविल्या आहेत असें हिरातेकडील ताजें वर्तमान आहे. ने० ओ०

पारीस एथील एका गृहस्थानें आग विझविण्याचें एक यंत्र तयार केलें आहे. त्याच्यायोगें भडकलेली आग अर्ध मिनिटाच्या आंत दबतें.

मुंबईच्या फौजदारी तुरुंगांतील एक क्लार्क, एक शिपाई व एक पार्शी कैदी हे तिघे संगनमतानें इतर कैद्यांस त्रास वगैरे देऊन त्यांच्यापासून पैसे घेतात अशाबद्दल मुंबईस एक खटला चालू आहे. असले प्रकार आणखी कित्येक तुरुंगांत चालू असतील. पण ते बाहेर येण्याची मात्र आशा नाहीं.

नबाब बलजा, कर्नाटकचे नवाब, यांचे पणतु मि, अबदुल गनीखान बहादुर यांस कडपाचे अक्टिंग डेपुटी कलेक्टर नेमिलें असें कळतें.

समुद्रांत तुफान झालें असतां त्याच्या लाटा बंदरांत शिरल्यामुळें आंत असलेलें गलबतांत धक्का पोंचतो. तर हा अनर्थ टाळण्याकरितां अलीकडे बंदराच्या तोंडाजवळ पाण्यांत तेल ओतण्याची युक्ति निघाली आहे. स्काटलंडमधील नार्थ हारबर पिटरहेड नावाच्या बंदरांत याजबद्दल अनुभव घेऊन पाहिला आहे तो असा कीं ज्या ठिकाणीं पाण्याच्या लाटा मोठ्या जोरानें उसळत होत्या त्या ठिकाणीं तेलाचे सिशे तळाशीं नेऊन तेथें रिकामे केले त्यामुळे यांणीं शांत झालें. काय शास्त्राचा प्रभाव हा ! पु० वै०

---

## सीमंतिनी.

या नावाचें गद्यपद्यात्मक नाटक आह्मी अति मेहनतीनें रचिलें असून तें सुंदर टैपानें छापून लौकरच प्रसिद्ध करण्याचा आमचा इरादा आहे; परंतु तो सर्व आश्रयदात्यांवर अवलंबून आहे. सबब गुणग्राही व स्वभाषेंतील ग्रंथास उदार आश्रय देऊन नवीन नवीन ग्रंथ उत्पन्न होण्यास उत्तेजन देणाऱ्या सद्गृहस्थांस सविनय प्रार्थना आहे कीं, त्यांनीं आपला उदार हस्त पुढें करून आश्रय देण्याची कृपा करावी. तारीख ३१ दिसेंबर सन १८८० चे आंत पैसे भरणारास एक प्रतीची किंमत ॥१० व टपालखर्च ॥ मिळून ॥११ व त्या मुदतीपुढें देणारास टपालखर्चासह दरप्रतीस ॥१३ आणे ठेविले आहे. या पुस्तकासंबंधीं पत्रव्यवहार खुद्द आमच्या किंवा रा. रा. विठ्ठल भगवंत लेभे स्टेशन मास्तर पाकणी यांच्या नांवावर ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. आगाऊ वर्गणीदारांचीं नांवें ग्रंथाच्या शेवटीं छापलीं जातील. तारीख १९ माहे नवेंबर सन १८८० इसवी.

दामोदर एकनाथ पाटसकर मार्स सिग्नलर जी. आय. पी. रेलवे स्टेशन सोलापूर

## श्रियाळ.

या नावांचें गद्यपद्यात्मक नाटक आह्मीं अति मेहनतीनें रचिलें असून तें सुंदर टैपानें छापून लौकरच प्रसिद्ध करण्याचा आमचा इरादा आहे; परंतु तो सर्व आश्रयदात्यांवर अवलंबून आहे. सबब गुणग्राही व स्वभाषेंतील ग्रंथास उदार आश्रय देऊन नवीन नवीन ग्रंथ रचण्यास **उत्तेजन** देणाऱ्या सद्गृहस्थांस सविनय **प्रार्थना आहे** कीं, त्यांनीं आपला उदार हस्त पुढें करून आश्रय देण्याची कृपा करावी सदर्हू ग्रंथाची किंमत अतिस्वल्प ह्मणजे ता० ३१।१२।८० पर्यंत देणारास प्रत्येक प्रतीस ॥६ व टपालखर्च ॥६ मिळून ॥६॥६ त्यापुढें देणारास टपालखर्चासह दर प्रतीस ॥८॥६ ठेविली आहे. या पुस्तका संबंधी पत्रव्यवहार ठेवणें तो खुद्द आमच्या किंवा रा. रा. दामोदर एकनाथ पाटसकर मार्स सिग्नलर स्टेशन सोलापूर यांचे नांवांवर ठेवावा. नाटपेडपत्र घेतलें जाणार नाहीं अगाऊ वर्गणीदारांचीं नांवें ग्रंथाच्या शेवटीं छापलीं जातील. तारीख १९ नवेंबर सन १८८०

विठ्ठल भगवंत लेभे स्टेशन मास्तर जी. आय. पी. आर स्टेशन पाकणी.

---

हें पत्र आकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २० माहे डिसेंबर सन १८८० इसवी अंक ५०


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

तीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांस अगाऊ वर्गणी घावी ह्मणजे पत्र सुरू होईल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| ...टी १० ओळीचे आंत | १ |
| ओळींपुढे दर ओळीस | ०१०६ |
| नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| ...श छिर्पीत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## ...ट्रिक्युलेशन परिक्षेचा निकाल.

मुंबई.

...ई युनिव्हर्सिटीचा सालपत्रकूची म्याट्रिक्युलेशन परीक्षा मुंबई, पुणें, अमदाबाद, बेळगाव, व कराची अशा पांच ठिकाणीं झाली. तिजमध्यें पास झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें:—

अभ्यंकर कृष्णाजी भास्कर, आदरतनवाला फर्दुनजी दोराबजी, आदरतनवाला के. दोराबजी, अगासकर कृष्णाजी जगन्नाथ, अलढेलस फिरोजशा धनजीभाई, आठल्या अच्युत श्रीधर, आझवेडो ह्यालिस, बनातवाला जमशेटजी एदलजी, बापमोला सोराबजी कावसजी, बापट चिंतामण सदाशिव, बेलापुरे नगीनदास दामोदर, भार्चा शापुरजी डोसाभाई, भाटवडेकर गणपत केशव, भाटवडेकर डी. काशिनाथ, बिलिमोरा दोराबजी नवरोजी, बिलनी फर्दुनजी नसरवानजी, बाग्सी बमनजी रस्तमजी, बुयत त्रिंबकराव त्रिकमराय, चाफेकर निळकंठ भास्कर, चैबळ कृष्णराय बिनायक, चव्हाण उद्धवजी देवजी, छाया जेठाशंकर जिवनराम, क्लार्क मोतीराम हरीदास, कंट्रयाक्टर नवरोजी कावसजी, दवात दोराबजी गेरबानजी, दादाछानी होरमसजी हेमुलजी, दादीबरजोर होरमसजी पेस्तमजी, दादी मास्तर रस्तमजी आर्देसर, दलाल चुणीलाल जवानदास, दामले बाळकृष्ण निळकंठ, दामले महादेव गंगाधर, दारुखानेवाला एम. पेस्तमजी, दारूवाला जमशेटजी रतनजी, दारूवाला मेरवानजी एदलजी, दस्तुर होरमसजी दोराबजी, दस्तीव पी. सिल् वेस्तर, जार्ज फ्रेडरीक, एम. एल् फ्रानिसस, डिसा फ्रांसिस, डिसा व्हिन्सेन्ट फिलिप देसाई रामचंद्र आबाजी, देशपांडे डी. लक्ष्मण, देशपांडे एस. परशराम, डिलिल्बा जोसेफ, डिसोजा आल्बर्ट देव सिताराम विष्णु, देवरणकर नारायण सदाशिव, धैर्यवान बी. कृष्णराव, दिवेचा नवराजी, दिवेचा तुंदरजी, डाक्टर शापुरजी, डोंगरे पुरुषोत्तम भास्कर, दोषी मगनलाल, धोतीवाला फर्दुनजी, इंजिनियर होरमीभाई, इंजिनियर हिरजीभाई, फिरेरा फ्रांसीस, फिजदर आलूफा, गंधे भगवंत गणेश, गांधी विरचंद राघवजी, गांगोली महाबलेश्वर, घाणेकर नारायण कृष्ण, घोंडे जी. मयाशंकर, घोंडे एल. मया शंकर गंडेरे एन. छगनलाल, हनाफी महंमद हुसेन, हारवर सोराबजी, हिरामाणिक रस्तमजी, इच्छापुरे एदलजी, जान महमद इस्मायल, जगकर खंडेराव अथन्नाथ, जोगळेकर सिताराम बल्लाळ, जोशी गणेश सदाशिव, जोशी केशव भिकाजी, जोशी रामचंद्र भिकाजी, जोशी विनायक सदानंद, जोशीस्पूरा डी. न्यालचंद, जुनरी गोविंद गणेश, कब्राजी बमनजी नवरोजी, काळे कृष्णराव नारायण, काळे सखाराम सदाशिव, काळे वामन नारायण, कामा काका होरमसजी पेस्तमजी, कनवाकर शामराव गणपतराव, कामदीन जमशेटजी फर्दुनजी, काने काशिनाथ वामन, कानेकर मोरेश्वर केशव, कापडिया फर्दुनजी शापुरजी, कारका पेस्तमजी सोराबजी किरकिरे कृष्णाजी हरी, किरलोसकर विष्णु रामचंद्र, कोठारे मोरेश्वर विठोबा, कोठारे मोठाभाई दादाजी, कुळकर्णी मंगेश अनंतया, लाड रामचंद्र कृष्णराव, लाकडवाला दिनशा माणकजी, लाकडवाला माणिकजी डोसाभाई, लाकडवाला नवरोजी मंचरजी, लालानसरवानजी बरजोरजी, लाहिवाले माणिकजी बापुजी, लिमये वामन रामचंद्र, लखमत बी. अब्दुल इक्रीम, मादन सोराबजी, महालक्ष्मीवाला के. डी. महालक्ष्मीवाला पी. डी. मानकर बी. रामचंद्रजी, तानकर शामराव दिनानाथ, मंत्री भाऊ जनार्दन, मंत्री काशिनाथ जनार्दन, मिस्केटा म्यानल. मास्तर त्रिभुनदास, मास्तर मंचरशा, मास्तर सावकशा, मंत्रिणवाला होरमसजी, मेहेता दमाणभाई, मेहेता धनजीभाई, मेहेता गंगाराम, मेहेता जमेतराय, मेहेता कावशा, मेहेता हरजीवनदास, मेहेता जेठा शंकर, मेहेता उत्तमचंद, मेहेता सोराबजी, मेहेता बाजाराम, मेहेता विठ्ठलदास मरचंट हरकिसनदास, मास्तर माणकशावर, मेस्त्री फ्रामजी, मेस्त्री मंचरजी, मेस्त्री पालनजी, मोदी कावसजी, मोदी मगनलाल, मोदी सोराबजी. माहोळकर मनोहर नारायण, मुधोळकर रामचंद्र गोपाळ, मुल्लान जमशेटजी, मुल्लन होर्मसजी, मुनसी मेरवानजी मुनसी गुलाम महंमद, मुनसी बाबा मिय्या, मुनसी मदनलाल, मुलदादाभाई, नाडकर्णी मंगेश मारुती, नाईक दादाजी आपाजी, नाईक हरीचंद्र सदाशिव, नळशेटना रतनजी, नवलकर बापूजी नारायण, नेनें यशवंत विष्णु, पाध्ये दामोदर गणेश, पादशहा बरजोरजी, पावस थिओफिलो, पांथाकी फ्रामरोज, पानथाकी जमशेटजीशहा पाटील दिनशा दादाभाई, पाटील खरशेटजी सोराबजी, पाटील पेस्तमजी दादाभाई, पाठक रामकृष्ण श्रीधर, पाठक शाहू दाजी, पाठारे नानाभाई बापूजी, पाठारे वामन दादाजी, पटवर्धन वासुदेव विठ्ठल, पेमास्तर आर्देसर, पेरा अंटोनिओ, पिरेरा फिलिप, प्लिडर आर्देसर, प्लिडर फिरोजशा, पोखणवाल होरमसजी पोस्टवाला बैरामजी, प्रधान वासुदेव जगन्नाथ, रायरकर निळकंठ बाळकृष्ण, रायरेकर वासुदेव चिंतामण, राणे विठ्ठल बापुजी, राणीना रस्तमजी नानाभाई, रणजीत विनायक अनंदराव, रेडकर महादेव बाळकृष्ण, रिपोर्टर फिरोजशहा, रोसेलर अल्लाईन, रोझार जोसेफ, रोझार वोल्टर, सबनिस नारयण घनःशाम, सबनिस आर. घनःशाम. सबनिस सितारास विठ्ठल, सहस्त्रबुद्धे गणेश बळवंत, सकलादवाला नानाभाई, साकत नगीनदास, संजाना बरजोरजी जमशेटजी, साराईस चुनीलाल, सासाहितल शांतापा गणेश, साठे बळवंत नारायण, साठे दामोदर वामन, सावे मोरेश्वर लक्ष्मण, शेटणा नरोत्तमदास, शेटणा डोसाभाई, शहा रामदास, शांधते अत्रीचंद, शेवेकर विष्णु रघुनाथ, शॉपकीपर सोराबजी, सराफ कल्याणदास; सराफ मोतीलाल, सखावती मंचरजी, सर्व्हेअर नसरवानजी सुतारा चांदजीभाई, सुतारा चेरेलाल, सतन अलेक्झांडर, ताम्हणे एन रामचंद्र, तारापुरवाला रतनजी, तासीवाला रस्तमजी, तारखंड बी. आत्माराम, टाट धनजीभाई रस्तमजी, टाटा एदलजी पेस्तमजी, ठाकूर नारायण दाजी, थेरात चिंतामण विनायक, टुल्लु गोविंद महादेव, टुपे गोविंद बळवंत, आडचोर फ्रामजी, उग्रणकर विठ्ठल लक्ष्मण, उणवाला बमनजी, उणवाला रस्तमजी, वकील आर्देसर, वर्धरकर जेकब बापुजी, वादिया, बापुजी रस्तमजी, वाडन बेहेरमजी, रायटर दाराशा, करमाली दोस्तमहमद रस्तमजी बेहेरमजी

पुणें.

एटकीन विलियम, आर्ते भास्कर रामचंद्र आत्रे हणमंत बापुराव, बर्वे हरी विष्णु, भारुचा फिरोजशा, भिडे बाळाजी विनायक, चालवर्ण आर. संभय्या, छत्रे गोविंद चिंतामण, चिकोडी रायापा सतापा, चिटणीस गोपीनाथ चिंतामण, दामले दिनकर नारायण, धडफळे कृष्णाजी बहेरव, ढेकणे बापु नारायण, ढेकणे काशीनाथ दामोदर, धोपटे वासुदेव गंडु, दिगे यशवंत वामन, दिक्षित बेहरव विष्णु, एक बोटे आबाजी रामचंद्र, गाडगीळ परशराम हरी, घाटे गंगाधर नारायण, गडबोले केशवरावजी, गोगटे बळवंत रामकृष्ण, हरडीकर चिंतामण कृष्ण, जागदे गणेश बळवंत, जयनापुरकर व्ही. रामचंद्र, जोग केशव आबाजी, जोग वासुदेव नारायण, जोगळेकर लक्ष्मण नारायण, जोगळेकर गणेश व्यंकटेश, जोशी गोपाळ नरहर, काळे बाबुराव नारायण, काळे विष्णु कृष्ण, केळकर नारायण अबाजी, केतकर केशव सदाशिव, खेर गणेश विष्णु, खिरसागर नारायण मारुती, कुळकर्णी नारायण वामन लोय गंगाधर नारायण, लेले हरी विष्णु, लाहोकारी कृष्णाजी व्यंकटेश, लोखंडे बाळाजी गणेश, महत्कार दामोदर सखाराम, मानें लक्ष्मण गणपत, मर्चंट कावसजी, नगरकर लक्ष्मण दाजी, नगरवाला जमशेटजी. नेने नारायण विश्वनाथ, पाळंदे प्रभाकर हरी, पंडित अनंत नारायण, परडेकर हरी गोपाळ, परांजपे बी. बळवंतराव, पारनाईक नारायण आबाजी. पर्वते श्रीधर बळवंत, पाटील डोसाभाई, फाटक दिनकर पुरुषोत्तम पोतनीस बळवंत गंगाधर, रासलकर हरी विनायक, राजवडे विनायक काशिनाथ, रिचर्ड सन राबेनसन, सबनिस रामचंद्र कृष्ण, साठे शंकर केशव, साठे विठ्ठल गणेश, साठे श्रीधर नारायण, शेषाद्री पी. नारायण, शिंदे महादेव लक्ष्मण, सोहणी कृष्णाजी विष्णु, तारकी आर. पांडुरंग, टिळक कृष्णाजी गणेश, तळापुरकर गोपाळ नारायण; तुमस वामन गोपाळ, वैद्य दत्तु बाळकृष्ण.

बेळगाव.

आंकले कुबेर भरामापा, आपटे कृष्णाजी भास्कर, आपटे रघुनाथ नारायण, अत्तार अबदुल्ला, बापट नारायण शिवराम, विजापूरकर विष्णु गोविंद, चांफेकर कृष्णाजी बल्लाळ, चीपडे श्रीनिवास लक्ष्मण, दांडेकर लक्ष्मण गणेश, दात्ये गोविंद गणेश, देसाई नारायण बळवंतराव, भुपेश्वर धोंडो आत्माराम, घामणगी बी. चेनबसअप्पा, धुमे बाळकृष्ण वामनराव, हेबाळ दासो अण्णाजी, नावडेकर डी जगन्नाथ, काळे गुरुनाथ श्रीपाद, काळे कृष्णाजी श्रीपाद, काळे विष्णु श्रीपाद, कलघडगी भास्कर गणेश, अळसुलकर त्रिंबक विठ्ठल, कडके डोसाभाई, करमरकर हरी भिकाजी, खटाव हरी बाळाजी कीर्तने रामचंद्र त्रिंबक, कुळकरणी अनंत नृसिंह, कुळकरणी दत्तोरामचंद्र कुळकरणी विठ्ठल कृष्ण, मोघे विष्णु बळवंत, नाडगौंड एन् अण्णाराव, नाईक रामचंद्र अनंत, पठाण इस्मायल खान, फडके श्रीपत गोविंद, फडणीस हणमंत शेषगीर, बैंगणकर गणेश विश्राम.

कराची.

आडवाणी वालचंद, आडवाणी गिडनमल, आडवाणी खुशालसिंग, आडवाणी चौथराम, ब्रक्स थाम्पसन्, चनाई जहांगिर चंदीरामणी दायमल, दुबाश जहागिर हरदारामणी रामनदास, हिगोराणी सोलातराय, कौहिया जहागिर कुमरजी, चांदसिंग कुकेरजा चांदमल, ओजा सुंदरलालचंद, रामचंदानी परभदास, थंढाणी थानवरदास तिजाणी महमद; वजिराणी खिमचंद.

याशिवाय अलाहाबादेसही ७७ विद्यार्थी म्याट्रिक्युलेशन परिक्षेंत पसार झाले. तीं नांवें स्थल संकोच्यामुळें आह्मी सविस्तर घेतलीं नाहींत.

वऱ्हाडसमाचार.

मिति मार्गशीर्ष कृष्ण ४ शके १८०२

## बडोद्याच्या राज्यव्यवस्थेचा रिपोर्ट

बडोद्याचा रेल्वेचे योगानें मुंबईशी संबंध आहे. शिवाय तिकडील व्यापार, मुकत्याच झालेल्या राजकीय घडामोडी, कडाक्याचीं लग्में इत्यादि कारणांनीं मुंबई इलाख्यांत बडोद्याकडील गोष्टींकडे लोकांचें विशेष चित्त आहे. व तिकडील राज्यकारभार हल्लीं लक्ष्य देण्याजोगा चांगल्या स्थितीनें चालत आहे, म्हणून मि॰ मेलवील गवरनर जनरलचे बडोद्याचे एजंट यांनीं गुदस्त सालच्या त्या संस्थानच्या रिपोर्टांतील गोष्टी प्रसिद्ध झाल्या त्या लोकांस अगत्याच्या वाटतील यांत संशय नाहीं. हा रिपोर्ट प्रसिद्ध होण्यास फार उशीर झाला, त्याजबद्दल असें लिहिलें आहे कीं गुदस्तांचे सप्तंबर व अक्टोबर महिन्यांत एजंट यांचे आफिसांतील बहुतेक मंडळी ज्वरानें आजारी होती त्यामुळें, महाराजांच्या लग्नसंबंधी गडबडीमुळें व सरटी माधवराव हे कांहीं दिवस बाहेर गावीं गेले असल्यामुळें रिपोर्टास अवकाश झाला.

गुदस्त सालीं बडोद्याचे संस्थानास एकंदर जमा १,३१,२०,८४२ समशेरी रुपये झाली. तिगस्त साली १,२०,१२,२११ रुपये झाली होती. व गुदस्त सालीं खर्च १,३२,११,३१० रुपये झाला. व तिगस्त साली १,२२,१४,१०९ रुपये झाला होता. दोन्ही सालीं जमेहून खर्च अधिक होण्याचें कारण ही सालें एक महागाईचें व एक दुष्काळाचें अशीं होतीं त्यामुळें खर्च वाढला. गुदस्तां जमेपेक्षां ९०६४८ रुपये अधिक खर्च झाला. तितकीच जमा सरकारी नोटीचे व्याजाची आकारावयाची शिलक राहिलेली आहे. जमीन बाबेत सात लक्षांहून अधिक वाढ आहे तिचें कारण न येती बाकी वसूल झाल्याचें आहे. व अफूच्या उत्पन्नांत तीन लक्षांची वाढ आहे. ते व दुसरे खर्च विशेष कारणानें झालेले गाळाऊ केले म्हणने या सालीं ९६६२३ रुपये मागील सालपेक्षां अधिक फायदा झाला असें रिपोर्टावरून दिसत आहे. खर्चाच्या रकमांत जमीन बाब, पब्लिकवर्क्स व अफूचें खातें यांत वाढ आहे. तरी बाड्याकडील खासगी खर्च, फौजे संबंधी खर्च व दुसऱ्या कित्येक बाबी यांत खर्च मागील पेक्षा कमी झाला आहे हें पाहून संतोष वाटतो. साल अखेर शिलक ७३ लक्ष रुपये आहे. व हिंदुस्थान सरकारच्या सिक्युरिटीमध्यें १०२ लक्ष रुपये आहेत हे व इतर सर्व प्रकार पाहून बडोद्याचें वसूली खातें समाधानकारक आहे यांत संशय नाहीं. बाड्याकडे व फौजेचे खर्चा कडे ९०,०८,९९४ रुपये आहेत. व पोलिसचा आणि तुरुंगाचा खर्च फौज खर्चांत धरलेला नाहीं तो स्वतंत्र आहे. फौजेकडील ३६ लक्ष रुपये खर्चांत ७,७३,४९९ रुपये रेग्युलर फौजेकडे आहेत व इरेग्युलर फौजेकडे २९,९३,४८७ रुपये खर्च आहे.

बडोदे संस्थानांत दिवाणी फौजदारी कामाची व्यवस्था फार चांगली आहे गेल्या सालांत ११९४७ अवल दिवाणी दावे झाले. व त्यांपैकीं सुमार दोन हजार शिल्लक राहून बाकी सर्वांचे निकाल झाले. दाव्याची सरासरी किंमत २६३ रुपये होती. फौजदारी फिर्यादी १०६०६ झाल्या. त्यांपैकीं शेकडा ९४ गुन्हेगार ठरले. कडीपट्टणाकडे मनुष्याचे शरीराविरुद्ध गुन्हे झाले आहेत त्याशिवाय एकंदर साऱ्या प्रांतांतील गुन्ह्यांचें स्वरूप चोऱ्याशिवाय दुसरें नाहीं. मि. मेलविल साहेबानीं लिहिलें आहे कीं या संस्थानांत जुडिशियल खातें चांगलें पायाशुद्ध स्थापन झालें आहे. हलक्या प्रतीच्या कांहीं थोड्यां न्यायाधिशाशिवाय एकंदर सर्व कामदार एथें फार चांगले आहेत. ते इंग्लिश राज्यांतून अनुभव लेले असे आले आहेत व त्यांस पगार चांगले आहेत व त्यांचीं कामें उत्तम असतात. त्यांतही वरिष्ठ कोर्ट आणि सेशन कोर्टें यांचे जडज फार उमदे आहेत. लोकांस उत्तम न्याय मिळणें हें राष्ट्राच्या उत्तमतेचें उदाहरण होय. व बडोदा नेटिव संस्थानांत अशी सुस्थिति आहे हें तेथील लोकांचें मोठें भाग्य समजलें पाहिजे व त्याकरितां अधिकाऱ्यांची तारिफ केली पाहिजे.

बडोदा शहरच्या म्युनिसिप्पालिटीविषयीं मेलविल साहेबांनीं चांगलें लिहिलें आहे. शहराची स्वच्छता, रस्त्यावर पाणी शिंपणें, रस्त्याची दुरुस्ती वगैरे खर्चाकडे गेल्या सालीं म्युनिसिप्यालिटीनें १,७९,८३४ रुपये खर्च केले आहेत. शहर चांगलें स्थितींत आहे. रात्रीं दिवे लावण्याची योजना झालेली आहे, मुख्य रस्त्यावरून पाणी चांगलें शिंपडलेलें असतें व स्वच्छता चांगली असते. आगी विजविण्यासाठीं पाण्याचे बंब जागोजाग ठेविले आहेत. यां संस्थानांत बडोद्याशिवाय दुसऱ्या १९ ठिकाणीं म्युनिसिप्यालिट्या आहेत. व त्यांकडून ९२,००० रुपये खर्च झालेला आहे.

सालगुदस्ताचे पब्लिकवर्क्स संबंधी खर्चांत ११॥ लक्ष रुपये रेल्वेकडे खर्च झाले आहेत. डभोई पासून बहादरपुरापर्यंत सुमार १० मैलाची बडोदे सरकारानें स्टेट रेल्वे केली आहे. व डभोई पासून बडोद्यापर्यंत १८ मैल रेल्वे करण्याची तयारी झाली आहे. बडोदे संस्थानाला रेल्वेच्या सोयी इतर सर्व संस्थानांपेक्षां चांगल्या आहेत व त्यामुळें त्याची स्थिति दिवसानुदिवस सुधारत आहे. राजपुताना स्टेट रेल्वे, काठेवाड स्टेट रेल्वे व मोठी कंपनी बडोदा रेल्वे या सर्व रेल्वे या संस्थानांतून गेलेल्या आहेत.

विद्येच्या कामींही बडोदा संस्थानचें दुर्लक्ष्य नाहीं. गेल्या सालीं या खात्याकडे खर्च १,८७,८९४ रुपये झाला. व ९ इंग्लिश मराठी नवीन शाळा सुरू झाल्या.

याप्रमाणें बडोद्याचे रिपोर्टांतील हकीकत मोठी समाधानकारक आहे.

---

## शेतकऱ्यांची दैन्यदशा.

हिंदुस्थानांतील मुख्य उत्पन्न शेतकीचें आहे म्हणून या देशांतील बऱ्या वाईट स्थितीचा विचार करावयाचा म्हटला म्हणजे एथील शेतकीकडे लक्ष्य दिलें पाहिजे. म्हणजे तिची लागवड करून निर्वाह करणारे शेतकरी कशा स्थितींत आहेत हें पाहिलें पाहिजे. या देशाचे बहुतेक भागांतील शेतकरी दिवसानुदिवस मोठ्या दैन्य दशेंत येऊं लागले आहेत. हें थोड्याच दिवसांचे अनुभवावरून दिसून येतें.

कांहीं वर्षांपूर्वीं कपाशी अतिशय महाग झाल्यामुळें इकडील शेतकीची मोठी भरभराट दिसत होती म्हणजे सरकारचा सारा नेमल्यावेळीं एकदम वसूल होऊन शेतकऱ्यास वर्षांचे बेगमीचें धान्य उत्पन्न होई, पण असा काळ फार थोडा राहिला. तथापि त्याच संधींत " उत्तम शेती " ही जुनाट म्हण इतर धंदा करणारांस खुपूं लागली. मग काय विचारता? सर्वच आप आपली हत्यारें गुंडाळून ठेवून शेतकी करण्यास प्रवृत्त झाले. तेणेंकरून कित्येक मुदतीची पडित जमीनही वहित झाली. पण तो कपाशीचा भाव जसजसा कमी होत गेला तसतसे शेतकरी लोक कर्ज बाजारी होऊं लागले म्हणजे शेत सारा देण्याची वेळ आली कीं, सावकाराचें कर्ज ( शेतीचा माल देण्याचे बोलीनें ) काढून वेळ मारून न्यावी अशींही कांहीं वर्षे गेलीं. व ईश्वरी सहाय्य असतें तर अजून पुढेंही कित्येक वर्षे लोटलीं असतीं; गेल्या दोन वर्षांत दक्षिण प्रांतांत आवर्षणानें मोठाच धक्का दिला तेणेंकरून मोठा दुष्काळ पडून त्या भागाची बरीच धुळधाणी झाली. त्यांस सारा देण्याचें सामर्थ्य केव्हां व कसें येईल हें सांगवत नाहीं पण इतर भागांतून सुद्धां सरकारचा शेत सारा वसूल होत नाहीं म्हणून मुंबई इलाख्यांत शेत सारा वसूल करण्याच्या संबंधानें नवीन नियम ठरल्याचें प्रसिद्धीस आलें आहे तेणेंकरून नेमल्यां तारखेस शेत साऱ्याची आदाई न झाल्यास मिरासदार, खातेदार, व इनामदार यांजकडून सदहू जमीनी परत सरकारास घेतल्या जातील.

अशा प्रकारची स्थिति हल्लीं आमचे देशांतील शेतकीची व शेतकऱ्यांची आहे. मग पुढें पहावें कशी काय सुधारेल ती.

---

## म्युनिसिपल कामिट्या व सरकार.

म्युनिसिप्यालिटीचें अस्तित्व मुळांत जरी सरकारच्या बरोबरीचें आहे तरी आमच्या गावगन्ना म्युनिसिप्यालिट्यांची स्थिति पाहू जातां त्या सरकार व्यक्तीपासून निराळ्या व स्वतंत्र आहेत असा मुळींच भास होत नाहीं. कारण त्यांचे अध्यक्ष उपाध्यक्ष हे बहुतकरून सरकारी अमलदारच असतात त्यावरून म्युनिसिप्यालिट्यांची व्यवस्था सरकारच्या इच्छेप्रमाणें राहते यांत कांहीं विशेष नाहीं. परंतु ज्या ठिकाणीं म्युनिसिप्यालिटीचें सर्वच वैभव निराळ्या प्रकारचें म्हणजे आपल्या वऱ्हाडच्या उत्पन्नाइतकें जिचें उत्पन्न व त्याचप्रमाणानें मोठमोठाल्या पगाराचे तिचे स्वतंत्र अधिकारी आहेत व अध्यक्ष उपाध्यक्ष आहेत तेव्हां त्या कमिट्यानां आमच्या गावगन्ना कमिट्यापेक्षां अधिक स्वातंत्र्य अनुभवतां येत असावें असें वाटत होतें परंतु गेल्या आठवड्याच्या नेटिवओपिनियनमध्ये "मुंबईची म्युनिसिप्यालिटी व सरकार" या सदराखालीं मजकूर प्रसिद्ध झाला आहे त्यावरून आपल्या हिंदुस्थानांतील म्युनिसिप्यालिट्यांस किती स्वातंत्र्य असतें याची कल्पना आमचे वाचकांस सहज करतां येईल. ती हकीकत खालीं घेतों:—

मुंबई सरकारानें स्पर्शजन्य रोग प्रतिबंधाचा कायदा मुंबईंत चालू केला याजमुळें तेथील म्युनिसिपल कार्पोरेशन व सरकार यांजमध्यें कलह उत्पन्न झाला. लोकांस हा कायदा शहरांत चालू व्हावा असें वाटत नाहीं
त्याचप्रमाणें त्यांच्या तर्फेची मुकत्याराची म्युनि
सिपल कार्पोरेशन ही मंडळी यांसही तसें हो
णें नीट वाटत नाहीं असें असतां सरकारानें
तो कायदा चालू केला आणि म्युनिसिप्यालि
टीपाशीं खर्चाकरितां पैसा मागितला. म्युनि-
सिपालिटीनें पुष्कळ वेळ सभा भरून वाद
विवाद व विचार करून त्या कायद्यास द्रव्य
सहाय करावयाचें नाहीं असें ठरविलें. प
त्यांणीं इतकोच सबब ठेविली होती कीं
निसिपालिटीची स्थिति पैशाच्या संबंधानें
री असली तरी हल्लीं दवाखान्यांस जो
होतो त्यापेक्षां पंधरा हजार रुपये रो
औषधोपचार करण्याकरितां अधिक
सरकारानें एवढेंच म्हणणें मनावर घेऊ
कायद्याच्या संबंधानें दवाखाना घाल
आहे त्याजकरितां पंधरा हजार रुपये
अगर सरकार जे नव्वद हजार रुपये
तेथील पोलीसच्या खर्चाकरितां देतें
कीं पंधरा हजार रुपये कापून घेतले
असें त्यांणीं सुचविलें या म्हणण्याबद्द
विचार व वाटाघाट होऊन म्युनिसिप
या कायद्याच्या खर्चाकरितां देण्याचें
केलें नाहीं सबब ते रुपये म्युनिसि
च्यानें देववत नाहींत व पोलिस
नेमणुकेंतून सरकारानें कापून घेणें
नाहीं आणि त्यांणीं तसें करूनये म्हणून सु-
चविलें. परंतु याचा विचार न करतां तेथील
सरकारानें तारिख ७ बिनहू रोजीं म्युनिसि
पल कामिशनर यांस कळविलें कीं म्युनिसि
पालिटीनें असा ठराव केला याजबद्दल वाईट
वाटतें; परंतु म्युनिसिपालिटीनें या कामाबद्द
खर्च द्यावा असें सरकारास वाटतें त्या वाट
ण्याप्रमाणें आतां झालें पाहिजे आणि उ
अर्थीं म्युनिसिप्यालिटी खुषीनें पैसा देत न
हीं त्या अर्थीं सरकारानें पोलिस नेमणुकेपै
कीं १९००० रु. कमी करण्याचा निश्चय
केला आहे व त्याप्रमाणें ७९००० रु. पो-
लिस नेमणुकेबद्दल देण्याविषयीं अकौंटंट ज-
नरल यास कळविलें जाईल. याप्रमाणें सर-
कारचें आलेलें पत्र टौन कौन्सिल पुढें गेल्या
मंगळवारीं सादर झालें. त्याजवरून हें आम-
च्या सरकारचें करणें बरोबर नाहीं असें त्या-
सभेस वाटून त्यांणीं हिंदुस्थान सरकारास या-
जबद्दल अर्ज पाठविण्याचा विचार केला व
मसुदा तयार करण्यास अध्यक्षास सांगितलें.

या वरील हकीकतीवरून हें उघड सि-
द्ध होतें कीं मुंबईसारख्या प्रेसिडेन्सीचे ठिका
णीं सुद्धां स्वतंत्र म्हणविणाऱ्या म्युनिसिप-
ल कमिटीस सरकार धमकी देऊन आपल्या
मताप्रमाणें वागण्यास सांगते. मग आपल्या
इकडील गावगन्ना म्युनिसिप्यालिट्यांची काय
हकीकत आहे? परंतु हेंही आमचे वाचकांचे
लक्षांत आलें असेल कीं मुंबईची म्युनिसिप
लिटी सरकारचें म्हणणें आपणास कबूल
हीं म्हणून स्वस्थ न बसतां हिंदुस्थान सर
राकडे अर्ज करून दाद मागणार आहे
पायरीपायरीनें हें प्रकरण पार्लमेंट पर्यं

पोंचेल असें समजतें. कारण असाच प्रकार पूर्वीचे गवरनर सर फिलिप वोडहाउस यांच कारकीर्दीत झाला होता पोलिस नेमणुकी पैकीं कांहीं रकम सरकारोंन अटकावली होती व त्याबद्दल प्रकरण माजून हिंदुस्थान सरकारापर्यंत गेल्यावर त्या सरकारोंन मुंबई सरकारास कळविलें कीं, असें करण्यास तुह्मास अधिकार नाहीं. तेव्हां अशी पुन्हा दुसरी गोष्ट घडून येणें बरोबर नाहीं. सरकारासही हें योग्य नाहीं कीं आपण दिलेली स्वतंत्रतेची देणगी आपणच परत घ्यावी! व आमच्या गावगन्ना कमिट्यांनीही असे विपरीत प्रसंगीं दाद मागण्यास मागें घेऊं नये असें आह्मांस वाटतें.

---

पुस्तकांची पोंच.

"लोहमार्ग" आणि मराठी आगगाडी हें पुस्तक छापून त्याचे कर्त्यांनीं एक प्रत आह्मास नजर पाठविली आहे तिचा आह्मी अत्यादर पूर्वक स्वीकार करितों. या पुस्तकांतील उपयुक्त माहिती आह्मी आपले वाचकांस स्थळावकाशानें पुढें देऊं.

---

## वऱ्हाड.

कर्नल बेल साहेब कमिशनर यांची स्वारी काल कुरुमाहून उमरावतीस गेली.

---

कर्नल बुशबी साहेब जुडिशियल कामिशनर काल यवतमाळास असून आज बडनेरास येणार होते.

---

हायर व लोअर स्टांडर्डच्या परिक्षेचा निकाल १५ वे तारखेचे रेसिडेन्सी आर्डर आत्मच आल्यावरून समजला तो असाः-

हायर.

१ रा. रा. वासुदेव सदाशिव इलिचपुरचे क्लार्क आफ कोर्ट.

लोअर.

१ रा. रा त्रिंबक गणेश यवतमाळचे नायब तहशिलदार, २ रा. रा. कृष्णाजी अनंत वाशिम डि० कमि. चे कारकून, ३ मि. शापुरजी विरजी मलकापुरचे तहशिलदार, ४ रा. रा. गणेश पांडुरंग बुलढाण्याचे डिपुटी क्लार्क, ५ रा. रा. आत्माराम अनंत यवतमाळचे डिपुटी क्लार्क आफ कोर्ट, ६ रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ पोलिस इन्स्पेक्टर, ७ व रा. रा. टी रंगराव अय्याची.

हीं नांवे परिक्षेच्या योग्यतेच्या क्रमानें लिहिलीं आहेत.

---

मुंबईस म्याट्रिक्युलेशन परीक्षेसाठीं वऱ्हाडांतून यंदा १५ विद्यार्थी गेले होते पैकीं उमरावती हायस्कुलांतून ७, अकोलें हायस्कुलांतून ७, व खासगी सर्टिफिकिटानें १. पैकीं उमरावती हैस्कुलांतून दामोदर गणेश पांड्ये, महादेव गंगाधर दामले, शाहूदाजी पाठक व विष्णु रंगनाथ शेवेकर हे चार पास झाले. अकोले हैस्कुलांतील कृष्णाजी भास्कर अभ्यंकर, भगवंत गणेश गंधे, मनोहर नारायण मोहोळकर व वामन नारायण काळे हे चार पास झाले हें कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो. व खासगी सर्टिफिकिटाचे महमद हुसेन हेही पास झाले गुदस्त सालीं अकोला हायस्कुलाची बाजू अंगदींच घसरली होती पण या वर्षीं त्यानें उमरावती हायस्कुलाशीं अगदीं बरोबरीचें साम्य केलें हें पाहून संतोष वाटतो.

---

मेजर लेन साहेब इन्स्पेक्टर जनरल एथें आले ह्मणून आह्मी मागें कळविलेंच आहे. ते गेल्या मंगळवारीं एथील बेदुरस्कुलांत गेले होते व तेथील विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन साहेब बहादुर फार खुश झाले व कांहीं इनामही दिल्यचें समजतें. गेल्या शुक्रवारीं इन्स्पेक्टर जनरल साहेबांची स्वारी बाळापुराकडे गेली.

---

उमरावतीचे लो. इंजिनियर मि. मरो साहेब यांस भ्रम झाल्याविषयीं आह्मी कळविलेंच आहे. यांची प्रकृति उमरावतीस चांगली होईना ह्मणुन त्यास गेल्या सोमवारीं मुंबईस पाठविलें व बरोबर मि. ला साहेब नेलर यांस दिलें आहे असें समजतें.

---

मि० शेषाचलम मुदलियार तहशिलदार यांची दोन महिन्यांची रजा संपली. आतां यांनीं आजारी पणाचे सर्टिफिकिटानें आणखी ३॥ महिन्यांची रजा घेतली आहे.

---

यवतमाळास शनिवारीं जुडिशियल कामिशनर साहेबापुढें एक सेशनचा मुकदमा चालून आरोपीस फांशीची शिक्षा देण्यांत आली. दारव्हे तालुक्यांतील लाख या गावच्या रावजी हटगर नावाच्या आरोपी मनुष्यानें आपले बायकोशीं आपला भाऊ रामजी हा व्यभिचार करितो असें समजून त्यास कुऱ्हाडीनें ठार मारिले होते व त्याला सदई शिक्षा झाली.

दुसरा एक खुनी मोकदमा यवतमाळास माजिस्त्रेटापुढें चालू आहे. दारव्हे तालुक्यांतील हतोळे गांवच्या विठोबा पाटलास भाऊबंदकीचे संबंधांत त्याच्या तिघा भाऊबंदांनीं व एका किरसानानें मिळून ठार मारिलें असा चौघांविर आरोप आहे. व मि० इलियट साहेब असि. कमिशनर यांपुढें चौकशी चालू आहे. व या मुकदम्यांत आरोपी तर्फे मि. नसरवानजी पेस्तमजी कामा बारिस्टर काम चालवित आहेत.

---

यवतमाळचे तहशीलदार रा. रा. बाळकृष्ण व्यंकटेश यांची प्रकृती चांगली असत नाहीं, वारंवार आजारी पडतात सबब ते सिक रजा घेणार आहेत.

मे. लेन साहेब रजेवरून परत आल्यानें मे. ग्रांट साहेब आफिशियेटिंग फर्स्ट-क्लास असिस्टंट कमिशनर झाले० व मि. इलियट साहेब सेकंड क्लास होऊन मि. डेविस साहेब थर्ड क्लास झाले. त्याचप्रमाणें मेजर तुळक साहेब रजेवरून परत आल्यानें बदलाबदली झाली ती अशीः— मि. निकोल्टस साहेब आफिशियेटिंग थर्ड क्लास डिपुटी कामिशनरचे आफि० फर्स्ट क्लास असि. कमिशनर झाले. मेजर रेनिक साहेब आफिशि० फर्स्ट क्लास असिस्टंट होते ते सेकंड क्लास झाले व मि० शेखहिसामुदीन साहेब आफिशियेटिंग सेकंड क्लास असि० झाले होते ते थर्ड क्लास झाले.

---

सयद अबदुल हक कर्नाळकर असिस्टंट कमिशनर यांस तारीख ५ फे० सन १८७० चे रेसिडेन्सी आर्डरमध्यें मागें जी बिनपगारी एक वर्षाची रजा दिली होती ती आणखी एक वर्ष वाढविली असल्याचें १५ वे तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

---

रा. रा. भास्कर ईश्वर खामगावचे तहशिल्दार यांस डिसेंबरचे पहिले तारखेपासून किंवा ते उपयोगांत आणतील त्या तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा दिली असल्याचें रे. आ. मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

---

मे० लायल साहेब सी. एस. आय. आमचे मानि कमिशनर व हल्लीं हिंदुस्थान सरकारचे फारेन सेक्रेटरी मे० मेल्व्हील साहेबाचे जागीं बडोद्यास रेसिडेंट होतील अशी वदंता होती पण बडोदें जर मुंबई सरकारच्या ताब्यांत दिलें गेलें तर मि० फिल अथवा कर्नल बार्टन यांतून एकाची नेमणूक होईल असें ह्मणतात.

---

एथील मोहरमाचा जलसा तंटेबखेडे न होतां गेल्या मंगळवारीं पुरा होऊन ताबुत थंडे झाले. हें कळविण्यास आह्मास संतोष वाटतो. ८ व्या तारखेचा दंगल जिलपुकार बलीस ज्या थाटानें दरसाल जात असतो तो तितका वर्णन करण्यासारखा यंदा झाला नाहीं. ९ वे व १० वे तारखेस जलसा बरा झाला. पोलिसचा बंदोबस्त उत्तम होता.

---

मि. लिव्हानथोर्प असि. इंजिनियर यांना पश्चिम वऱ्हाडाकडे नेमल्याप्रमाणें ते एथें येऊन आपले कामीं रुजू झाले.

रेसिडेन्सी सर्जन मेजर ला दोन वर्षांची फर्लो रजा घेऊन विलायतेस गेले.

मेजर फिटझरल्ड साहेब डे. क. यांची स्वारी जळगावास आहे. नाताळचे सुटींत कदाचित एथें येतील असें कळतें.

वऱ्हाडांत होणारीं सर्क्युलरें वगैरेचें भाषांतर करण्याचें किंवा दुसऱ्यांनीं केलेलें तपासण्याचें काम आजपर्यंत रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण ए. अ. कमिशनर बुलढाणे यांजकडे होतें तें त्यांनीं आतां नाकारल्यावरून रा. रा. विष्णु सदाशिव पिसोळकर रेसिडेन्ट साहेबाचे क्लार्क आफ कोर्ट यांजकडे दिलें आहे.

उ० अ०

---

ADVERTISMENT.

To,

Baniahs, Contractors and others

Tenders for supplying Rations & to the Akola Central Jail for 6 or 12 months from the 15th January 1881, are invited. Wheat, Jowari, Dhall, Rice, salt, Condiments, Wool, Firewood. Oil seeds Ghee, and Hemp. The quantities and other particulars can be learned on application to the Superintendent- Rs 100 must be sent with each tender, which will be returned to the offerers whose Tenders are not accepted.

Akola Dated 14th December 1880.

T. Heme
Superintendent
Central Jail.

## जाहिरात

सर्व लोकांस कळावें कीं जितापुर तालुके अकोट एथील योगाजी वल्लद भास्करजी पाटील मैतकर यास खालीं सही करणार यानीं सन १८७७ सालांत कुलमुखत्यारपत्र दिले होतें तें काम झाल्यावर तें मुखत्यारपत्र मी-मार्च सन १८७८ इसवी महिन्यांत रद्द करून त्यावर रद्द केल्याचा शेराही देऊन सदई मुखत्यारपत्र त्याणें माझेजवळ दिलें आहे हल्लीं त्या मुखत्यारपत्राची नक्कल घेऊन तो कोणास माझे मिळकतीचा दस्तैवज वगैरे करून देतो ह्मणून ऐकिल्यावरून कळविण्यांत येते कीं सदई इसमापासून कोणी कोणतेही प्रकारचा दस्तैवज करून घेऊ नये व देऊं नये. माझे मिळकतीची विक्री अगर फरोख्ती करण्याचा अधिकार मुखत्यारपत्रांत मी दिला नाहीं सबब जे पुरते कांहीं करून दिलें असतील अगर कोणी घेतले असतील ते रद्द आहेत. जर कोणी दस्तैवज करून घेईल अगर कोणी करून देईल तर तो दस्तैवज खोटा समजला जाईल व त्यां बद्दल आह्मी जबाबदार रहाणार नाहीं. सर्वांस कळावें. तारीख १३ डिसेंबर सन १८८० इसवी.

( सही ) चरभान वल्लद शेंनाजी सोहनकर निशाणी खुद.

---

## वर्तमानसार.

नामदार व्हाइसरॉय आणि गवरनर जनरल यांची प्रकृति-अजून ह्मणण्यासारखी दुरुस्त झाली नाहीं इतकेंच नाहीं तर अजून कांहीं आठवडे यांचे कलाहाबादेहून निघणें होणार नाहीं. तरी तारीख १७ डिसेंबरच्या तारेनें समजतें कीं, त्या रात्रीं व सकाळीं नामदार साहेबांचा ताप उतरून त्यांस बरें वाटलें हें कळविण्यास आह्मास संतोष वाटतो.

मद्रास इलाख्याचे नवीन गव्हरनर नेक नामदार डब्ल्यु. पी. अॅडम साहेब यांची स्वारी आपल्या चिरंजिवासह विलायतेहून गेल्या आगबोटींतून ता० १३ मिनहू रोजीं दोन प्रहरीं मुंबई एथें दाखल झाली. मुंबई सरकाराकडून नेक नामदार साहेब यांस आगबोटींवर चार आफिसर्स सामोरे पाठविण्यांत आले होते. नेक नामदार साहेबांची स्वारी मुंबईस दाखल झाली तेव्हां चालीप्रमाणें १७ तोफांची सलामी झाली. ने० नामदार साहेबांस ने० नामदार सर जेम्स फर्ग्युसन गवरनर साहेब इलाखा मुंबई यांणीं त्याच दिवशीं मुंबई एथें सरकारी बंगल्यांत बडा खाना दिला. त्यावेळीं मुंबई सरकारचे मुख्य मुख्य अधिकाऱ्यांसही खान्याकरितां पाचारण करण्यांत आलें होतें. नेक नामदार सर अॅडम साहेब यांची स्वारी मद्रासेकडे जाण्याकरितां गेले बुधवारीं निघाली काल तेथें पोंचली असेल.

कलकत्याकडे नगरांत एथील कांहीं लोकांनीं त्याने सुधारणेची तयारी करणारे एथील डेपुटी माजिस्त्रेटचे कचेरीस गेल्या सोमवारीं आग लाविली होती. पोलिसाचे वगैरे मदतीनें ती लवकरच विजविली गेली तेणेकरून रेकार्ड वगैरे बचावलें. आग लावणारे लोक पोलिसानें कांहीं पकडल्याचे कळतें.

पुण्याच्या चिपळूणकर वगैरे मंडळीनें स्थापित केलेल्या इंग्रजी शाळेचा वार्षिक रिपोर्ट व एक मानपत्र त्या शाळेच्या पुरस्कर्त्यांनीं गव्हरनर साहेबांकडेस पाठविलें होतें त्याचा स्वीकार करून गव्हर्नर साहेबांनीं त्या शाळेस एक देणगी दिल्याचें कळतें.

गोंव्याच्यां कोळ्यांनीं एक ११ फूट लांब आणि १० फूट परीघचा बडा मासा धरल्याचें कळतें.

छोटाउदेपूरच्या राजपुत्रास तूर्त पोलिसाचे ताब्यांतून घरीं जाण्यास परवानगी दिली आहे.

सीलोन बेटांत चहाची व सिंकोना नावाच्या ज्वरनाशक वनस्पतीच्या लागवडीस गेल्या वीस वर्षांत फारच उत्तेजन आलें आहे. १८६० सालीं एकंदर सगळी सिंकोना औषधी काय ती २८ औंस लंडनास रवाना झाली होती, व १८७९ सालीं ५,०७,३६८ पौंड रवाना झाली, व सालमजकुरीं तर सुमारें दहा लक्ष पौंडाची रवानगी होईल असा अनमान आहे. १८७५ सालांत या बेटातून १४०० पौंड चहा रवाना झाला होता व गेल्या साली ८,१४१२ पौंड रवाना झाला.

रंगाच्या दंग्याचा निकाल होऊन जिकडे तिकडे शांतता झाली तरी अद्याप मोठ्या दोन ठिकाणीं पन्नास पन्नास लोक ठेविलेले आहेतच.

दक्षिण आफ्रिकेंत बतुटो लोकांचे दोस्त पोंडोलंड येथील लोक यांची आणि केपटौन सरकारच्या सैन्याची चकमक उडाली, त्यांत पोंडोमी लोकांचा सर्वस्वी पराजय झाला.

वर्धा येथील एक गृहस्थ लिहितो कीं, "नागपूर येथील शुक्रवार पेठेंत पिल्लाजीनें बांधलेलें विठोबा रखमाईचें देऊळ असून कार्तिक वद्य १ च्या सुमारास मूर्तींच्या डोळ्यांतून पाणी एकसारखें वद्य ३ पावेतों वाहात होतें, व तो देखावा रडण्यासारखा होता. हा चमत्कार पहाण्यास पुष्कळ लोक जात आहेत असें पाहून मीही पहाण्यास गेलों, व तो चमत्कार पाहिला, पण तसें कां होतें याविषयीं कांहीं कल्पना होईना. भाविक लोकांनीं अनेक तर्क करून उत्सव वगैरे केला व नागपूरकर राजेही आले होते." इ. प्र.

इराणच्या सरहद्दीवर दंगा करणारा कुर्द लोक यांच्या बंदोबस्तासाठीं कडक उपायांची योजना करण्यासाठीं तुर्की सरकारानें आपल्या कियेक मुख्य प्रधानांची योजना केली आहे असें समजतें.

अमेरिकेंत अतिशय थंडी पडून क्षारोदक, सरोवरांतील उदक थिजून गेल्यामुळें धान्यानें भरलेलीं कियेक तारवें एरी सरोवरांत अडकून राहिलीं असें न्यू यार्कच्या तारीख ५ डिसेंबरच्या तारेवरून समजतें हीं तारवें पुन्हा उन्हाळा सुरू होऊन बर्फाचें पाणी होईपर्यंत सुटण्याची आशा नाहीं.

लोकांच्या तकरारींचा आपसांत निकाल व्हावा म्हणून ऐर्लंडांतील लांडलीग सभेने कायद्याची कोर्टें स्थापन केलीं आहेत असें समजतें.

काश्मीरच्या सरहद्दीवरील गिलगिट प्रांतांतील दंगा बदकशानच्या खानांनीं उपस्थित केला आहे असें वर्तमान काश्मीराहून लाहोरच्या पत्रास समजलें आहे.

तुर्कस्थानच्या बादशाहांनीं इतर राष्ट्रांतील आपल्या वकिलांस यादी लिहून असें कळविलें आहे कीं सर्व राष्ट्रांनीं आपले बजन खर्च करून ग्रीस देशानें चालविलेली लढाईची तयारी आजकडून बहकूब करवावी आणि त्यास असें विचारावें कीं आपण गेल्या आक्टोबरांत लिहिलेल्या यादींत ज्या सूचना केल्या होत्या त्या यांतील मुख्य सूचना कीं, ग्रीस देशाच्या सरहद्दीवर व्होलोच्या उत्तर सीमेपासून आरंभ होऊन लारिसा, मेटझोवे आणि जानिना यांच्या दक्षिणेस जाऊन तिचा आर्टा नदीच्या मुखाजवळ शेवट व्हावा ) त्यास कबूल आहेत किंवा कसें. जर कबूल नाहींत असा जबाब ग्रीस देईल तर उभयतांमधील स्नेहसंबंध तुटून लढाई करावी लागेल.

ग्वाल्हेरच्या मुरार छावणींतील जार्ज पार्स आणि लोरेन्स फिनिगन या दोघा गोलंदाजांनीं आपल्या एका सोबत्यास ठोशानीं मारिलें सबब त्यांची तारीख ६ नवेंबर रोजीं चौकशी होऊन त्यांस ५ वर्षें सक्त मंजुरीची कैद मिळाली. ने. ओ.

नामदार गवरनर साहेबांची स्वारी भावनगर स्टेट रेलेव सुरू करण्यासाठीं ता. १६ डिसेंबरच्या सुमारास भावनगरास जाण्यासाठीं मुंबईहून निघणार. शिवाय बऱ्याचे युरोपियन व एतद्देशीय बडे लोकांस [illegible]नगरच्या ठाकूर साहेबांनीं वरील समारंभास आमंत्रणें केलीं आहेत असें समजतें

आह्मांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं, मि. सोराबजी शापुरजी बंगाली यांस तारीख २० डिसेंबरपासून सरकारानें मुंबईचे शेरीफ नेमिलें.

काबुलच्या लढाइंत शत्रूपासून हिसकाऊन घेतलेल्या बंदुकी मोडून त्यांचे हिस्से करून ते पलटणींतल्या लोकांस देणार असें समजतें.

मद्रास एथें एका मजुरदारानें आपला गळा कापून आपल्या भऱ्यानें कापला ह्मणून त्याच्यावर फिर्याद केली परंतु ती खोटी ठरून त्यास एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

मि. पील मुंबई सरकारचे सेक्रेटरी यांनीं विलायतेहून येऊन आपल्या कामाचा चार्ज मि. न्यूजंट यांजपासून घेतला होता परंतु सिंधचे कमिशनर मि. एर्सकिन हे तीन महिन्यांच्या रजेवर जाणार सबब त्यांच्या जागीं मि. पील यांची अक्टिंग नेमणूक झाली. ते ता. २ जानेवारीस तिकडे जाणार आणि मि० न्यूजंट हे त्यांच्या जागीं काम करणार असें समजतें. सु० प०

अमृतसर एथील सोन्याच्या देवळाच्या दुरुस्तीकरितां झींद एथील राजे यांणीं १ लक्ष व पतियाळच्या राजांनीं ५० हजार रुपये देण्याचे ठरविलें आहे. ज्ञा. च

लायसेन्स कर माफ करण्याबद्दल ब्रिटिश इंडियन असोशिएशन नावाची सभा व्हाइसराय साहेबांस विनंती करण्याबद्दल तयारींत आहे असें कळतें.

नेपाळचे मुख्य प्रधान सर रणदीपसिंग हे थोड्या लवाजम्यासह ८।४ दिवसांत कलकत्यास जाणार आहेत. त्यांच्याबरोबर ५०० लोक जातील.

इंदापूर आणि करमाळें ह्या दोन ठिकाणचीं कोर्टें कमी करण्याविषयीं हुकूम झाला. असें समजतें.

श्री० होळकर सरकार यांची स्वारी जेजुरीस जाण्यासाठीं इंदुराहून लवकरच निघणार आहे असें कळतें.

सालमजकुरीं आळंदीचे यात्रेंचें ऊत्पन्न रुपये ४००० हजार झालें त्यावरून मक्तेदार यांस नफा सुमारें ८०० रुपये राहिला असावा असें अनुमान आहे.

अलीकडे बंडापैकीं बरेच लोक पोलिसाकडून पकडले जात आहेत. पुणें जिल्ह्यांत पुरंदर तालुक्यांतील दौलत्या रामोशी याचे बंडांतील तीन इसम पोलिसांनीं पकडले.

धर्मराजाच्या हातांतील पैंचोवरील कोहीनूर नामक हिरा अखेर काबुलांत जाऊन शेवटीं मानसिंगाच्या हातांत आला व हल्लीं महाराणी साहेबांच्या मुगुटावर झळकत आहे. या नामांकित हिऱ्या सारखाच एक हिरा फ्रान्सांत असून तो वाटर्लूच्या लुटींत नेपोलियनाला मिळाला असें ह्मणतात

गंल्याचे मागील शनिवारीं धार दरबार ग्याझेटावरून समजतें कीं श्रीमंत अलिजाबहादर शिंदे सरकार व श्रीमंत महाराज होळकर सरकार या उभयतां वजनदार राजांच्या अब्रूस धक्का पोंचण्यासारखें मजकुराची एक [illegible] अर्जी सर हेनूरी डेली साहेब बहादुर नामदार व्हाइसराय साहेबांचे मध्य हिंदुस्थानांतील एजंट यांजकडे कोणी पाठविली आहे. त्याचप्रमाणें खासगत होळकर शाहींतील कोणी मोठ्या कामदाराच्या अब्रूस धक्का पोंचण्यासारखे मजकुराची एक [illegible] अर्जी श्रीमंत होळकर सरकारांकडे पाठविली आहे. या दोन्ही अर्ज्यां एकाचेच हातच्या लिहिलेल्या असल्याचे दिसल्यावरून त्या पाठविणारा एकच मनुष्य असावा असें होऊन त्यास पकडून त्यावर त्याच्या कृत्याची शाबिदी करणारास १००० रुपये इनाम देण्याचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे. पु. वै.

नामदार गव्हरनर साहेब गेल्यांच्या मागच्या शनिवारीं छोटा उदेपुरच्या राजाच्या भेटीस गेले होते. त्यावेळेस त्याजबरावर ओरियंटल ट्रान्सलेटर नव्हते ह्मणून राजे ज्या बंगल्यांत उतरले होते त्या बंगल्याच्या मालकाच्या कुटुंबांतील पारशीणीनीं दुभाषीपणा चालवून एकीनें गव्हरनर साहेबांच्या गळ्यांत पुष्पहार घातला. आणि राजे साहेबांनीं अत्तर गुलाब देऊन स्वारीचा निरोप घेतला.

सरकारी कामदाराचा खून— ऐर्लंडांतील कुक्स टौन शहरांत एक बेलिफ एका शेतकऱ्यावर हकुमनामा बजावीत असतां त्यास मारून टाकिलें असें समजतें.

आस्ट्रिया देशांतील आग्रम प्रांतांत धरणीकंपाचा पुनः जबर धक्का बसल्यामुळें तेथील लोकांवर मोठा प्रळय गुदरला आहे.

बंगाल्यांतील हावरा एथील डेप्युटी माजिस्ट्रेट बापु रंगलाल बानरजी हे एका फौजदारी कज्जाची चौकशी करीत असतां त्यास कामावरून सस्पेंड केल्याबद्दल सरकाराकडून लिहून आल्याचें इं. डेलीन्यूज पत्रकर्ते लिहितात.

खैबरखिंड सोडून इंग्लिशांचें सैन्य येणार आणि त्या रस्त्याचें संरक्षण व्हावें आणि तो रस्ता दंगेखोर लोकांनीं बळकावल्याबद्दल सरकारास सूचना व्हावी ह्मणून आसपासच्या अफगाण लोकांच्या जमातीत इंग्रज सरकाराकडून लांचणी मिळत नाईल असें समजतें.

इराणी यात्रेकरू मक्केहून परत येत असतां त्याजवर कुर्द लोकांनीं हल्ला करून त्यांपैकीं पांचशें असामींस जखमी करून ठार मारिलें.

## समिंनिर्नी.

या नावाचें गद्यपद्यात्मक नाटक आह्मीं अति मेहनतीनें रचिलें असून तें सुंदर टैपानें छापून लौकरच प्रसिद्ध करण्याचा आमचा इरादा आहे; परंतु तो सर्व आश्रयदात्यांवर अवलंबून आहे. सबब गुणग्राही व स्वभाषेंतील ग्रंथास उदार आश्रय देऊन नवीन नवीन ग्रंथ उत्पन्न होण्यास उत्तेजन देणाऱ्या सद्गृहस्थांस सविनय प्रार्थना आहे कीं, त्यांनीं आपला उदार हस्त पुढें करून आश्रय देण्याची कृपा करावी. तारीख ३१ डिसेंबर सन १८८० चे आंत पैसे भरणारास एक प्रतीची किंमत ॥१० व टपालखर्च ॥१ मिळून ॥११ व त्या मुदतीपुढें देणारास टपालखर्चासह दरप्रतीस ॥१३ असे ठेविली आहे. या पुस्तकासंबंधीं पत्रव्यवहार खुद्द आमच्या किंवा रा. रा. विठ्ठल भगवंत लेले स्टेशन मास्तर पाकणी यांच्या नांवावर ठेवावा. नाटपेड पत्र घेतले जाणार नाहीं. आगाऊ वर्गणीदारांचीं नावें ग्रंथाच्या शेवटीं छापलीं जातील. तारीख १९ माहे नवेंबर सन १८८० इसवी.

दामोदर एकनाथ पाटसकर मार्स
सिग्नलर जी. आय. पी. रेलवे
स्टेशन सोलापुर

## श्रियाळ.

या नावाचें गद्यपद्यात्मक नाटक आह्मीं अति मेहनतीनें रचिलें असून तें सुंदर टैपानें छापून लौकरच प्रसिद्ध करण्याचा आमचा इरादा आहे; परंतु तो सर्व आश्रयदात्यांवर अवलंबून आहे. सबब गुणग्राही व स्वभाषेंतील ग्रंथास उदार आश्रय देऊन नवीन नवीन ग्रंथ रचण्यास उत्तेजन देणाऱ्या सद्गृहस्थांस सविनय प्रार्थना आहे कीं, त्यांनीं आपला उदार हस्त पुढें करून आश्रय देण्याची कृपा करावी सदर्हू ग्रंथाची किंमत अतिस्वल्प ह्मणजे ता० ३१।१२।८० पर्यंत देणारास प्रत्येक प्रतीस ॥६ व टपालखर्च ॥६ मिळून ॥६।६ त्यापुढें देणारास टपालखर्चासह दर प्रतीस ॥८॥६ ठेविली आहे. या पुस्तका संबंधी पत्रव्यवहार ठेवणें तो खुद्द आमच्या किंवा रा. रा. दामोदर एकनाथ पाटसकर मार्स सिग्नलर स्टेशन सोलापूर यांचे नांवांवर ठेवावा. नाटपेड पत्र घेतले जाणार नाहीं अगाऊ वर्गणीदारांचीं नावें ग्रंथाच्या शेवटी छापलीं जातील. तारीख १९ नवेंबर सन १८८०

विठ्ठल भगवंत लेले स्टेशन मास्तर
जी. आय. पी. आर
स्टेशन पाकणी.

हें पत्र आकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार ता० २७ माहे डिसेंबर सन १८८० इ० अंक ५१


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | |
|---|---|
| वर्षाची आगाऊ | ५ |
| डाक अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हशील. | |
| सहा महिन्यांची आगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | ३ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल

## नोटिस वगैरे बद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत | १ |
| ओळींपुढे दर ओळीस | ०१०६ |
| त्याच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## सीमंतिनी.

या नांवाचें गद्यपद्यात्मक नाटक आह्मी अति मेहनतीनें रचिलें असून तें सुंदर टैपानें छापून लौकरच प्रसिद्ध करण्याचा आमचा इरादा आहे; परंतु तो सर्व आश्रयदात्यांवर अवलंबून आहे. सबब गुणग्राही व स्वभाषेंतील ग्रंथास उदार आश्रय देऊन नवीन नवीन ग्रंथ उत्पन्न होण्यास उत्तेजन देणाऱ्या सद्गृहस्थांस सविनय प्रार्थना आहे कीं, त्यांनीं आपला उदार हस्त पुढें करून आश्रय देण्याची कृपा करावी. तारीख ३१ डिसेंबर सन १८८० चे आंत पैसे भरणारास एक प्रतीची किंमत ०१० व टपालखर्च ०१ मिळून ०११ व त्या मुदतीपुढें देणारास टपालखर्चासह दरप्रतीस ०१३ आणे ठेविली आहे. या पुस्तकासंबंधीं पत्रव्यवहार खुद्द आमच्या किंवा रा. रा. विठ्ठल भगवंत लेले स्टेशन मास्तर पाचोरा यांच्या नांवावर ठेवावा. नादपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. आगाऊ वर्गणीदारांचीं नांवें ग्रंथाच्या शेवटीं छापलीं जातील. तारीख १९ माहे नोवेंबर सन १८८० इसवी.

दामोदर एकनाथ पाटसकर मार्फत
सिग्नलर जी. आय. पी. रेल्वे
स्टेशन सोलापूर

## नोटिस

तापीदास ओंकारचंद गुजराथी मैत वारस हिरालाल पालन करणार नापीदास चुनीलाल गुजराथी दुकान बाळापुर यांस चुनी भवानीदास दुकान बाळापुर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची आमची सं गोळ्यांत व गावांत तकशीम होती. व खाते बाकीचा हिशेब तुमचे जातखत नांव. शिवा य महाग बद्दल लिहून सर्व हिशेब आह्मांस महिन्याचे आंत समजावून द्यावा. न ... आह्मी तुह्मावर तुमच्या आलबर ह्या वेळा जप्त करून फिर्याद करूं. कळावे तारीख २१ माहे डिसेंबर १८८० इसवी.

( सही ) चुनीलाल भवानीदास
दस्तुर खुद्द.

## नोटिस.

गणू वल्लद पुंजाजी जाधव रहाणार कसबे देऊळघाट तालुके चिखली जिल्हा बुलढाणे यास खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं मला पीरखा वल्लद सरदारखा याचें देणें आहे ह्मणून तुह्मीं मला घरांत नेऊन ह्मणाले कीं, त्यांनी पट्टी रिविन्यु सर्वे नंबर ६० चें शेत पीरखा याचे वहिवाटींतील मला करून देणें ह्मणजे मी सर्व कर्जाचा निकाल करून तुमचे दस्तैवज काढून देतो मला जो दस्तैवज करून देणें त्यांत ज्यास्त रुपये लिहिले असतां पीरखा सूट न देतां भर रकम मागेल आणि कागद वगैरेस खर्चही थोडा लागेल मला रजिष्टर करून दिलें ह्मणजे तुमचे दस्तैवज तुह्मास काढून आणून देतो अशी थाप देऊन रजिष्टर करून घेतलें त्याला सुमारें एक महिना होत आला तरी तुह्मी आज उद्या ह्मणून थाप देऊन चाळवीत आहा हेंच होत तुमचे समक्ष लोकांनीं मला तीनशें चारशें रुपयेपर्यंत मागितलें परंतु सर्व दस्तैवज अधिक रकमेचे असलेलें काढून देईन अशें तुह्मी कबूल केल्यानें त्या गोष्टीस आह्मी इनकार केला.

या नोटिसीनें तुह्मास कळविण्यांत येतें कीं नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत पीरखाकडील आमचे सर्व दस्तैवज व त्याची पावती आह्मास आणून द्यावी. नाहीं पेक्षां जो दस्तैवज तुह्मांस करोन दिला त्या दस्तऐवजांतील हक्क तुह्मास प्राप्त होण्यास मार्ग नाहीं. तो दस्तऐवज रद्द समजून विश्वासघात केल्याबद्दल तुह्मास जबाब द्यावा लागेल. तारीख २२।१२।८० इसवी.

( सही ) गुलाबराव शेषराव देशमुख
प्रगणे देऊळघाट
दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## सार्वजनिक सभांनां प्रार्थना.

आपल्या देशांत कलाकौशल्याचें उत्तेजनार्थ अनेक उदार पुरुष झटतात. त्यांनां ही विनंती असो विशेष—

जबलपूर मुक्कामीं मिलोनी गंजांत गोकुळदास शेटीच्या तळ्यापुढें मारुतीचे देवळाजवळ बख्तू नामें एक सुतार असतो त्याला कोणी वस्ताद मिस्त्री असेंही ह्मणतात त्याचे गुण कोणी ग्रहण करीत नाहीं ह्मणून असा एका कोपऱ्यांत पडला आहे त्यानें जी कांहीं नवी न यंत्रें इत्यादि केलीं आहेत तीं आह्मी स्वतः पाहिलीं त्यांचे साधारण वर्णन येणेप्रमाणें:—

१ यानें एक नवीन खुर्ची तयार केली आहे ती बगलेंत मारून नेतां येते. कोणी श्रीमंत कोठें बाहेर गेले ह्मणजे एखादा गडी सहज बगलेंत मारून ती नेईल, जेथें लागेल तेथें तीवर बसतां यावें या उद्देशानें ही खुर्ची केली आहे.

इंग्रजी धरतीवर ज्या गाड्या असतात त्यांना कमानी असल्यामुळें आंत बसणाराला धक्का लागत नाहीं. या कोळिडाच्या कमानीला पुष्कळ किंमत लागते ह्मणून ही युक्ती काढिली आहे. त्यामुळें आंत बसणारांस धक्का लागत नाहीं. किंमत फार थोडी लागते. हें यंत्र लाकडाचें केलें आहे.

३ एक जातें ( चक्की ) तयार केलें आहे. पण चक्कीनें जसें पीठ बारीक काढतां येतें तसें या जात्यानें बारीक पीठ होतें. एखादा आंधळा किंवा पांगळा देखील तें जातें चालवू शकेल. तीन मनुष्यें दळायांला बसलीं तर जितकें पीठ निघेल तितकें या एका यंत्रा पासून एक मनुष्य काढूं शकेल.

४ करवत ( लांकूड कांपण्याचें यंत्र ) काढलें आहे. त्यास एक मनुष्य मात्र लागतो. त्यायोगें हव्या तितक्या फळ्या त्या यंत्रानें कापतां येतात. आणि जशी फळी पाहिजे तशी फळी काढितां येते. सध्यां त्याजजवळ जें यंत्र आहे त्याला त्यानें पांच करवत लावले आहेत. त्याची परीक्षा दोघां साहेबांनीं पाहून तारीफ केली, परंतु त्यांपासून त्याला कांहीं आश्रय मिळाला नाहीं. याचें कारण कीं, तशा तऱ्हेचीं इंग्लंड देशांत अनेक यंत्रें आहेत ह्मणून त्यांनां विशेष न वाटणें स्वाभाविक आहे. परंतु आपल्या देशांत जें काम होतें तें फार मेहेनतीनें दोरा सारखें करावें लागतें. या यंत्रानें मेहनत थोडी लागते, खर्च थोडा लागतो, आणि फळ्या शानदार निघतात.

५ एक गाडी तो तयार करीत आहे. त्या गाडींत त्यानें एक यंत्र लावलें आहे. त्या यंत्राचे योगानें गाडी आपोआप चालूं लागेल असें तो ह्मणतो हें कांहीं आह्मी अद्याप पाहिलें नाहीं. ती गाडी तो नुसत्या वायु वेगानें चालविणार आहे. सडक मात्र नीट पाहिजे ती गाडी हवी तिकडे वळविता येईल. असें तो खात्रीलायक ह्मणतो.

जर कोणी सभेंतील गृहस्थ किंवा कोणी देशहितेच्छु वर लिहिलेल्या पत्त्यावर पत्र पाठवितील तर त्याकडे तो ल्हानसा नमुना तयार करून पाठवील परंतु त्याबद्दल डाकेचा खर्च त्यांनीं द्यावा लागेल; कारण तो फार गरीब आहे तो नमुना पाहून मंडळी खुश झाल्या तर त्याची मजूरी देखील त्यांना द्यायला तो तयार आहे. वर्तमानपत्रकर्ते देश हितार्थ झटतात तेव्हां त्यांनाही विनंती आहे कीं, ही बातमी त्यांनीं कृपा करून आपापल्या पत्रांत छापावी ह्मणजे कोणी तरी उदार पुरुष पुढें होऊन त्याचे गुणाची परीक्षा करतील.

जबलपूर ता. २ डिसेंबर सन १८८० इ०

"एक प्रेक्षक"

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. खाली लिहिलेले मजकुरास आपल्या पत्रीं आश्रय मिळेल अशी आशा करितो.

आपल्या पत्रामध्यें थोड्या दिवसांपूर्वी मूर्तिजापूरच्या शाळेची हकिकत छापलेली पाहून फार आनंद वाटला त्याप्रमाणें मी कामरगांव मराठी स्कूलची हकीकत सादर करितो. या शाळेची स्थिती उत्तरोत्तर चांगली होत चालली आहे व तिचे कारण हल्लीचे हेड मास्तर रा. रा. गोविंदराव मास्तर यांची सतत मेहनत हेंच होय.

गोविंदराव हे पूर्वी मुंबईत "नेटिव ओपीनियन,, छापखान्यांत कामाला होते. तेथून १८६८ सालचे मार्च महिन्यांत वऱ्हाडांत २० रुपये पगारावर येऊन त्यांस ४० रुपयाची लोल्यापूरची जागा मिळोन ३५ रुपयाची कायमची शिरसा गावची मिळाली होती. व दिवसेंदिवस वाढण्याची उमेद होती परंतु १८७१ चे ग्रेडेशन मध्यें १० रुपयावर बणी जिल्ह्यांत कळंबास बदलले. तेथें ९ वर्षें काम करून या सालांत येथें २० रुपयावर ( ट्रायलवर ) आले आहेत. यांस इंग्रजी भाषेचें ज्ञान बरें आहे असें लोक बोलतात व मराठी विषयीं लिहिणें नको कारण ते आज सतत १३ वर्षें मराठी स्कूल मास्तरचें काम करीत आहेतच यांस कोणाचा आश्रय नाहीं व बणी जिल्ह्यांत वार्षीक परिक्षा घेऊन शाळेच्या गावापासून ३—४ कोसावर मुक्काम करून डे. ए. इन्स्पेक्टर मुलें पास करितात त्या धोरणानें गुदस्त सालीं कमी मुलें पास झालीं ह्मणून कमी पगारावर यास पाठविलें. हा पगार त्यांस मुंबईस मिळत होता मग त्यांस वऱ्हाडांत येऊन कोणता फायदा? वरिष्ठ अधिकारी लोक अशा प्रकारें हाताखालील लोकांस वागवतील तर हलक्या प्रतीच्या नोकर लोकांची दाद तरी कशी लागावी?

हे गृहस्थ येथें आले त्यावेळेस ४४ मुलें पटावर होतीं-आणि आतां ८१ मुलें आहेत याशिवाय गत वर्षी १२ मुलें पास झालीं असून यंदा ३०।२० मुलें पास झालीं आहेत. याजपेक्षांही जास्त मुलें पास होण्याचा संभव होता परंतु १ले यत्तेंत काय तीं १६ मुलें उभीं केलीं होतीं त्याजमध्यें ९ पास झालीं दुसऱ्या शाळेंतील हेडमास्तराकडे दोन वर्ग असून यांणीं ३ वर्ग शिकवून १४.११ मुलें पास झालीं. आहेत त्याजमध्यें ४ थी यत्ता १० महिन्यांत तयार केली आहे. हे कसोटीवर आल्यामुळें यांणीं रात्रंदिवस मेहनत करून शाळा सुधारली आहे, दगडीच्या केल्या आहे, तालिमखाना करून मुलेंही कसरतींत तयार झालीं आहेत ही शाळा पाहून मे. इन्स्पेक्टर साहेब मे. डे. क. साहेब व मे. डायरेक्टर साहेब खुष झाले आहेत. आतां यांचा पूर्ण पगार लवकर मिळो ह्मणजे यांस काम करण्याचा अधिक उल्हास येईल. या गावचीं वस्ती ५०० घरांची असून त्यामध्यें इतकीं मुलें झालीं आहेत हें डायरेक्टर साहेबांस फार आवडलें आहे. हेच मास्तर एथें कांहीं दिवस राहिल्यास शाळेचा अभ्यास

उत्तम स्थितींत राहून पहिल्या सारखा बखेडा होणार नाहीं.

हा गांव किती केला तरी खेडें झटल्यास चालेल व यांतमध्यें शहरा सारखा प्रकार होणें कठीण. एथें परीक्षा झाल्यावर बक्षिसें सरकारांतून ६८५ किंमतीचीं मिळालीं आणि १ रुपयाची रा. रा. मोहनसिंग देशमुख यांणीं दिलीं. बक्षिसें वाटण्याचा समारंभ तारीख ४ रोजीं गावास साजे असा केला होता. गावांतील सर्व स्कूल कमेटीचे मेंबर( प्रेसिडेन्ट गावांत नव्हते ) व इतर संभावीत शेट सावकार यांस बोलावून त्यांस हार गजरे अत्तर पान सुपारी वाटून जमलेले गृहस्थ प्रफुल्लित मुख करून परत गेले कळावें हे विनंती

तारीख १४ डिसेंबर सन १८८० इसवी.

एक ग्रामवासी
क्ष.

---

## वऱ्हाडसमाचार.

मिति मार्गशीर्ष कृष्ण ११ शके १८०२

---

## वर्तमान पत्राच्या पांच लक्ष प्रतींचा खप.

आमचे हिंदुस्थान देशांत व्यवहार संबंधी उपयुक्त ज्ञानाचा फैलाव युरोप, अमेरिका या देशापेक्षां फार कमी आहे, व कित्येक गोष्टी तर यांच्या पाहून इकडे सुरू झाल्या आहेत. छापखाने व वर्तमानपत्रें तर इंग्लिश सरकारचें राज्य या देशांत झाल्यावर इकडे आलीं आहेत. तरी लोकांस त्यांची अजून लागावी तशी गोडी लागली नाहीं व त्यांची अवश्यकता त्यांच्या अंतःकरणांत बिंबली नाहीं. तरी कालांतरानें हल्लींच्यापेक्षां लोक सुधारणा अधिक होईल व वर्तमानपत्रांचा फैलाव वाढेल अशी तिकडील उदाहरणावरूनच कल्पना करण्यास कांहीं हरकत नाहीं. हल्लीं आमचे देशांत वर्तमानपत्रांच्या प्रतींचा खप आह्मी थोड्याच शेकड्यानीं मोजतों. कांहीं पत्रें शेकड्याच्याही मजलेवर नाहींत असें ऐकतों. व फार थोडीं पत्रें हजाराला ओलांडून गेलेलीं असतील. विलायतेचें पाऊल आमच्या फार पुढें आहे. लंडन टाइम्स नावाचें वजनदार पत्र नित्य दोनदा निघतें व त्याच्या प्रती ६०००० खपतात. चित्रांचा टाइम्स आठवड्यास एक निघत असतो त्याच्या प्रती १०००० खपतात. चित्रांचें लंडन न्यूज नावाचें आठवड्याचें पत्र आहे त्याच्या दोन लक्ष प्रति निघतात. हा वर्तमानपत्रांचा प्रसार ऐकून आमचे लोकांस आश्चर्य वाटल्यावाचून रहाणार नाहीं, तरी याहूनही विशेष आश्चर्याची गोष्ट या आठवड्यांत आमचे वाचण्यांत आली ती अशीः—

विलायतेंत ग्राफिक या नावाचें एक आठवड्याचें सचित्र वर्तमानपत्र आहे तें बरेच मोठें असतें व त्यांत पुष्कळ चित्रें असतात व तीं फार कारागिरीनें सुबक काढलेलीं असतात व विशेष प्रसंगीं अंक फार मोठा काढून पुष्कळ चित्रें दिलेलीं असतात. याचाही खप फार मोठा असावा असें दिसतें. त्याचा या आठवड्याचा अंक एथें आला आहे त्यांत त्याचे मालकांनीं लिहिलें आहे कीं नाताळच्या सणांतील आमच्या आठवडे पत्रास ५ लक्षांचे आह्मांस गिराईक आलेले असून त्याबद्दल अगाऊ पैसा आला आहे त्यावरून सहा महिने झाले, कारखान्यांत ४५० मनुष्य नोकर ठेवून या पत्राची तयारी चालविली आहे, तरी त्यांनीं आतां असें झटलें आहे कीं मागितल्या संख्येपैकीं ४ लक्ष प्रति मात्र तयार होत आहेत, बाकीच्या होत नाहींत सबब एक लक्षाचा अगाऊ आलेला पैसा परत देण्याची तजवीज केलेली आहे !

यांत कौशल्याची, व्यवहाराची व उद्योगाची पराकाष्ठा झाली असें कोण म्हणणार नाहीं ! धन्य त्या लोकांची ! त्या उद्योगी लोकांनां अतेंच अक्षय यश असो व त्यांच्या अशा गोष्टी आमच्या लोकांच्या कानावर येऊन त्यांस या प्रकारची अधिकाधिक गोडी लागो व उत्तेजन येवो असें इच्छितों.

---

## स्तुत्य उद्योग.

विद्येच्या व ज्ञानाच्या कामीं लोकांचें पाऊल जस जसें पुढें पडत जाईल तस तसें देशांत सुख साधनाचे स्तुत्य उद्योग फार वाढत जातील यांत संशय नाहीं. जुन्या पेशवाई कारकीर्दींत आपले देशांत बांधीव सडका देखील नव्हत्या यामुळें प्रवाशास किती दुःख होत असेल याची कल्पना आगगाडी सोडून खेड्यापाड्यावर ५।४ कोस चालून जाणाऱ्या लोकांस सहजी कळून येत असेल. हल्लीं रस्ते चांगले झाले आहेत. हजारो मैल रेल्वे झाली आहे. आगगाडीच्या गमनाचा वेग तासास सुमार १० कोस इकडे आहे. व युरोप अमेरिका या भागांत याच्या दुप्पट तिप्पट वेग आहे तरी तो अन्य उपायानीं वाढवून तासास शंभर पाउणशे कोस करण्याची तजवीज चालली आहे विलायतेहून जलमार्गानें ५००० मैलांवर इकडे आगबोटी येतात. त्यांना मध्ये सुएज नावाच्या संयोगी भूमीची थोडी अडकाठी होती तर उद्योगी व साहसी लोकांनीं कल्पना काढून कोट्यावधि रुपये भांडवल मिळवून ती संयोगी भूमी खणून काढून जलमार्गाचा आरपार सरळ रस्ता तयार केला हा केवढा स्तुत्य उद्योग आहे! याच प्रमाणें हल्लीं अमेरिका खंडाचे दक्षिण आणि उत्तर असे जे दोन भाग पानामा नावाचे संयोगीभूमीनें थोडे कोस जोडलेले असल्यामुळें दोहों बाजूचे दोन महासागर पासिफीक व अटलांटिक यांचे उदकाचें मिश्रण होण्यास व सरास गलबतें चालण्यास जी अडकाठी आहे ती काढून टाकण्याचा स्तुत्य उद्योग कांहीं गृहस्थांनीं सुरू केला आहे व हल्लीं वारे आनंदाचें वर्तमान कळतें कीं या गृहस्थास या कामास कोट्यावधि रुपये लागणारा खर्च देण्यास कित्येक उदार लोक सिध्द झाले आहेत त्यावरून उमेद आहे कीं या कामाची सुरवात लौकर होईल.

अशीं अचाट्य कामें ज्या लोकांचे स्तुत्य उद्योगानें सुरू झालीं आहेत त्यांस साधारण मनुष्य ह्मणण्यापेक्षां प्रतिसृष्टिकर्ते ह्मणण्यास काय हरकत आहे ? कारण जे परमेश्वरकृत सृष्टीची रचना बदलून नवी तऱ्हा निर्माण करीत आहेत. धन्य त्या लोकांची! कृपाळु परमेश्वर त्या लोकांस निरंतर यश देवो. व असे अनेक परीचे प्रयत्न करणारे बहुत लोक निपजोत व त्यांचीं कामें निर्विघ्न तडीस जावोत असें आह्मी इच्छितों.

---

## यवतमाळ.

वऱ्हाड प्रांतांत आग्नेय दिशेस यवतमाळ जिल्हा आहे. यालाच वणी जिल्हा असेंही ह्मणतात, परंतु सदर स्टेशन यवतमाळास आहे. इकडून यवतमाळास जाण्यास धामणगाव स्टेशनावर उतरावें लागतें तेथून थेट दक्षिणेस २९ मैल यवतमाळ आहे. व रस्ता सडकेचा फार चांगला आहे. निमे रस्त्यावर नांदग्याजवळ एक नदी आहे तिला मात्र अजून पूल झालेला नाहीं. बाकी सर्व नाल्यावर पूल आहेत. व घाटही फोडून फार सुलभ केलेला आहे. सुमार २ मैल घाट आहे. व तो चढून गेल्यावर दोन मैलांवर यवतमाळ आहे. गाव पूर्व भागास असून छावणी पश्चिमेस आहे. यवतमाळास सदर स्टेशन सन १८६४ सालीं झालें. त्यापूर्वी तें अगदीं खेडें होतें. व अजूनही तें गाव फार लहान आहे. सुमार निम्मे अकोल्या एवढें असेल. माती तांबडी असून घरें लहान लहान व झाडी पुष्कळ त्यामुळें कोंकणचा देखावा दिसतो. स्वच्छता चांगली आहे व रस्ते प्रशस्त असून नवीन एक तलाव केलेला आहे व हवा चांगली आहे.

यवतमाळ जिल्ह्याचें "क्षेत्रफळ" ३९५७ चौरस मैल आहे. व त्यांत लोक संख्या ४,७७,३६१ आहे. या जिल्ह्यांत बहुत गाव उजाड आहेत. इंग्लिश अंमल होण्यापूर्वी सोनेलाल ह्मणून कोणी इजारेदार होता त्यानें फार जुलूम करून बहुत गाव बेचिराक केले असें ऐकण्यांत आहे. या जिल्ह्यांत वसाहती करितां गाव व लागवडीकरितां जमीनी इजाऱ्यानें देतात. असे नवीन इजारदार पुष्कळ झालेले आहेत तरी अजून कित्येक गावांतून वस्ती नाहीं. एका यवतमाळ तालुक्यांत अजून ४० गाव वस्ती शिवाय आहेत. तेथील इजारादी फार सुलभ होता. ह्मणजे इजारदार कितीही जमीनीची लागवड करो, प्रथम दोन वर्षे त्यानें कांहीं देऊ नये, तिसरे वर्षी १ रुपया द्यावा, चवथे वर्षी २ रुपये, पांचवे वर्षी ३ रुपये, सहावे वर्षी ४ रुपये, व सातवे वर्षी ५ रुपये द्यावे. नंतर आठवे वर्षी जमीनीची सरकारांतून साधारण पहाणी होऊन ज्या मगदुराची जमीन असेल त्याप्रमाणें बिघ्यास एक रुपया, बारा आणे, किंवा आठ आणे घेण्याचा सरकारांतून ठराव व्हावा. या प्रमाणें इजारे सुलभ होते यामुळें बरेच गावांची लोकांनीं वसाहत केली पण अलीकडे ५।४ वर्षांत इजाऱ्याचे ठराव कांहीं बदलले आहेत. तरी ते फार सक्त आहेत असें नाहीं. या जिल्ह्यांत जंगल फार असल्यामुळें जनावरें बाळगण्याची उत्तम सोय आहे. उपरी रहाणाऱ्याही लोकांकडे च्यार दोन ह्मशी किंवा गाई नाहींत असे लोक थोडे आढळतील. व गावगन्ना तर कित्येक स्थाईक लोकांकडे शेकडो जनावरें आहेत असें समजतें. यवतमाळास दिवसा जनावरें रानांत चरावयास पाठविलीं व रात्रीकरितां च्यार आण्याचा भारा घेतला तर पांच च्यार जनावरांची सोय होते त्यांनां दुसरा रातब कांहीं लागत नाहीं. त्यामुळें व जंगल असल्यामुळें संसारी लोकांस दूध तूप, लाकूड फाटा, पान पत्रावळ, गवत काडी वगैरेची चांगली सोय आहे.

यवतमाळास चावडी आहे ती मध्यम प्रतीच्या चांगल्या कचेरीच्या दर्जावर आहे. ह्मणजे जागा प्रशस्त, काम चांगलें, अंगण मोठें, सभोवार आवार व तें बंगल्याच्या धोरणाचें, व व्हाइटवाश, राउंड पिलर इत्यादि पाहून मनावर चांगला ग्रह [illegible] अबादास संतो तेथें तहशिलदा[illegible] नीं अशा या सुबक नमुन्याची चा[illegible] केली व इतरही १०।१५ ठिकाणीं [illegible] चावड्या करविल्या आहेत असें ह्मणतात हें त्यांस भूषण आहे.

यवतमाळास वकील एकच आहेत, व दोन वर्षे झालीं उमरावतीहून एक गृहस्थ गेले आहेत. तरी तेथें मुकत्यार वकीलांचा मोठा भरणा पहाण्यांत आला. व्यापारी लोक, देशमुख, पाटील वगैरे जे देणी घेणीं हमेशा करितात त्यांनीं आपआपल्या कामासाठीं एकेक स्वतंत्र मुकत्यार ठरवून दिलेले आहेत व ते वकीलाप्रमाणें कोर्टांत कामें करितात व त्यांनां कामें पुष्कळ असतात परीक्षेशिवाय व सनदेशिवाय ही वकिलीची टूम पाहून कित्येकांस आश्चर्य वाटतें. मुकत्यारांचे एवढें स्तोम अकोला उमरावती सारख्या मोठ्या ठिकाणीं पहाण्यांत येत नसून अशा लहान जिल्ह्यांत त्याची इतकी व्याप्ती कशी आहे कोण जाणे!

( पुढें चालू )

---

## वऱ्हाड.

थंडी खूप कडाक्याची पडू लागली आहे हवा स्वच्छ व निरोगी आहे.

मे० जोन्स साहेब कमिशनर रजेवरून आपले कामावर रुजू होण्याकरितां इकडून परवा शनिवारीं पहाटे उमरावतीस गेले असें समजतें.

कर्नल बुशबी साहेब जुडिशियल कमिशनर यांची स्वारी एलिचपूर आहे.

मे. लेन साहेब इन्स्पेक्टर जनरल दाण्याकडे गेले आहेत.

निजाम सरकार औरंगाबादेस [illegible] फार असें वर्तमान आहे.

यंदाचे म्याट्रिक्युलेशनचे परीक्षेंत पास झालेले येथील विद्यार्थी रा. रा. [illegible] भास्कर अभ्यंकर यांनां सिनियर प्राई[illegible]

र. चीं चुकें वकील ... मिळणार; कारण वऱ्हाड्च्या विद्यार्थ्यांत ... तांत ते पाहिले आले. रे. रा. रा. भास्कर लक्ष्मण अभ्यंकर बाळापुरचे मास्तर यांचे चि... तीव होत.

उमरावतीस वक्तृत्वोत्तेजक समारंभ शुक्रवारीं सुरू झाला. ... समाप्त झाला असेल. पहिले विषयास १२ व दुसरे विषयास ४ वे के उमेदवार होते. अकोल्याहून या समारंभाकरितां ५१४ रुपये गेली आहे.

रा. रा. आबाजी खंडेराव वकील यांचे कुटुंबास काल दोन प्रहरीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हांस वाईट वाटतें. यांचे हें द्वितीय कुटुंब असून ते प्रथम ... अऊच महिने झाले होते. ता एक तान्हा मुलगा आहे. ईश्वर त्यास दीर्घायु करो.

रा. रा गणेश शास्त्री तर्टे नासिककर जे मागें इकडे मास्तर होते ते बाबनविरकडे कोणास औषध देण्याकरितां आले होते ते गेल्या आठवड्यांत येथे येऊन त्यांनीं अग्रोव्हर्नाक्युलर स्कूलांत वैद्यक विषयावर एक व्याख्यान दिलें. त्यांत आयुर्वेदांत विषय काय काय आहेत व वैद्य कसा असावा वगैरे प्रकार सांगितले. हे व्याख्यान संस्कृत ग्रंथावरून लिहून आणिलेले होते व त्यांत नवीन ज्ञान असें थोडेच होते. मागें रा. रा. रामभाऊ गोरे सातारकर वैद्य यांनीं येथे व्याख्यान दिलें होते त्यांची प्रतिपादनशैली लोकांस पसंत वाटली. असो, तर्टे शास्त्री आणखी एक व्याख्यान लवकर आल्यास देणार आहेत

उमरावतीचे लोकलफंड इंजिनियर ... महिन्याचे रजेवर गेले यांचे जागीं बुलढाण्याचे लोकलफंड इंजिनियर रा. रा. नारायण बाबाजी जोशी यांस नेमिलें हें ऐकून आम्हांस संतोष होतो.

मिटलमेंटचो परिक्षा झाली तिचा एकंदर निकाल अजून समजला नाहीं, पण रा. रा. भास्कर सखाराम ज्युडिशियल कमिशनरचे हेडक्लार्क यांचे चिरंजीव रामचंद्र ... वत व रा. रा. दुर्गाप्रसादसिंग ... पोलिस इन्स्पेक्टर यांचे चिरंजीव ... हे पास झाले असे समजतें.

पोंच— अलिशान रेसिडेंट साहेब यांजकडून खालीं लिहिलेले रिपोर्ट आम्हांस आले आभारपूर्वक आम्ही ग्रहण करितों.

१ विद्याखात्याचा सन १८७९।८० इसवीचा
१ रेजिस्ट्रेशन खात्याचा ,,
१ व्याक्सिनेशन खात्याचा ,,

यांतील विशेष माहिती व त्या संबंधानें ही आपलें मत लवकरच प्रसिद्ध करूं.

फेब्रुवारी महिन्यांत होणाऱ्या खानेसुमारीबद्दल हिंदुस्थान सरकारचा ठहानसा एक ... आ झाला आहे तो वऱ्हाड प्रांतास लागू ...ला.

हैदराबादेस निजाम कालेजमध्यें म्याट्रिक्युलेशनची परीक्षा गेल्या आठवड्यांत झाली ... उमेदवार होते.

अकोल्यांत आगरवेशी जवळ रहाणारा सखाराम शंकर सोनार उमर वर्षे ३५ हा गेले आठवड्यांत शनिवारीं कांहीं कामानिमित्त कापशीकडे गेला होता. त्याचा रानांत सोमवारीं मुर्दा सापडला. त्याचे अंगावर सोन्या रुप्याचे दोन शेंचेशें रुपयांचे डागिने होते पण त्यास कोणी हात लाविला नव्हता. अतिशय मद्यप्राशनाचा हा परिणाम असावा.

रा. रा. बळवंत आबाजी दिवेकर बी. ए. एल. एल. बी. हे मुंबईहून येथें आपले घरीं आले आहेत. कानव्होकेशनचे समारंभास पुन्हा मुंबईस जाऊन येतील. एथें वकीली करण्याकरितां ते रेसिडेंट साहेबास परवानगी मागणार आहेत व त्यांस ते संतोषानें ती देतील असें आम्हांस वाटतें हे कारण यांचा सर्व विद्याभ्यास वऱ्हाडांत झालेला आहे, यांचे तीर्थरूप येथें वकील आहेत व एल. एल. बीचे परीक्षेत पास झालेले वऱ्हाडांत हे पहिलेच गृहस्थ आहेत, तेव्हां ही गोष्ट आमच्या प्रांतास ही भूषणदायक आहे असे आम्ही समजतो.

रा. रा. देवराव विनायक वकील व रा. रा. पांडुरंग गोविंद वकील हे उदईक हैदराबादेकडे जाणार आहेत. कामें करीत असलेल्या वकील लोकांची परीक्षा होणार असल्याचा जो बूट निघाला आहे त्या विषयीं ते तेथें शोध करणार व कारण असल्यास वकीलांचे तर्फे जो मजकूर त्या बाबदींत कळविणे अवश्य आहे तो ते अलिशान रेसिडेंट साहेबास कळविणार आहेत.

मि० एजदयार विकाजी या नांवाचे पारशी गृहस्थ औरंगाबादेस सियम तालुकदार असून यांना ९०० रुपये पगार आहे, यांस उमरावतीस असिस्टंट पोलिस सुपिरिंटेंडेंट नेमिलें. हे गृहस्थ विलायतेस जाऊन अभ्यास करून आलेले आहेत असे समजतें.

[रा. रा. गोपाळ गणेश आगरकर एम. ए. हेही या आठवड्यांत एथें आले आहेत सरकार नौकरी धरण्याचा यांचा इरादा नाहीं. पुण्यास चिपळूनकर व इतर मंडळी "केसरी" व "मराठा ,, नांवाचीं जीं नवीन. २ वर्तमानपत्रें काढणार आहे तींत हेही शरीक आहेत हें पाहून आम्हांस संतोष वाटतो. विद्याभ्यासांतून सुटतांच सरकारी नौकरीसाठीं जो तो दक्ष असतो. तसे न करितां हे देशाचे उपयोगी पडण्याचीं कामें हातीं घेऊन त्या लाभावरच संतुष्ट राहणार ही फार मोठी गोष्ट समजली पाहिजे.]

## जाहिरखबर

अकोले म्युनिसिप्यालिटीच्या हद्दींतील सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं सन १८८०।८१ अखेरपर्यंतचे भंगीपट्टीचा मक्ता गावचे पाटलाकडून होत आहे या संबंधानें ज्या ज्या तकारी कोणास जाहीर करावयाच्या असतील त्यांनीं त्या आज तारखेपासून २ महिन्यांचे आत लेखी अर्जानें कमिटीस कळविल्या म्हणजे या सर्वांचा एकदम विचार करण्यांत येईल; परंतु कमिटींतून जो ठराव आकारला गेला आहे त्या बरहुकूम मागील सालाबद्दल व चालू सालाबद्दल सर्व पैसे पाटील मागेल ते त्यांनीं अगोदर रोख दिले पाहिजेत. पैसा दिल्या असल्या शिवाय कोणाचे अर्जाचा विचार केला जाणार नाहीं. अर्ज करणारे लोकांनीं मेहेतर रजिष्टरचा नंबर त्यांनीं दिलेल्या पावत्यावर मांडलेला असतो तो या अर्जावर लिहित जावा. सर्वांस कळावें तारीख २७ माहे डिसेंबर सन १८८० इ०

(सही) बेहीमनजी जामासजी
व्हाईस प्रेसिडेंट

मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस राजश्री फुरसाजी वलद महादु पारसकार राहणार मौजे पहुरनेर तालुके खामगाव जिल्हे आकोले यास खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असोन लग्न झाल्यास सुमार बारावर्षे झालीं. आतीकडे सात वर्षांपासून तुम्हास रक्तपित्तीचा रोग उत्पन्न झाल्यावरून तुम्ही निरउपयोगी झाल्यामुळे मजला टाकून दिलें असोन अन्न वस्त्रही देत नाहीं यानमुळे मी आज पर्यंत आपले माहेरीं राहून सावकाराचें कर्ज काढून आज पर्यंत निर्वाह केला ते रुपये दरसाला ६० साठ रुपय प्रमाणें सातवर्षांचा आकार रुपये ४२० च्यारसे वीस मजला देणे झाले आहे. तें देणें तुम्ही देऊन टाकून मजला घरीं घेऊन जाणें आतां तुम्हास रोग उत्पन्न झाल्यामुळें मजला तुमचेपासून कांहीं उपयोग राहिला नाहीं. सबब मुदतीचे आंत मजला माझें कर्ज फेडून ... यऊन जावें. तसें न केल्यास हल्लीं माझें तारुण्य वय आहे व उदरनिर्वाहाची सोय नसल्यामुळे मजला दुसरे ठिकाणीं घरठाव केल्याशिवाय माझा परिणाम लागणार नाहीं. तरी तुम्ही मजला झालेले देणें देऊन फारकती यावी. तसे न कराल तर मुदतीनंतर मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. नंतर तुमचा लग्नाचा हक्क मजवर न रहातां दावाही चालणार नाहीं. कळावें. तारीख २२ माहे डिसेंबर सन १८८० इसवी.

(सही) तुळशी मर्दे फुरसाजी पारसकार
मुकाम पिंपरी इचे हातची
निशाणी बांगडी

नोटिस

सर्वांस कळण्याकरितां देण्यांत येते कीं, गंगाई मर्दे रावजी भोंगळ इजला पुत्र नसल्यामुळें व मी तिचा गोत्रज भाऊबंद असल्यामुळें तिनें माझा धाकटा मुलगा दत्त मागितल्यावरून मी आपला धाकटा मुलगा रामचंद्र याजला गंगाईस अकोले एथें यथाशास्त्र दत्तविधान करून दत्त दिला आहे. आतां याजवर माझा जनकपुत्रत्वाचा कांहींच हक्क राहिला नाहीं. कळावें. तारीख २९ माहे डिसेंबर सन १८८० इसवी.

(सही) तुळशीराम वलद बाबुजी भोंगळ
मौजे धानोर तालुके जळगाव
निशाणी खुद हातची.

नोटिस.

सर्वांस कळविण्यांत येतें कीं मला पुत्र नसल्यामुळें मी आपले गोत्रांतील भाऊबंद तुलसिंग वलद बाबूजी भोंगळ धानोरकार याचा धाकटा मुलगा रामचंद्र याजला अकोले एथें यथाशास्त्र दत्तविधान करून दत्तक घेतला आहे. आतां रामचंद्र हा माझा दत्तपुत्र व माझे जिनगीचा व वतनाचा मालक झाला आहे. कळावें, तारीख २९ माहे डिसेंबर सन १८८० इसवी.

[सही] गंगाई मर्दे रावजी भोंगळ रहाणार धानोर ता. जळगाव
निशाणी खुद हातची.

## वर्तमानसार.

आम्हांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, रा. ब. महादेव गोविंद रानडे यांस ठाण्यास जाइंट जडज नेमावें अशाविषयीं मुंबईचे गवर्नर सर जेम्स फर्ग्युसन साहेब यांनीं हिंदुस्थान सरकारास शिफारस केली आहे. आमच्या देशाच्या भाग्यानें ती मंजूर करण्याची हिंदुस्थान सरकारास बुद्धि होवो.

सुरतेचे नामांकित पोलिस इन्स्पेक्टर मोतीलाल हे गोधऱ्याकडे गेले होते तिकडे रण पावले.

लार्ड रिपन साहेब व्हाईसराय यां... कृति आतां बरी आहे. ते राजिनामा दे... अशी बातमी निघाली होती पण ती लागलीच खोटी आहे असे कळलें.

मुंबईचे गवरनर साहेब भावनगराकडे गेले व तेथें जो थाट झाला त्याची हकीकत आम्ही पुढील अंकीं लिहू.

धुळ्याचे दप्तरदार रा. ब. बळवंतराव लक्ष्मण मरण पावले असें वर्तमान आले आहे.

रा. ब. चिंतामण सखाराम चिटणीस पुण्याचे सबार्डिनेट जडज यांचे चिरंजीवाचे तेथील प्रार्थनासमाजाले १२५ रुपये देणें होतें तें त्यांनीं चिंतामणराव यांनीं आपल्या मातुश्रीचें स्मारक म्हणून समाजास बक्षिस दिले. या औदार्याबद्दल आम्ही त्यांची तारीफ करितों.

यंदा म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेत आलेली पतिलाबाई या नांवाच्या एका पारशी तरुण स्त्रीनें तोंडीं परीक्षेत चाळीस गुण व लेखी परीक्षेत सदुसष्ट गुण, मिळून दोनशें पैकीं एकशेंसात गुण इंग्रजी विषयांत मिळविले. स्त्री असोन ही परिक्षाचें कसोटीस उतरली हे स्त्री जातीस भूषणच नव्हे काय? बाकीच्या बहुतेक उमेदवारांस त्रितियांशापेक्षां अधिक गुण मिळविण्याची मुस्कील पडली. ही गोष्ट थोडीशी आश्चर्य वाटण्याजोगी आहे.

हिंदुस्थानच्या हिताविषयीं विशेष कळवळा बाळगणारे मि. फासेट माजीपार्लमेंन्टांतील एक सभासद व हल्लींचे पोस्टमास्तर जनरल यांनीं एका संभाषणांत आपले देशबांधवांस असें सांगितलें कीं, हिंदुस्थानाच्या हिताकरितां हिंदुस्थानांतील कारभारांत इतके दिवस जें मी लक्ष पुरवीत होतों तें आतां म्हणने कमी करीन असें कदापि होणार नाहीं. त्यांनीं असेंही बोलून दाखविलें कीं, अफगाण लढाई खर्चाच्या हिशोबांत ज्या घोटाळ्याच्या चुका झाल्या त्यावरून असें दिसतें कीं, त्या खात्यावर योग्य देखरेखीची उणीव आहे; याकरितां हिंदुस्थान राष्ट्राच्या जमाखर्चाच्या कामकाजाच्या व्यवस्थेंत सुधारणा होणें आवश्य आहे. ज्ञा. च.

अबदुल रहमान हा अद्याप मेला नसून नुकतेच त्यांचें अटिकुलखान नामक सरदाराच्या कन्ये बरोबर गेल्या आक्टोबरच्या २८ व्या तारखेस लग्न झालें त्या समयीं काबुलांत दीपोत्साह वगैरे करून दारूकामही सोडण्यांत आलें व मेजवानीस आलेल्या सरदारांनीं अमीरास नजराणे दिले. महमदजान हा काबुलास २५०० लोकांसह वर्तमान आहे.

अबदुल रहमान यास अमीरकी मिळाल्यां बद्दलचा आनंद प्रदर्शित करण्याकरितां ३ रशियन कामगार काबुलास जाण्याकरितां बल्क येथें आले असून त्यांच्या सन्मानार्थ १ दिवस दीपोत्साहही करण्यांत आला होता असें समजतें.

व्हाइसराय व त्यांच्या कौन्सिलाचे बरेच मेम्बर यांचें मत कंदाहार आपल्या ताब्यांत ठेवावें असें असुन तें ठिकाण सोडुन द्यावें असा विलायत सरकारचा मात्र कायतो आग्रह आहे असें इं. हे. कर्त्यास चांगल्या आधारावरून कळलें आहे.

पनामा संयोगी भूमीमधन जो कालवा काढावयाचा आहे त्याला लागणाऱ्या खर्चापुरती जमली आहे.

छापण्याच्या कामास लागणारे १२,९७,५२६ रुपयांचे, लिहिण्याच्या कामास १४ लक्ष रुपयांचे व इतर ४ लक्षांचे मिळुन ३०,९७,९२८ रुपयांचे कागद गेल्या सालीं परदेशांतून हिंदुस्थानांत आले. आपले लोक जर इकडेस कागदाचे कारखाने काढतील तर त्या कामास लागणारीं द्रव्यें हिंदुस्थानांत विपूल आहेत इं. प्र.

उत्तर ध्रुवाकडील प्रदेशांचा शोध लावण्यासाठीं आणखी एक टोळी पाठविण्याचा विलायतेंतील रायल जाग्रफिकल सोसैटीनें बेत केला आहे असें समजतें.

ज्ञाति प्रकरण— हिंदु पेट्रीयटवरून समजतें कीं, बाकरगंजाचे जज्ज मि. एफ. जे. जी बर्यांपबेल यांनीं एका तद्देशीय शिपायास कांहीं नीच काम करावयास सांगितलें त्यामुळें त्याची जात भ्रष्ट होऊन पुष्कळ नुकसान झालें. ही गोष्ट लेफ्टनंट गव्हरनर साहेबांस समजल्यावर त्यांनीं त्या जज्जास मोठा टपका दिला, त्याची पायरी कमी करून माजिस्त्रेटच्या हुद्यावर टकललें आणि त्याला सहा महिनेपर्यंत बढती मिळूं नये असा ठराव करून त्याची दुसऱ्या ठिकाणीं बदली केली.

राजपुताना सरकारी रेल्वेची अजमीरपल्हणपूर शाखा सुरू करण्याच्या समारंभाच्या वेळीं आनरबल मि० गिब्ज हे व्हैसराय साहेबांचे मकवार या नावानें जहर असतील असें ह्मणतात आणि हा रस्ता सुरू झाल्यावर अजमिराहून मुंबई पर्यंतचे पहिल्या वर्गाचे भाडें सुमारें ४२ रु० पर्यंत होईल. आणि हल्लीं ईस्ट इंडिया आणि जी. आय. पी. रेल्वेच्या रस्त्यानें येण्यास ११६ रुपये भाडें बसतें. तेव्हां या नवीन रस्त्यानें जाणारा येणारांचा अतिशय फायदा होईल हें उघड आहे.

आमचे लोकप्रीय गव्हरनर सर जेम्स फर्ग्युसन यांनीं ठाणे एथील जाइंट जडजाचे जाग्यावर राव बहादुर महादेव गोविंद रानडे यांची नेमणुक व्हावी ह्मणून इंडिया सरकारास शिफारस केल्याचें आह्मांस चांगल्या आधारें कळतें. ज्ञा० च०

बडोद्याचे दिवाण सर टी. माधवराव हे रजेवर मद्रासेस गेले आहेत.

दुरभंगाच्या राणी साहेबांनीं आपल्या दोघा वडील मुलांवर फौजदारी खटला आणला आहे आणि तो फार कडक आहे असें ता. १४ डिसेंबरच्या [illegible] समजतें.

पन्ना संस्थानच्या महाराजांनीं आपल्या मुलखांतून [illegible] जाणाऱ्या मालावर जकात घेण्याचें बंद केलें. सु. प.

वऱ्हाडांतील एक गृहस्थ पांच सहा माहि न्यांपूर्वीं लग्नाकरितां येथें आलेला परत जाण्यासाठीं सोलापुर स्टेशनवर गेला. तेथून त्याचें पाकीट चोरीस गेलें ह्यांत दागिने वगैरे माल होता त्या पैकीं सुमारें ३५० रुपयांचे दागिने शेतांत पुरलेले देगांव ता० सोलापुर एथील एका शेतकऱ्यास शेत नांगरतांना सांपडले त्याचा लबाडीनें अपहार करावा असा त्यानें निश्चय केला व ते गुप्त ठेविले. पुढें तो माल पोलीस तपासांत निघून सदरील शेतकऱ्यास दोन वर्षांची सक्त मजुरीची कैदेची शिक्षा देण्यांत आली. क० त०

नि० जस्टिस एफ डी. मेलव्हिल मुंबई हायकोर्टाचे अ. जज्ज यांस येत्या जानेवारीच्या १२ तारखेपासून १ वर्ष ४ महिन्याची फर्लो मिळाली.

हिंदुस्थान सरकाराकडून खिलातच्या खानास एक उत्तम पाणीदार हिऱ्याची ६००० रुपये किमतीची आंगठी व इतर मिळून ४५,००० रु० [illegible] नजराणा व्हावयाचा असून त्याच्या बदला खानाकडून ४ [illegible] सरंजामाचे ४ घोडे मिळून ६००० किंमतीचा नजराणा व्हावयाचा आहे.

आयुबखान याचा सासरा आशीं लढण्याकरितां कांहीं लोक घेऊन जात असून हिरातेस लवकरच दंगा होईल असें वाटतें. आयुबखान फरा येथें दुराणी लोक गोळा करण्याकरितां गेला आहे. काबूलचे अमीर लवकरच हिंदुस्थानांत येतील असें वाटतें.

मि. फान्स्टन आयर्लंडचे चीफ सेक्रेटरी हे या देशांतील बंडाबखेडा लोकांशीं तोडजोडीचे उपाय [illegible] असें आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत आहेत. आयर्लंडांत बंडावे होत असल्यामुळें पार्लमेंट लवकरच भरेल.

हल्लीं झार यांचा विचार लिव्हेडिया येथून सेंटपीटर्स वर्ग येथें जावयाचा आहे असें समजल्या बरोबर वाटेंत त्यांचा खून केला जाईल अशा अर्थाचीं शेकडो पत्रें त्यांच्या कुटुंबांतील वगैरे मनुष्यास येऊं लागलीं आहेत. व ज्या [illegible] लायनीवरून त्यांची ट्रेन जावयाची आहे तिजवर ठिकठिकाणीं शिपाई ठेवून बंदोबस्त राखावयाचा असून रात्रीस मशालीचा उजेडही जिकडे तिकडे करावयाचा आहे व झार कोणच्या गाडींत आहेत हें न समजावें ह्मणून जवळच्याच रेल्वेवरून अनेक गाड्या एकदम सुटावयाच्या आहेत! मोठ्याच्या मागें भयही [illegible] असतें ही ह्मण [illegible] आहे!! रशियांत राजसत्तोच्छेदक लोक किती आहेत [illegible] या गोष्टीवरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

कलकत्याचे प्रसिद्ध ब्राह्म धर्मोपदेशक बाबू प्रतापचंद्र मुजूमदार हे कराचीहून मुंबई एथें आले आहेत.

मोहरमच्या शेवटच्या दिवशीं भिवंडीस मुसलमान व पोलिस यांची मारामारी होऊन मुसलमानानीं फौजदारास दगडांनी मारिलें.

कंदाहारचे वली शिअर अली हे हिंदुस्थानास येण्याकरितां कंदाहाराहून ता १६ डिसेंबर रोजीं निघाले तेव्हां सलामीच्या १९ तोफा सुटल्या. यांचें कुटुंब कांहीं दिवसानीं मागून निघेल.

मि. जे पील हे सिंधच्या कमिशनरच्या आकिंटग नेमणुकीवरून येत्या मार्च महिन्याच्या आरंभीं मोकळे झाल्यावर त्यास वरिष्ठ सरकारच्या हुकुमावरून या देशांतिल पहिले फ्यामिन कमिशनर नेमिले जातील असें समजतें.

सर रिचर्ड टेंपल यांनीं लंडन एथील कलोनियल इन्स्टिट्यूटमध्यें भाषण केलें त्यांत हिंदुस्थानची जमेची स्थिति चांगली आहे उत्पन्न वाढत चाललें आहे आणि लोकांची एकंदर स्थिति चांगली आहे असें सांगून बोलत की, खनिजविद्या आणि कलाकौशल्य यांची सुधारणा करण्याच्या कामीं विलायतच्या लोकांनीं भांडवल खर्च केलें पाहिजे असें सांगितलें. हिंदुस्थानांतील लोक अधिकाधिक नीतिमान् व बुद्धिमान होत चालले असून ते युरोपियनांची बरोबरी करतील असेंही त्यांनीं सांगितलें. पण हें सांगण्यापुरतेंच.

सांथल परगण्यांत उत्पन्न झालेला दंगा तेथील मनुष्य गणतीच्या संबंधानें पोलिसाच्या दर्तणुकेवरून उत्पन्न होऊन सांथल लोकांनीं जमतारा एथें डिपुटी माजिस्त्रेटाचें घर व कचेरी जाळून टाकिली व रेल्वे स्टेशनाची तीच अवस्था ते करणार होते परंतु तिकडे बहादरताकारिता जास्ता पोलीस [illegible] लें ह्मणून बरें झालें.

सर रिचर्ड टेंपल यांनीं विलायतेंतील ईस्ट इंडिया असोशिएशन सभेपुढें व्याख्यान दिलें त्यांत पाश्चिमात्य विद्येच्या योगानें हिंदुस्थानच्या लोकांस चांगल्या संवई लागत आहेत. तेथील नेटिव कामदार इंग्लिश कामदारांप्रमाणेंच प्रामाणिक व विश्वासू आहेत. लोकांमध्यें राजकीय ज्ञानाचा प्रसार होत असून लोकांच्या तर्फेनें मत देणाऱ्या लोकांचा एक नवीन वर्ग उत्पन्न होऊन वृद्धिंगत होत चालला आहे आणि लोक समूहाच्या धर्मसंबंधी समजुतींत कांहीं फरक झाला नसून स्त्री शिक्षणाची वृद्धि होत चालली आहे असें सांगितलें. ने० ओ०

## सारा वसूल करण्याच्या बाबदींत नवीन.

### हुकुम.

ठाणें जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं मामलेदार लोकांस जमिनीचा सारा वसूल करण्याच्या बाबदींत सर्क्युलर हुकुम पाठविला तो आह्मी वाचकांस कळण्याकरितां एथें घेतो:—

ये. स. नेवर

राव साहेब मामलेदार

अजतर्फ कलेक्टर साहेब बहादुर जिल्हा ठाणें सलाम दिगर.

सरकारचा ठराव नंबर ४८९१ तारीख १६ सप्टेंबर सन १८८० व ठराव ३७९१ ता. २१ जुलै सन १८[illegible] राव नं. १०१[illegible]

बाजूस लिहिले सरकार ठराव [illegible] रून लिहिण्यांत येतें कीं [illegible] लम २१४ चे रकमे [illegible]

१ निवळ दुमाला [illegible] रकारास जुडी वगैरे [illegible] शा जमीनीचा वसूल हप्ता [illegible] माला धारण करणारे [illegible] र दुमाल्याबद्दल धारण करणाराचा [illegible] हक्क जाऊन ती जमीन सरकार [illegible] आणि ती जमीन सरकारची मिळकत [illegible] न आकारी खाडितांत ठेवण्या [illegible] त जमीनीचे रूळाप्रमाणें [illegible] करण्यांत येईल.

२ दुमाला नाहीं असे सरकारी [illegible] र याणीं या मुदतींत वसूल दिला [illegible] ज्या जमीनीचा खातेदार यांणें व[illegible] नाहीं त्याचे सर्व खाते [illegible] जमीन [illegible] खल्ल होईल. आणि तिची व्यवस्था [illegible] कलम एक यांत लिहिल्याप्रमाणें केली [illegible]

३ कलम १ व २ प्रमाणें [illegible] हक्क सरकारांत घेतले तथापि त्या जमिनी[illegible] ल येणें असलेली बाकी रेवेन्यु कोडची [illegible] ११ प्रमाणें अन्य उपायानें वसूल केला पाहिजे.

४ या जिल्ह्यांत सरकार धारा घेण्याच्या मुदतींत साधारण पहिल्या हप्त्याची ता. १ जानेवारी व दुसरी हप्त्याची ता. १६ फेब्रुवारी ठरलेली आहे. ती कायम समजावी. नेमिले तारखेस एकदम लोकांस वसूल [illegible] ण्यास व कामगारांस घेण्यास हरकत आहे. याकरितां नेमिले तारखेपासून पुढें १० दिवस सोहलत ठेविली आहे. त्या प्रमाणें वसूल [illegible] आल्यास जमीनी खालसा करण्याविषयीं ता. ११ जानेवारी सन १८८१ रोजीं व ता. २६ फेब्रुवारी सन १८८१ रोजीं रिपोर्ट प्रांत मार्फत पाठवावा. ज्या जमीनीबद्दल वसूल देण्याची विशेष मुदत ठरलेली असेल ती मुदत भरतांच त्या जमीनी खालसा करण्याविषयीं सदर प्रमाणें रिपोर्ट करावा.

५ सदरहू हुकुमाची गांव कामगार मार्फत रयतेस समजूत द्यावी व दवंडी पिटवावी आणि [illegible] १८८०-८१ सालचा धारा या हुकमाअन्वयें वसूल करण्याची तजवीज ठेवावी [illegible] लिहिल्या आहेत. यापूर्वीं कोणी खातेदारानें पैसा भरला असतां घेण्यास हरकत नाहीं असेंही गांव कामगारांस कळवावें.

६ पाटील, महार वगैरे नोकरीचे व[illegible] दार यांजकडे असलेल्या नोकरीचे जमीनीबद्दल जुडीचा पैसा येण्याचा खास सदरहू ठराव लागू केला तर फार सक्ती होईल सबब त्याविषयीं [illegible] सरकारांत लिहून गेलें आहे. [illegible] कडून हुकुम येईल त्याप्रमाणें मागाहून [illegible] तरी त्यांजकडील जुडीचा पैसा देण्यास हरकत होऊं नये याजकरितां जमी[illegible] ण्याची तजवीज ठेवावी. तारीख [illegible] डिसेंबर सन १८८० इसवी.

सही इंग्रजी

कलेक्टर

हें पत्र आकोलें एथें वऱ्हाडसमाचार [illegible] यांनी [illegible]